श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

# बाणगंगा

**अंक ८ वा**

**सन २०१६-२०१७**

संपादक

**डॉ. विजय जाधव**

प्राचार्य

कार्यकारी संपादक

**डॉ. भाऊसाहेब मुळे**


✻ संपादक मंडळ ✻

प्रा. डॉ. शेख राजमोहंमद
प्रा. त्रिवेणी गाडे
प्रा. साठे भास्कर
प्रा. पुंडे मनिषा
प्रा. सौ. काळे वर्षा
प्रा. भुजबळ अमोल
प्रा. मोहिते चेतना
प्रा.डॉ. सौ. कीर्तने वर्षा

प्रकाशक

**डॉ. विजय जाधव**

प्राचार्य

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

---

सदर अंकात प्रसिध्द करण्यात आलेले लेख, कविता यातील मते संबंधित लेखक, कवींची आहेत. या मताशी संपादक मंडळ, महाविद्यालय व संस्था सहमत असेलच असे नाही.

श्री बाणेश्वर शिक्षण संस्था

# विश्वस्त व कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | सभासदाचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | **श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले** | अध्यक्ष |
| २ | **श्री. विक्रांत विघ्नहर देशमुख** | उपाध्यक्ष |
| ३ | **श्री. गोरखनाथ दौलत साठे** | सचिव |
| ४ | **श्री. सोमनाथ तुळशीराम गुंजाळ** | सहसचिव |
| ५ | **श्री. त्र्यंबक हरीभाऊ कर्डिले** | खजिनदार |
| ६ | **श्री. बाळासाहेब त्र्यंबक वाघ** | सदस्य |
| ७ | **श्री. आसाराम तात्याभाऊ दुसुंगे** | सदस्य |
| ८ | **श्री. जनार्दन राधाकिसन कर्डिले** | सदस्य |
| ९ | **श्री. उत्तम चिमाजी जाधव** | सदस्य |
| १० | **श्री. भाऊसाहेब गंगाधर कर्डिले** | सदस्य |
| ११ | **श्री. प्रकाश कुंडलिक कर्डिले** | सदस्य |

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालयाची स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शिवाजीराव भानुदास कर्डिले | अध्यक्ष |
| २ | प्राचार्य डॉ. विजय मच्छिंद्र जाधव | सचिव |
| ३ | श्री. त्र्यंबक हरीभाऊ कर्डिले | सदस्य |
| ४ | श्री. गोरखनाथ दौलत साठे | सदस्य |
| ५ | श्री. सोमनाथ तुळशीराम गुंजाळ | सदस्य |
| ६ | श्री. उत्तम चिमाजी जाधव | सदस्य |
| ७ | प्रा. डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे | सदस्य |
| ८ | प्रा. डॉ. राजमोहंमद हसन शेख | सदस्य |
| ९ | प्रा. सौ. मनिषा नारायण पुंडे | सदस्या |

### * शिक्षकेतर प्रतिनिधी *

| | | |
|---|---|---|
| १० | श्रीम. शैला भगवान पाचे | सदस्या |



स्व. राजेंद्र महाजन

# श्रद्धांजली

या शैक्षणिक वर्षात जे जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ, कलावंत, साहित्यिक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत धुरंधर राजकारणी, संस्थेवर मन:पूर्वक प्रेम करणारे सहृदय, स्नेही, हितचिंतक, महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी त्यांचे आप्तेष्ट, विद्यार्थी दिवंगत झाले. अशा लाखो निष्पाप जीवांना संस्थेच्या व सर्व युनिटच्या वतीने



## भावपूर्ण...

## श्रद्धांजली



# प्राचार्यांचे मनोगत....

विद्यार्थी बंधू-भगिनींनो,

बाणगंगा या वार्षिक नियतकालीकाचा सातवा अंक आपल्या हाती देतांना व त्याव्दारे आपणाशी संवाद साधताना मला विशेष आनंद होत आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत बुऱ्हाणनगरचे आराध्यदैवत आई तुळजाभवानीच्या आशिर्वादाने शैक्षणिक विचारांची शिदोरी बरोबर ठेवत बहुजन समाजाच्या उध्दाराचे स्वप्न उराशी बाळगुन मा. आ. शिवाजीराव कर्डिले यांनी १९८९ साली श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना केली. अल्पावधीतच ज्ञानाची गंगोत्री बुऱ्हाणनगरमध्ये प्रवाहित केली. प्राथमिक,माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची वन वन थांबवून शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केली व अल्पावधीतच या संस्थेने मोठी प्रगती साधली याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री बाणेश्वर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय होय.

जुन २००४ मध्ये अवघ्या ५७ विद्यार्थी व ६ प्राध्यापकांवर सुरु झालेल्या या महाविद्यालयात सध्या ९७६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ३२ प्राध्यापक ज्ञानदानाचे कार्य करत आहेत.

बदलत्या प्रवाहाचा मागोवा घेत महाविद्यालयाने पारंपरिक उच्च शिक्षणाबरोबर व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केले आहेत. नवनवीन अभ्यासक्रमाव्दारे उच्च शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता टिकवत असतानांच ग्रामीण भागातील आमचा विद्यार्थी खासगीकरणाच्या युगात २१ व्या शतकात आव्हाने पेलण्यास समर्थ बनला पाहिजे. ही भूमिका स्वीकारुन यासाठी आम्ही आवश्यक ती कौशल्ये, मुलाखत तंत्र, सामान्य ज्ञान, सॉफ्टस्कील डेव्लहपमेंट प्रोग्राम सारखे उपक्रम राबवित आहोत. ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षण पूर्ण करता यावे, त्यांच्यात श्रमसंस्कार रुजावेत, यासाठी 'कमवा व शिका' योजनेंतर्गत शिक्षण पूर्ण करण्याची संधी महाविद्यालयाने दिली. या बरोबरच विद्यार्थी कल्याण मंडळाच्या सर्व योजना व उपक्रमांमध्ये महाविद्यालय सहभागी होऊन नव भारताचे भावी आधारस्तंभ सक्षम करण्याचा महाविद्यालय प्रयत्न करीत आहोत.

या वर्षीचा 'बाणगंगा' हा आठवा अंक साकार करण्याचा आम्ही प्रयत्न केला. संस्थेच्या सहकार्याने प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सहकार्यामुळे या अंकाची निर्मिती झाली. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या साहित्यीक गुणांना वाव देण्यासाठीचे चांगले व्यासपीठ आहे व त्यात विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी होतात,हे पाहून आनंद वाटतो.

अशा या बाणगंगा च्या सातव्या अंक निर्मितीसाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षणप्रेमी व्यक्तींनी सहकार्य केले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

धन्यवाद !

**डॉ. विजय जाधव**
**प्राचार्य**

# संपादकीय...

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेची स्थापना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिवाजीराव कर्डिले व इतर संचालक मंडळ यांनी सन १९८९ साली केली. या माध्यमातून सर्वप्रथम माध्यमिक शाळा सुरु केली. नंतर उच्च माध्यमिकचे वर्ग सुरु केले. पंचक्रोशीतील इतरही ठिकाणी शिक्षणाची गरज पाहता त्याही ठिकाणी माध्यमिक शाळा सुरु केल्या.

उच्च शिक्षणाची मागणी आणि विशेषत: मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून या संख्येने सन २००४ साली श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयाच्या माध्यमातून अनेक गरीब मुलामुलींना, उपेक्षित घटकातील व खेड्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळू लागले. या शिक्षणातून सर्वच घटकातील विद्यार्थ्यांचे जीवन समृध्द होण्यास मदत होत आहे हे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीतून सिध्द होताना दिसते.

महाविद्यालयीन युवक हा उद्याच्या पिढीचा सुजाण नागरिक असतो. उच्च शिक्षणाने त्याच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असतात. समाजात घडणाऱ्या घटनांकडे तो स्वत:च्या नजरेने पाहत असतो आणि त्याचा अन्वयार्थ स्वत:च लावण्याचा प्रयत्न करीत असतो. या महाविद्यालयीन युवकांपुढे अनेक प्रकारचे माहितीचे मायाजाळ आहे. त्याच्या भोवती घडणाऱ्या सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक आणि वैयक्तिक घटनांचा त्याच्यावर अनुकूल प्रतिकूल परिणाम होत असतो. या घटनेच्या निरीक्षणातून त्याची वैचारिक बांधणी होत असते. हाच विचार शब्दबध्द करण्याचा अनेकदा तो प्रयत्न करीत असतो. मात्र त्याला व्यक्त होण्यासाठी विचारपीठ उपलब्ध होत नाही. त्याच्या या वैचारिक भावना व्यक्त करण्यासाठीच महाविद्यालयाचे हे नियतकालिक असते.

या नियतकालिकातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपापल्या भावभावना लेख, काव्य अथवा छोटाट्या चुटकुल्यातून व्यक्त केल्या आहेत. वैयक्तिक भावभावनांसोबत सामाजिक, राजकिय, शैक्षणिक विचारांवरही भाष्य व मंथन यात आले असून ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाची कास धरणारा हा विद्यार्थी, वैज्ञानिक प्रगतीचा शोध बोधपर विचारही या नियत कालिकात मांडू लागला आहे. जीवनाच्या विविध अंगांचे दर्शन आपल्या लेखाच्या व कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घडविले आहे.

महाविद्यालयाच्या हा आठवा वार्षिक अंक आहे. या अंकातील विविध लेखांचा आपण आस्वाद घ्यावा हीच सर्व संपादक मंडळाची इच्छा आहे. म्हणूनच हा अंक अधिकाधिक आकर्षक बनविला आहे. या अंकासाठी संपादक मंडळातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतलेले कष्ट व परिश्रम स्तुत्य आहेत. त्याबद्दल सर्वांना धन्यवाद देतो.

**कार्यकारी संपादक**
**प्रा. डॉ. भाऊसाहेब माणिकराव मुळे,**
**मराठी विभाग प्रमुख**

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे

# श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

बुऱ्हाणनगर, ता.जि. अहमदनगर.

## महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेतर वर्ग २०१६-२०१७

समाजशास्त्र विभाग
डॉ. जाधव व्ही. एम. (प्राचार्य)

मराठी विभाग
प्रा. डॉ. मुळे बी. एम.
प्रा. डॉ. कीर्तने व्ही.एस.

वाणिज्य विभाग
प्रा. गाडे पी.डी.
प्रा. दरेकर ए.व्ही
प्रा. पूनम बेद्रे
प्रा. के.एस. जाधव

बी.सी.ए. विभाग
प्रा. अमोल भुजबळ
प्रा. वर्षा कर्डिले
प्रा. दारुणकर प्रेरणा

लेखाधिकारी
श्री. विधाते ए.बी.

परीक्षा विभाग
श्रीमती पाचे शैला

हिंदी विभाग
प्रा. डॉ. शेख आर.एच.
प्रा. राणी केदार

इतिहास विभाग
प्रा. सोनवणे एस.आर.
प्रा. औटी सर

बी.सी.एस. विभाग
प्रा. काळे व्ही. ए.
प्रा. तृप्ती बोंदर्डे
प्रा. योगेश ढगे

ग्रंथालय विभाग
प्रा. सचिन झोंड

शिपाई
श्री. कर्डिले एस.वाय.
श्री. नवनाथ साळवे
श्री. योगेश थोरवे
श्रीमती लोखंडे जे.एल.

प्रा. नागपुरे योगेश

इंग्रजी विभाग
प्रा. नागवडे पी.सी.

भूगोल विभाग
प्रा. साठे बी.जी.

राज्यशास्त्र विभाग
प्रा. खांदवे एस.टी.

क्रीडा विभाग
प्रा. पुंडे एम.एन.

बी.एस्सी. विभाग
प्रा. मोहिते चेतना
प्रा. धिमन मॅडम
प्रा. वाघ मॅडम
प्रा. लहारे मॅडम
प्रा. बांगरे सर
प्रा. गिते मॅडम
प्रा. कुलकर्णी मॅडम
प्रा. कोमल सोनवणे
प्रा. नामदे मॅडम

# बाणगंगा

## सन २०१६-२०१७

# अनुक्रमणिका


| विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| मराठी | ११ |
| अहवाल | ५३ |

# मराठी विभाग

# मुलगी वाचवा...

आजचे युग हे आधुनिक युग आहे. येथे फक्त तंत्रज्ञान चालते पण आज याच तंत्रज्ञानाच्या युगात हेच तंत्रज्ञान महिलांसाठी किती तरी घातक ठरत आहे. या जगात या युगात येण्यापूर्वीच त्या मुलीचा जीव घेतला जातो. मी विचारते असे का... ? काय दोष आहे त्या गर्भातील मुलीची, काय चुकी करते ती या जगात येवून? काहीच नाही, मग का मी म्हणते आपल्याला काळजी घेणारी आई हवी.... आपल्याला संसार करण्यासाठी पत्नी हवी... आपल्याला राखी बांधण्यासाठी बहिण हवी...मग मुलगी का नको... ?

आपल्या देशात अनेक योजना आखल्या जातात. मुली वाचवण्यासाठी पण त्यांचा काही उपयोग होतच नाही कारण ते फक्त कागदोपत्रीच. ह्या साली ही ही योजना आणली... पण त्याचा परिणाम काहीच नाही भ्रूणहत्या होतीच आहे. महिलेला छळ सोसावाच लागतोय, पण आता हे थांबणं आवश्यक आहे. आज आपण पाहतोत की मुलगी सुध्दा तेवढीच प्रगती करते जेवढी मुले करतात. मी तर म्हणजे आज तुम्ही कोणत्याही शाळेत, कॉलेज किंवा अजून कुठेही जावून पहा तिथे सर्वात यशस्वी मुलगीच असते.

य नार्यस्तु पुज्यते, रमन्ते तत्र देवतः म्हणजे जिथे स्त्रियांचा मानसन्मान केला जातो. तिथे देवता वास करतात असे जुने वाक्ये/सुभाषित आपल्याकडे आहे. प्राचीन काळातील विदुषीपासून ते अलीकडच्या काळातील राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, इंदिराजी गांधी ते सायना नेहवाल, कॅटरिना अशा विविध क्षेत्रातील महिलांनी आपले कर्तृत्व सगळ्या जगाला दाखवली असे असताना सुध्दा स्त्री पुरुष प्रमाणाचा समतोल ढासळत आहे ही चिंतेचीच बाब आहे.

खरंच वंशाला दिव्याची गरज असते काय ? जर गरज असेलच तर आत्तापर्यंत अशा लाडाच्या दिवत्यांनी आपल्या या समाजात किती दिवे लावलेत ? किती दिवत्यांनी म्हाताऱ्या आई वडिलांना घराबाहेर न काढता त्यांचा प्रेमाने सांभाळ केला ?या प्रश्नांना समाधान कारक उत्तरे मिळत नाहीत तरीही अनेकांना आजही वंशाचा दिवा म्हणून मुलगाच पाहिजे.

आज मुलांऐवजी मुलगीच आपल्या कुटुंबाचे नावलौकिक करते. तीच आपल्या आई-वडिलांचा सांभाळ करते. मग मुलगी का नको ?

आपल्या समाजात मुली ह्या हव्याच कारण 'आई आहे तर मुलगी आहे, आणि मुलगी आहे तरच मुलगा आहे.'

आपल्याला या समाजात राहणाऱ्या लोकांचे विचार बदलायलाच हवेत. आज ज्या योजना आहेत या कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्षात आणल्याच पाहिजे, तेव्हाच भ्रूणहत्या, बलात्कार, छळ हे थांबेल आणि त्याचप्रमाणे जे गुन्हे करता त्यांना शिक्षा ही व्हायलाच हवी ती सुध्दा कडक ! आपल्याला सर्वांना या समाजाला मुलीचे महत्वव पटवून दिलेच पाहिजे. ते ही विविध कार्यक्रम, शिबीरे, जाहिराती, वृत्तपत्रे अशी विविध प्रकारे समजवले पाहिजे त्याचप्रमाणे ज्यांनी त्यांनी त्याच्या प्रयत्नाने समजवले पाहिजे जसे डॉक्टरांनी पेशंटसला समजवून, वकीलांनी त्यांच्या क्लाइंट द्वारे तर शिक्षकांनी विद्यार्थी व त्यांच्या पालकांद्वारे इतर अशा प्रकारे ज्याने त्याने ज्याच्या त्याच्या करिअरप्रमाणे...

मुलगा मुलगी मानू समान देणार नाही
त्यांना दुय्यम स्थान
लक्ष्मीच्या पावलांनी दिपावली येते
नवरात्रीच्या पावलांनी दुर्गा पावते
वटपौणिमेच्या दिवशी सावित्री दिसते
राखीचा धागा तर ताईच बांधते
पाडव्याचे औक्षण तर पत्नीच करते
मग तरीही चिमुकली गर्भातच का मरते ?
मुलगी वाचवा...

**- शेलार शितल अंबादास, एफ.वाय. बी.कॉम.**

# बचत करा... श्रीमंत व्हा... !



मार्गशीर्ष महिन्यातील गुरुवारच्या व्रताचं उदयापन होतं. त्या निमित्ताने एकीच्या घरी सर्व मैत्रिणी जमल्या होत्या. श्रीलक्ष्मीच्या व्रताची सांगता झाल्यामुळे विषय लक्ष्मी सदैव नांदू दे असं मागणं सर्वांनी त्या देवीकडे केलं असणार हे गृहित धरुन चर्चेचा रोख सध्याच्या नोटबंदीकडे वळला, कुण्या एकीने विरोधी सूर लावला. पण त्या सहा–सात जणींमधल्या दुसऱ्या एकीने वेगळाच विषय मांडला. ती म्हणाली, 'दोन–चारशेचं सामान घेतलं तर दुकानदार दोन हजार रुपयांची नोट घेत नाही. अन् शंभराच्या नोटा आपल्याकडे कमी प्रमाणात असल्यामुळे त्या खर्च करण्याची इच्छा होत नाही. माझ्या मते, या निश्चितीकरणाचा मोठा फायदा म्हणजे आपल्या हातून अवास्तव खर्च होत नाहीये. पर्यायाने पैशांची मोठी बचत होतेय.'

तिसरीनं तिला दुजोरा दिला. ती म्हणाली, 'मला तर हे संकट वाटत नसून बरकत वाटते आहे. कारण शंभराच्या नोटा संपतील, म्हणून खर्चाचा हात आखडता झालाय. अन् दोन हजाराचे सुटे पैसे सहजासहजी मिळत नसल्यामुळे त्या खर्च होत नाहीयेत.'

चौथी म्हणाली, 'अगदी बरोबर यामुळे आपली केवढी बचत होतेय.'

बचत म्हणजेच मिळकत, या संवादातून आजच्या काही गृहिणींची मानसिकता आढळून येत आहे. असाही आपल्याकडे जवळपास सर्वच गृहिणींचा कल बचतीकडे दिसून येतो. तेव्हा हे सूत्र ध्यानी ठेवून आपली मिळकत वाढवा.

गृहिणींच्या वरील संवादातून असंही आढळून आलं होतं की, बरेचशी एटीएम मशीन्सचे बंद राहणं पैसे काढण्याचा मार्ग खुंटला आहे अन् बँकेतून दोन हजार रुपयाचंया नोटा हाती पडत असल्यामुळे तिथे स्वयंघोषित प्रवेश बंद झाला आहे. तेव्हा ही आर्थिक आपत्ती म्हणजेच आपली संपत्ती आहे. असं समजून सुखी, समाधानी राहणं, हे उत्तम ! त्यात आणखी भर घालण्यासाठी आम्ही बचतीचे काही मंत्र देत आहोत.

देशाचं, राज्याचं किंवा नगराचं अर्थकारण त्याच्या अंदाजपत्रकावर अवलंबून असतं सभागृहात अर्थसंकल्प सादर केला जातो. तो जनतेला खुला केला जातो. त्यातील तरतुदीनुसार देशाच्या, राज्याच्या, नगराच्या योजना राबविल्या जातात. असाच स्वतःचा अर्थसंकल्प बनवा. वर्षभराचा नाही, तर महिन्याचा ! त्यात आपल्या हाती येणारी मिळकत आणि करण्याचा खर्च यांचा अंदाज बांधा, अन् बचत किती आणि कशी करता येईल. हे ही मनाशी ठरवून ह्या भाजीपाला. किराणा सामान, टेलिफोन, मोबाईल बील, विजेची आणि मेंटेनन्सची बिल यावर होणाऱ्या खर्चाचा अंदाज बांधा. अन् त्याप्रमाणे खर्च करा. यात महत्वाची गोष्ट म्हणजे अनावश्यक खर्चाला वाव ठेवू नका. उदाहरणार्थ, बाजारात गेलं की दिसला चांगला ड्रेस म्हणून घेतला, अशी वृत्ती नितांत गरज आहे का, हा प्रश्न आपल्या या मोहजालातून स्वतःची सुटका करा.

**– कर्डिले जागृती**

# सोशल मिडिया - न हि ज्ञाने सदृश्य मिही !

आजच्या युगात ज्ञानाला अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. वयाच्या लहानापासून ते अगदी वयस्कर व्यक्ती पर्यंत सोशल मिडियाचा उपयोग करतात. सोशल मिडिया हे अगदी प्रिय माध्यम झाले आहे. सोशल मिडियाचा वापर पंजाबसारख्या राज्यांमध्ये दहशतवाद्यांनी गैरवापर करुन दहशत पसरवण्याचा प्रयत्न केला. सोशल सुसाईड हा शब्द किती गोंधळात टाकणारा आहे ना ? आत्ताच्या तरुणांमध्ये हा शब्द बऱ्यापैकी गाजतोय. व्हॅटस्अप, फेसबुक या सारख्या सोशल साइडसना टाटा बाय बाय करण म्हणजे सोशल सुसाईड. पण ते करण्याची कारणं तरी काय ? तर ती प्रत्येकाची वेगवेगळी असतात. 'सोशल मिडिया म्हणजे जाऊन कुणी लगेच आत्महत्या करत नाही तर तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर व्हॉटस् ॲप, फेसबुक आणि तत्सम सोशल साईटस अनइन्स्टॉल करतो.'सोशल मिडियामुळे आदिवासी वाड्यातील मुलींवर होणाऱ्या अत्याचारांचा शोध लागतो. त्यांना सुरक्षित कसे करता येईल हे जर सोशल मिडियावर समजले तर चांगले होईल. सोशल मिडियावर फेक अकाऊंटस् तयार करुन मुलींना फसवणे त्यांची छेड काढणे. वाईट कॉमेन्टस पाठवणे असे प्रकार घडतात. जर सोशल मिडियावर जोक्स कॉमेन्टस् फोटो शेअर करण्यापेक्षा आपण अभ्यासाच्या ॲक्टीव्हिटी केल्यातर किती छान होईल. सोशल मिडियावर काही संघटना कुजबुज अभियान चालू करतात त्यामुळे दहशत पसरवण्याचे काम चालु होते. सोशल मिडिया हे एक तरुणाईतील व्यसन आहे. या व्यसनाला खूप जन बळी पडले आहेत. आताच व्हॉटस ॲपच्या मालकाने ९० कोटी रु. दान केले



कारण त्याला माहिती आहे अजून तेवढेच पैस मला मिळणार आहेत. त्याचा वापर करणारे अजून खूप जन वाढणार आहे.

सोशल मिडियाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगळा असतो. ज्यांना सोशल साइटसचा फायदा आहे असं वाटत ते या साईटसवर ॲक्टीव्ह राहतात. सोशल साईटस ज्यांना निव्वळ ऑडिशन वाटतात ते या अनइन्स्टॉल करुन व्हर्च्युअल राहण्यापेक्षा प्रत्यक्ष संपर्क वाढवण्याचा प्रयत्न करतात. लोकांना दुसऱ्याच्या आयुष्यात काय चाललेय या जास्त कुतूहल असते. आपल्याला फेसबुकवर अन्य साईडस चेक करावेसे वाटते. त्यामुळे काही जन सोशल मिडियाचा वापर करतात.

**- मुळे वृषाली**

## *My Father*

*How I love this poem so much*
*It expresses my feelings to my dad*
*I never realized how big a sacrifice,*
*He made for me for every single day*
*I've lived*
*Thank you dad*
*one day I'll repay all of your kindness*
*and your good will. Be remembered by me !*

***- Fand Jyoti Asaram***

# स्त्री : काल आणि आज

स्त्री हा शब्द उच्चारला की प्रामुख्याने डोळ्यासमोर उभी राहते ती वात्सल्याची मूर्ती ! वात्सल्य, त्याग व सहनशीलतेचा एक अपूर्व संगम स्त्रीमध्ये झाला आहे.

गार्गी, मैत्रयी सारख्या, कर्तबगार विदुषीचा काळ असो किंवा मनुस्मृतीचे बंधन-श्रुंखला पडल्यानंतरच्या अंधःकारमय काळ असो, त्या-त्या काळातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करता आपल्याला असेच आढळून येईल. स्त्रीच वात्सल्य, त्याग आणि सहनशीलतेच नात कुठल्याही काळाला आणि परिस्थितीला तोडता येत नाही. या तिच्या अभिजात भावनांवरच कुटुंब अवस्था टिकून आहे. आणि याच स्त्रीच्या आधारामुळे जग स्थैर्याच्या सुखात पहुडले आहे.

विश्वनिर्मात्याने आपल्या साखर झोपेच्या वेळी टाकलेल्या हळुवार निःश्वास म्हणजे स्त्री !

'जी स्वतः फुलते आणि इतरांनाही
फुलवते
जी स्वतः झिजून रक्त, मांसाचे खत
घालून
नवीन बीज अंकुरते
जी दुसऱ्याचे अश्रु आपलेसे करते आणि
त्यांना मात्र हसु देते.'

सप्तरंगानी उधळण करणाऱ्या इंद्रधनुष्यातले सात रंग एकत्र आले आणि सोज्वळता, साधेपणाचा श्वेतरंगाचा उदय झाला. या विश्वातल्या सप्त गुणांचा दया, क्षमा, शांती, प्रेम, वात्सल्य, नम्रता आणि मांगल्याचा संगम झाला आणि स्त्रीने जन्म घेतला. अशी ही स्त्री महान आहे, परंतु याचबरोबर मनुस्मृतीने तिला अबला ठरविले आहे. जीवनाच्या प्रत्येक वळणावर पुरुषाच्या खांद्याचा तिला आधार घ्यावा लागतो. असे ठरविले तिच्या पायात अनिष्ट रुढी व परंपरेची अनेक बंधने घातली आणि 'चूल आणि मूल' एवढ्यात जगात वावरण्याचा हक्क समाजाने तिला दिला.

आज जग प्रत्येक क्षेत्रात प्रगती करीत आहे, पण अजुनही मुलगी झाल्यास कपाळावर आठ्या पडतात. आजच्या या प्रगतशील देशात, अजुनही हुंड्यासाठी अर्थात पैशाच्या हव्यासापोटी निष्पाप अबलेचा बळी घेतला जातो. लग्न होतांना तिला आयुष्याची सोबतीण म्हटलं जाते अन् लग्न झाल्यावर तिला आयुष्याची कैदीण केले जाते. प्रत्येकाच्या स्वार्थाचे, भोगाचे लक्ष्य असते स्त्री ! पैशाने, वासनेने हपापलेली माणसे स्त्रियांच्या जीवनाची राख रांगोळी करतात. तिच्या देहाचा बाजार मांडतात. याची वर्णने वृत्तपत्रात व दूरदर्शनवर दिसतात. हे सर्व पाहिले की देश कितीही पुढे गेला. प्रगतीपथावर गेला तरी स्त्रीचे स्थान बदलत नाही. एक अस्तित्वशून्य उपभोग्य वस्तु असाच समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन आहे. ही अत्यंत खेदाची बाब आहे.

जिच्या उदरातून माणूस जन्म घेतो तिलाच आपली पायधूळ समजतो. तिला समान वागणूक मिळत नाही. तिच्या या दुःखाला ग. दि. मां. च्या ओळी समर्पक वाटतात.

'तुझिया पोटी अवतरती नर
अन्यायच ते करिति तुजवर
दशा तुझी ही केविलवाणी
स्त्री जन्मा ही तुझी कहाणी
हृदयी अमृत नयनी पाणी'

या उलट आधुनिक स्त्री संसार नेटाने

संभाळत आहे. पाहता तिच्यातील मध्ययुगातील गुलामगिरीची भावना नष्ट झाली आहे. स्वातंत्र्याची चव तिला कळली आहे. तिला स्वत्वाची जाणीव झाली आहे. तरी स्त्री सक्तीच्या भावनेने चेतावली आहे. पुरुषांनी तिच्यावर केलेला अन्याय ती विसरली नाही, स्वतःच्या व्यक्तीमत्वाची तिला काळजी आहे. आणि आपल्या कुटुंबात आर्थिक आधार देण्यासाठी ती अविरत धडपडत आहे.

स्वतःच करिअर सांभाळून, स्वतःचा व्यवसाय, नोकरी सांभाळून आणि स्वतःच स्वतः जपून आधुनिक स्त्री जेव्हा आपल्या मुलांकडे वात्सल्याने पाहते, आपली पत्नीची भूमिका यथायोग्य पार पाडते तेव्हा आपल्याला ती संसार सांभाळते असंच चित्र दिसून येतं.


स्त्रीने आज प्रत्यक्षात पदार्पण केलं आहे. ती कोणत्याही क्षेत्रात कमी नाही. ती काही क्षेत्रात पुरुषापेक्षाही सरस ठरत आहे.

‘स्त्री असे अबला, ती सबला
प्रत्येक क्षेत्रात तिचा बोलबाला !’

हा बोलबाला तारेवरची करसत करुन पार पाडत आहे. आज स्त्रीने जशी यशाचे शिखर गाठले तरी तिला दुय्यम मानले जाते. या स्त्रीयांच्या भरारी मारणाऱ्या पंखांना प्रोत्साहनाचे बळ हवे आहे. आज कदाचित स्त्रीच या विश्वाला लागलेल्या भ्रष्ट्राचाराला, अनैतिकतेच्या व अन्यायाचा ग्रहणातून वाचवू शकेल.

राष्ट्र उभारण्यात देखील स्त्रीचा मोलाचा वाटा आहे. अशा या महान वंदनीय स्त्रीला तिचा दर्जा हा मिळालाच पाहिजे. वर्षातील फक्त एकच दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा न करता तिच्या गुणांचा सदैव गौरव झाला पाहिजे. मला





ईश्वराला एवढेच सांगावेसे वाटते.

‘कळीचे फूल व्हावे
जगाला सुगंध देण्यासाठी
मी परत जन्माव स्त्री म्हणून
सर्वांवर प्रेम करण्यासाठी’

**– घायतडक सुनिता अर्जुन**

## सपना

*मत सोच की तेरा सपना*
*क्यो पुरा नही होता...*
*हिम्मतवालो का इरादा*
*कभी अधुरा नहीं होता...*
*जिस इंन्सान के कर्म*
*अच्छे होते है....*
*उसके जिवन मे*
*कभी अंधेरा नही होता...*

*शांततेच्या काळात जास्त*
*घाम गाळला तर....*
*युध्दाच्या काळात कमी*
*रक्त सांडावं लागते...*

**खंडागळे सुवर्णा लक्ष्मण, बी.ए. प्रथम वर्ष**

# मैत्री

मैत्री ही सतार वाद्यासारखी असते. तिची तार छेडताच प्रेमाचे संगीत बाहेर पडते. आपण कुठे जन्म घ्यावा. आपल आई-वडिल नातेवाईक कसे असावेत हे आपल्या हातात नसते. परंतु मैत्री कोणाशी करावी हे मात्र आपले आपल्यालाच ठरवावे लागते.

मैत्री हे जरी दोन अक्षरी नाव असलं तरी त्याचा अर्थ फार मोठा आहे.

कोणत्याही वळणावर कोणत्याही संकटात आपल्याला मित्र मैत्रिणी साथ देत असतात. खरोखर मैत्री ही अतिशय सुंदर अस नातं आहे.

'चाकावाचुनी गाडी नाही,
नाही ताकावाचुनी लोणी
मैत्री वाचून या भूमीवर
जगु शकेल का कोणी ?'

मैत्री म्हणजे एक रेशमी सुंदर धागा होय. मैत्री म्हणजे निर्मल मनाचा एकमेकांशी वळणावर वेगवेगळ्या प्रकारचे मित्र-मैत्रिणी भेटतात. परंतु जे संकट प्रसंगी साथ देतात तेच खरे मित्र होय. मैत्रीमध्ये एकमेकांचा एकमेकांवर विश्वास असायला हवा, विश्वास असेल तर शेवटच्या श्वासापर्यंत मैत्री आहे.

मैत्रीमध्ये घेण्यापेक्षा जास्त देणे शिकावे कारणे घेणे म्हणजे स्वार्थ आणि मैत्रीमध्ये कसलाही स्वार्थ नसतो. आपल्या मित्राजवळ किंवा मैत्रिणीजवळ आपण आपल्या सुख-दुःखाची देवाण-घेवाण करत असतो. नंतर बाकी उरते ती समाधानाची. मैत्रीत असलेला मग प्रत्येक असलेला मग प्रत्येक एक-एक दुःखाचा सुखाचा अश्रु आपण आपल्या मनात साठवतो.



मैत्री ही इंद्रधष्याच्या धवल रंगासारखी असते. कधी-कधी तर काळ्या कुट्ट ढगासारखी, निळ्या आभाळासारखी पर्जन्य धारेच्या एका दृष्टी सारखी, पहिल्या पावन दरवळणाऱ्या गंधासारखे अशी ही मैत्री असते.

'ह्रदयाच्या सुंदर बागेत
प्रेमाच्या सुंदर वेलीवर
फुलणारे फुलत ठेवले पुष्प
म्हणजे मैत्री होय.'

**- धाडगे पायल**

## आत्महत्या हा पर्याय नाही....

**अपयश ही यशाची पहिली पायरी असते**
**जीवनातील अनुभवांची ती एक डायरी असते.**
**त्यातूनच घडत जाते प्रत्येकाचे भविष्य**
**मगच कळून येते किती सुंदर आहे आयुष्य**
**प्रयत्नांच्या बळावर सर कसा येते शिखर**
**लाथ मारेन तिथे पाणी काढेन ही ठेवा जिगर**
**कुठल्याही समस्येला नाही आत्महत्या हा पर्याय**
**सदा पुढेच जायचे संकटावर ठेवून पाय**
**नापास होणं म्हणजे नाही आभाळ कोसळणं**
**जीवन म्हणजे आहे निरंतर शिकणं**
**परीक्षा नाही ठरवू शकत जीवनाच मोल**
**अंगी बाळगावी कला अन् सावरावा तोल**
**दुर्गम कडा भेदण्याची ठेवा दुर्दम्य अभिलाषा**
**मग येणारच नाही तुमच्याजवळ निराशा....**

# एक संघर्ष - स्त्री जीवनातला

स्त्री जीवन म्हणजे काय असते ? हा प्रश्न सगळ्यांनाच पडत असतो. पण जो हे स्त्री जीवन आनंदाने जगतो, त्यालाच या जीवनाथा अर्थ कळतो. ग्रामीण भागातील स्त्रियांना स्त्रीजन्म नको, असे म्हणण्यासारखी परिस्थिती आढळते. त्यामुळे ज्या घरात मुलगी नको वाटते, त्या घरीच नेमकी मुलगी जन्माला येते. मुलगी जन्माला आल्यामुळे त्या कुटुंबातील मुलीची आजी, आत्या नाराजी व्यक्त करतात. पण त्यांना हे लक्षात येत नाही की, आपणही एक मुलगीच आहोत. ती नकोशी असल्याने तिचे नावही नकोशी किंवा नकुशा असेच पडते. पण काय केले आहे त्या मुलीने ? ती मुलगी देवीसमान असूनही आपल्याला त्या मुलींचे महत्व समजत नसेल, तर आपण या जन्मी मनुष्य म्हणून व्यर्थच आहोत ! संस्काराचे पालन करुनच पुढचे पाऊल उचलत असते. तिलाही हळूहळू स्त्रीचे महत्व समजायला लागते. अहो, झाशीची राणी, रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले या पण एक स्त्रीच होत्या. त्यांनी या देशातील वाईट प्रथा नष्ट करुन स्त्रियांना त्यांच्या हक्काचा देश बनवून दिला. झाशीच्या राणीने तर इंग्रजांविरुध्द बंड पुकारले. कारण या स्त्रीतही तेवढीच ताकत आहे. मग का ती नकोशी वाटते ? का तिला घरामध्ये मानाचा दर्जा मिळू शकत नाही ? कधी मिळेल या प्रश्नाचे उत्तर ? म्हणून मला म्हणावेसे वाटते.

'अंधार होत चालला आहे
एक आशेचा दिवा पाहिजे
सावित्रीच्या लेकींसाठी
पुन्हा एकदा झाशीची राणी पाहिजे.'

मुलगी हे एक ईश्वराने दिलेले वरदानच आहे. मुलगी ही वयाने मोठी झाल्यावर समाजाचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनही बदलत असतो. मुलगी शिक्षणासाठी धडपड करीत असते. या धडपडीमागे तिची अनेक स्वप्ने जिद्द ध्येये लपलेली असतात. तिला नेहमीच वाटत असते की, या शिक्षणामुळे माझ्याबरोबर कुटुंबातील व्यक्तींचेही नाव उज्ज्वल होईल. परंतु तिच्या शिक्षणाकडे कुणाचेही लक्ष नसते. घरातील व्यक्ती फक्त कुटुंबातील वंशाचा दिवा म्हणजेच घरातील मुलांच्या शिक्षणासाठी भरपूर पैसा खर्च करतात. पण त्या मुलाला शिक्षणात रस नसल्याने तो भरपूर वेळा नापास होतो. गरीब मुलगी अभ्यास करुन स्वतःच्या स्कॉलरशीपवर आपले शिक्षण पूर्ण करते. शिक्षणासाठी मुलीला बाहेरगावी जावे लागते. तिला अनेक अनेक अडचणी येतात. पण ती शिक्षण सोडत नाही. पण ती एक दिवस आपल्या स्वप्नांना उजाळा देऊन त्या शिखरापर्यंत पोहोचते.

मुलगी घरातील सर्व कामे करुन शिक्षणाकडे लक्ष देते. दिवसभर ती आई-वडिलांना शेतात कामे ही करु लागते. मुलीला आपल्या परिस्थितीची जाणीव असते. शाळेसाठी जर एकच ड्रेस असेल, तर ती जपून वापरते. आपली गरीब परिस्थिती आहे म्हणून ती लाज वाटून घेत नाही. कधी जर भाजीला मीठ असेल तर तेल नसते. तेल असते तर हळद नसते. तरी ही झाकून झाकून दोन घास खाते. पण बापाला कधीच कशाचा हट्ट करीत नाही.

खरेच ! मुलगी हे दुसऱ्याचे धन असते, असे म्हटले जाते. म्हणून तिच्यावर तसेच संस्कार केले

जातात. मुलगी वाढू लागली की, आई–बाबाला आनंदापेक्षा चिंताच जास्त सतावते. ग्रामीण भागात मुलीच्या लग्नाची फार घाई करतात. मुलीचा विवाह १८ वर्षे वयानंतर करण्यात यावा असा कायदा फक्त कागदावर राहिलेला आहे. मुलाला नोकरीला लावले जाते. मगच त्याचे लग्न लावले जाते. पण मुलगी चांगली शिकून स्वतःच्या पायावर उभी राहिलेली नसली तरीही तिचे लग्न करुन दिले जाते. मुलीला कोणाच्याही आयत्या भाकरी खायला आवडत नाही. लग्नानंतर मुलीला सासू–नंदा यांचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. हुंड्यासाठी तिला मारहाण केली जाते. आपल्या मुलीला हा त्रास कायम होऊ नये म्हणून बाप कर्ज घेत असतो. लग्नाच्या खर्चासाठी त्याला शेत विकावे लागते. काही दिवसांनी कर्जाची परतफेड न झाल्याने त्या गरीब बापाला आत्महत्या करण्याची वेळ येते. त्या मुलीला तरीही कुटुंबातील व्यक्तीचा त्रास होतच असतो. त्यामुळे तिच्या सगळ्या वाटा अंधारलेल्या असतात. त्यातही नवरा जर व्यसनी मिळाला, तर तिला स्वतःच्या कामाचे पैसे खर्च करुन आपल्या मुला–बाळांसाठी अन्न, शिक्षण व त्यांच्या सर्व गरजा भागवाव्या लागतात. आपल्यावर जी वेळ आली, ती आपल्या मुलांवर येऊ नये म्हणून ती बिचारी एकही दिवस घरी न राहता कुठेतरी काम करते.

स्त्रीवर अनेक प्रकारची बंधने लादलेली असतात. पुरुष हे सर्व बंधनातून मुक्त असतात. ज्या स्त्रीवर अत्याचार होतात. ती स्त्री कोणाची तरी आई, बहिण असतेच ना ? तिच्याही काही अपेक्षा असतात. परंतु त्या पूर्ण करण्यासाठी त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. स्त्रीवर अनेक बंधने लादलेली असतात. ती या बंधनात पूर्णतः



जखडलेली असते. तिला दुसऱ्याच्या भाव–भावना लवकर कळतात. स्त्रीला तिचा शेवट होईपर्यंत प्रत्येक वेळी संघर्ष करावा लागतो. स्त्रीला शेवटपर्यंत स्त्री म्हणून जगता यायला हवे. मुलगी म्हणून जन्माला आल्याचा मला आनंद आहे. मी पण एक मुलगी म्हणून जीवन जगते. शेवटी मला स्त्रीसाठी एवढेच म्हणायचे आहे की,

‘मृगाकडे कस्तुरी आहे
फुलात गंध आहे
माझ्याकडे काहीच नाही
असे म्हणू नका,
अंधाराला जाळणारा सूर्य
आपल्यातही आहे.
आव्हान करा त्या सूर्याला,
मग उगवेल तो सुध्दा तुमच्या आयुष्यात
नवीन क्षितीज अंधारमय रात्र संपवू
सोनेरी किरणांनी सजवू
मग रोपच उगवेल एक नवी सकाळी
उत्साहाने, ध्येयाने भरुन...’

**– शेलार सोनम**

# यशाच रहस्य...

**✻ यशाचे रहस्य –**

जीवन जगावे कसे ? आपल्याला जीवन यशस्वीरित्या जगायचे असेल तर आत्मविश्वास Self respect - i.e. I can do anything & give challenge for anything. ज्याचा स्वतःवर विश्वास नाही तो जीवनात काही करुच शकत नाही म्हणून सर्वात महत्वाची, गरजेची गोष्ट ती म्हणजे आत्मविश्वास.

त्याचप्रमाणे दुसरी गोष्ट एकाग्रता होय. एकाग्रता ज्ञानभांडार उघडू शकणारी एकमेव गुरुकिल्ली आहे. एखादी गोष्ट अथवा कल्पना आपण स्वीकारली की मग तिलाच आपले जीवन बनवणे, सर्वस्व बनवणे, तिचाच ध्यास घेणे, तिची स्वप्न पाहणे, तिच्यावर जगणे. आपला मेंदू, स्नायू, मज्ञातंतू शरीरातील अणूरेणू त्याच कल्पनेने भरून जाणे. इतर कोणत्याही विचाराला वा कल्पनेला थारा येवू न देणे. म्हणजे एकाग्रता, आणि हाच यशस्वी होण्याचा मार्ग आहे. प्रत्येक व्यक्तीचे चारित्र्य त्याच्या संस्काराद्वारे घडत असते. शुभसंस्काराचे वर्चस्व झाल्याचे हे चारित्र्य सच्चारित्र ठरते आणि कुसंस्काराचे वर्चस्व अथवा चष्मा चढल्यावर दुश्चरित्र ठरते. जीवनातील रहस्याचा यशाच्या रहस्याच्या मंत्र म्हणजे चारित्र्यशील जीवन जगणे.

आजच्या युगात या २१ व्या शतकात सर्वात महत्वाचा घटक तो म्हणजे 'शिक्षण' शिक्षणाचा उद्देश आहे की माणसाला विकसित होण्यास सहाय्य करणे त्यामुळे इच्छाशक्तीचा प्रवाह आणि अविष्कार आपल्या स्वतःच्या नियंत्रणाखाली येवून तो सुफलित होणे म्हणजे शिक्षण होय. परंतु आज आपण समाजात डोळे उघडून पाहिले की, आपल्या ह्या धनधान्य समृध्दी साठी विख्यात असणाऱ्या सुवर्ण भूमीत दोन घास अन्नासाठी कितीतरी किंकाळ्या उठताना ऐकू येतील. आपले शिक्षण हे दैन्य निवारण करे शकेल काय ? जे शिक्षण समाजाला जीवन संग्रामासाठी बध्दपरिकर करु शकत नाही. भुतदया देवू शकत नाही, सिंहपराक्रम उद्दीप्त करु शकत नाही ते शिक्षण काय शिक्षण संज्ञेला पात्र आहे ?

आपल्याला आज अशा शिक्षणाची गरज आहे की, ज्याने शील बनते, मानसिक शक्ती वाढते, बुध्दी चौफेर, विशाल होते. ज्यायोगे माणूस आपल्या पायावर उभा राहू शकतो. परकिय नियंत्रण नसलेल्या पध्दतीने आपल्याच ज्ञानाच्या विभिन्न शाखांच्या अभ्यासाची गरज आहे त्याचबरोबर इंग्रजी भाषेची, पाश्चिमात्य विज्ञानाची, अशा यांत्रिक विद्येची आणि इतर तत्सम सर्व गोष्टींची गरज आहे. ज्यायोगे उदयोग धंदयाची वाढ होवून माणूस, आपण आपली उपजीविका करु शकू आणि आपल्या समोर आलेल्या आपत्तींना समर्थपणे तोंड देवू शकू. त्याचप्रमाणे आपल्या शिक्षणाने आपल्यात माणूस निर्माण होवून आपण आपले जीवन यशस्वीरित्या जगू शकू.

आपल्याला सफल जीवन जगण्यासाठीचे चार मूलमंत्र म्हणजेच आत्मविश्वास, एकाग्रता, सच्चरित्र आणि योग्य शिक्षण होय. या मंत्रांनीच आपण यशाचे रहस्य उलगडून जीवनात नक्कीच यशस्वी होवू.

**– भाग्यश्री भागवत पांढरे**

***Smile is the most beautiful expression in the world...***
***Relationship never dies a Natural death***
***They are murdered by Ego, Attitude and Ignorance...***



**Khandave Pooja**







## द रिअल हिरो
# डॉ. प्रकाश बाबा आमटे

The Prakash Murlidhar (Baba) Amte is a medical doctor & Social worker from Maharashtra. He was Born on 26th Dec. 1948. He & his wife Dr. Mrs. Mandakini Amte were awarded the 'Magsaysay' Award for community leadership in 2008 for their philantrophic work in the form of the Lok Biradari Prakalp amongst the 'Media Gonds' in Gadshiroli district of Maharashtra & the neighbouring states of Maharashtra & Madhya pradesh.

डिसेंबर १९७० ला बाबांनी सहलीच्या निमित्ताने गडचिलरोलीचा हेमलकसा परिसर डॉ. प्रकाश आमटे यांना दाखविला. वास्तविक या भागातील आदिवासींची जीवनशैली जवळून पाहता यावी हा त्यांचा उद्देश होता. परंतु वैद्यकिय शिक्षण घेणाऱ्या आपल्या मुलास हा परिसर आवडेल की नाही या गोंधळात असणाऱ्या बाबांनी सहल म्हणून आदिवासी भागात आणले आणि तेथील लोकांचे कमालीचे दारिद्र्य व मूलभूत सोयीचा अभाव पाहून मन व्यथित झाले. याच काळात त्यांनी आपला उर्वरित काळ आदिवासी लोकांतच घालवायचा हे मनात पक्के झाले. ज्या आदिवासींना शिक्षणाचा गंधही नाही. त्यांच्या ओराग्यासाठी काम केले पाहिजे असे बाबांना वाटले आणि तेथूनच मनपरिवर्तन झाले.

नागपूरसारख्या महानगरात वैद्यकिय शिक्षण (MBBS) पूर्ण केल्यानंतर अतिशय दुर्गम भागात आदिवासींची सेवा करण्याची जबाबदारी बाबांनी त्यांच्यावर सोपविली. येथील आदिवासींच्या व्यथा व समस्या जवळून पाहिल्या. आरोग्य सेवा व विकासापासून हा समाज कोसो दूर होता. २३ डिसेंबर १९७१ ला लोक बिरादरी प्रकल्प आकारण्यात आला. तत्पूर्वी डॉ. मंदाकिनी यांच्याशी विवाह झाला. आदिवासीचा सेवेचा संकल्प मंदाकिनी यांना सांगितला व त्यांनीही अतिशय मनापासून डॉ. प्रकाश यांना साथ दिली ती अजूनही सुरु आहे.

गवताच्या झोपडीतून या कार्यास सुरुवात झाली. तुटपुंज्या साधनांसोबत आदिवासींच्या आरोग्य संवर्धनास सुरुवात केली. अगदी दवखानाच्या नावावर झोपडी होती. आरोग्याच्या बाबतीत अतिशय अंधविश्वासू व मांत्रिकावर विश्वास ठेवणारा असा हा आदिवासी समाज होता. आजारपणात यांत्रिकाकडे जाणाऱ्या या समाजाला दवाखान्यापर्यंत आणणे अतिशय जिकिरीचे काम होते. परंतु हळूहळू विश्वास संपादन करुन आणि उपचाराचे महत्व त्यांना पटवून दिले. वाहतुकीचे साधन नसल्यामुळे रुग्णांना खाटेवर ठेवून आणले जायचे. अनेक कि.मी. च्या प्रवास पायीच करावा लागत असे. रुग्णांवर रात्ररात्र उपचार केले. आजही दुरवरून रुग्ण येतात आणि अनेक असाध्य रोगावर उपचार घेतात. ही आरोग्य जागृती व्हायला खूप काळ खडतर प्रवास करावा लागला. सोबतच शिक्षणाचा प्रसारही आवश्यक होता आणि यासाठी १९७६ साली पहिली शाळा स्थापन केली. अडचणी अनंत. शाळेत मुले पाठवायला पालकांचा विरोध होता. परंतु त्यांनी गावोगावी फिरुन शाळेसाठी मुले जमा केली.

आदिवासी समाजाने स्त्रीला कायम स्वातंत्र्य दिले ही बाब अतिशय वाखाणण्या जोगी आहे. ज्या सुशिक्षित समाजाला 'स्त्रीभूण हत्या' मोठ्या प्रमाणात

पाहायला मिळतात त्या समाजाने आदिवासींकडून आदर्श घ्यावा. असा मुलींचा जन्मदर ही या समाजाची अत्यंत जमेची बाजू आहे. स्त्रीला आपला जोडीदार निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देणारा हा समाज आहे. अतिशय सन्मानाने स्त्री जातीला वागविणे ही या समाजाची संस्कृती आहे. या भागात प्रकर्षाने ती पाहायला मिळते. माणुसकी जपणारा समाज म्हणून आदिवासींकडे पाहिले जाते. त्यांच्या स्त्री सन्मावृत्ती मुळेच.

आदिवासींसोबत काम करायचे ठरल्यावर प्रथम त्यांची भाषा, चालीरिती ते शिकले. हा समाज मुळातच सहिष्णू व गरजा कमी असणारा आहे. उत्पन्नाचे कायम स्त्रोत नसल्यामुळे या समाजाला आर्थिक विवंचनेत रहावे लागले. जंगलातील साधनांवर उपजिविका अवलंबून असल्यामुळे समाज अर्धपोटी रहायचा. शिक्षिणाचा अभाव असल्यामुळे कदाचित अशी परिस्थिती उद्‌भवली असावी. अलिकडिल काळात शिक्षणामुळे आदिवासी समाजात खूप मोठे परिवर्तन घडून आले आहे.

गेली ४० वर्षे आदिवासी समाजाची सेवा करताना डॉ. आमटे यांच्यातील अनेक गुण व कौशल्य पाहायला मिळतात. विशेष म्हणजे पत्रिका पाहून लग्न करणाऱ्यांत हा समाज मोडत नाही. लग्नासाठी मूहूर्त वगैरे आजही या समाजाला माहित नाही. अतिशय साधेपणाचे भावविश्व या समाजाचे आहे. या समाजाची संपूर्ण कायापालट करण्याचे श्रेय डॉ. प्रकाश आमटे व तितक्याच जबाबदारीने त्यांना खंबीर साथ देणाऱ्या डॉ. मंदाकिनी आमटे यांना जाते. आदिवासी समाजाची जीवनशैली, सामाजिक प्रश्न, आर्थिक प्रश्न व भावविश्व समजून घेण्याचे श्रेय या खऱ्याखुऱ्या हिरोला जाते. अशा या आदर्श व्यक्तिमत्वाला कोटी कोटी प्रणाम !

**प्रा. दरेकर अनुराधा विजय**




'स्त्री', 'महिला', 'मुलगी' किंवा तनया हे सर्व शब्द 'स्त्रिलींगी' आहेत. पृथ्वी हा देखील शब्द स्त्रिलींगीच आहे. आज काय दिसून येते की स्त्रियांवर, महिलांवर, मुलींवर, अत्याचार होतोय. बलात्कार होतोय अशा परिस्थितीत पृथ्वी देखील सुटली नाहीये. पृथ्वी वर देखील मानवांकडून अन्याय अत्याचार होतोय. पृथ्वीवरील वृक्षतोड नैसर्गिक संपत्तीवर घाला शतला जातोय यामुळे पृथ्वीवरील समतोल ढासळतोय. तिला आता या विश्वभर होणाऱ्या अत्याचरांपासून परावृत्त करण्याची वेळ आली आहे.

मग हे करणार कोण ? तर आपणच महिलांवरील अत्याचाराला कारणीभूत आहोत. तर पृथ्वीवरील अन्यायाल देखील आपणच कारणीभूत आहोत. अशा य दुर्दैवी परिस्थितीत आपणच अपल्यावर बंधने घालून घेऊन घ्या त्यासाठी अशी कृष्णकृत्ये करणाऱ्यांना वेळीच थांबविले पाहिजे. त्यासाठी जनजागृती केली पाहिजे आणि तरच.. आणि तरच आपल्या मुलींचे, आपल्या माता– भगिनींचे आपल्या पृथ्वीचे भवितव्य उज्वल आहे अन्यथा ह्या दोघांचेही काही खरे नाही आणि त्याचबरोबर मानव समाजाचे देखील...

**– प्रा. वाघ एस.जी.**

# मोबाईल आणि मी...




आज मोबाईल आणि प्रेम यापैकी एकालाच निवडण्याची वेळ आली तर आपण नक्कीच मोबाईलची निवड करण्याची शक्यता अधिक आहे. नाही का ?

आज मोबाईल हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला आहे. तो सतत आपल्या सोबत असतो. काही क्षणासाठी जरी तो आपल्या पासून विभक्त झाला, तर आपले मन बेचैन होते. आपल्याला काही सुचेनासे होते, आपल्या आयुष्यात आता काहीच सुरळीत चालु शकणार नाही असेही वाटून जाते.

आता तर माणूस आणि मोबाईल यांच्यातील प्रेम लक्षात घेऊन त्याला जवळ जवळ सर्वत्र माणसासोबतच वावरण्याची मान्यताच मिळाली आहे.

पण आता काही लोकांना त्याच मोबाईलचा त्रासही होऊ लागला आहे हे सत्यही नाकारता येणार नाही. आपल्यावरील कोणाचे प्रेम अति ओतू जायला लागलं तर आपल्याला त्याचाही त्रास होऊ लागतो. मोबाईल तर शेवटी एक यंत्रच आहे. ती अपल्या सर्वाच गरजा जरी पुऱ्या करण्यास कारणीभूत ठरत असला तरी हे सतत त्याच्यावर अवलंबून राहणं आपल्याला कधी ना कधी त्रासदायक ठरणारच आहे.

पूर्वी मोठ्या आकारात असणारा मोबाईल कालांतराने लहान होत गेला आणि आता त्याचा आकार पुन्हा वाढत वाढत जवळ मिनी लॅपटॉप इतका झाला. पूर्वी फक्त संपर्काचं साधन असणारा मोबाईल आता कित्येकांसाठी त्यांच्या पर्यायी मेंदू झालेला आहे. त्याचबरोबर कित्येकांसाठी तो एखाद्या ज्ञानाच्या भांडारापेक्षा कमी राहिलेला नाही.

एक दिवस मी माझा मोबाईल घरीच विसरले नेमका त्याच दिवशी मला एक महत्वाचा फोन येणार होता मग काय मोबाईलसाठी मला पुन्हा अर्धातास प्रवास करुन माघारी घरी जावे लागले. तेव्हा मला जाणवलं आपण मोबाईल नावाच्या यंत्राचे गुलाम झालेले आहोत. पूर्वी आपल्या तालावर नाचणारा मोबाईल आता आपल्यालाच त्याच्या तालावर नाचवू लागलेला आहे.

मोबाईलमुळे फक्त माणसेच जवळ आली पण त्यांची मने मात्र कायमची दूर गेली. पूर्वी प्रेम डोळ्यातून मेंदूपर्यंत पोहोचत असे पण हल्ली ते कानातून मेंदूपर्यंत पोहोचत असावं. मोबाईलच्या माध्यमातून दिवस रात्र काय बोलत असतात हाच सध्या एक संशोधनाचा विषय झालेला आहे. मोबाईल नेहमी मी जेथे असेन तेथे आजूबाजूलाच कोठेतरी पडलेला असतो. मी मोबाईलवर फेसबुक वगैरे साठी इंटरनेटचा वापर अपरिहार्य परिस्थितीतच करीत असते.

भविष्यात कामाच्या ठिकाणी मोबाईलच्या वापरावर पूर्णपणे बंदी घातली जाण्याची शक्यता आता निर्माण झालेली आहे. मोबाईलमुळे चांगल्या दिसणाऱ्या आणि गोड आवाज असणाऱ्या व्यक्तींना अचानक खूप महत्व प्राप्त झालेले आहे.

मोबाईलमुळे माणूस परावलंबी, आळशी, चंगळवादी आणि काहीस बेफिकिरही झालेला आहे. मनुष्यास मोबाईल वापरायचा दुष्परिणाम म्हणून हल्ली काही आजारांचाही सामना करावा लागत असल्याच्या बातम्या येत असतात पण त्यात किती तथ्य आहे देवच जाणे !

आज प्रत्येकाने आपण मोबाईलच्या किती आहारी गेलेलो आहोत हे आता नव्याने तपासून पाहण्याची नितांत आवश्यकता आहे हे मात्र नक्की...

**– प्रा. बोरुडे एस.जी.**

# अहिल्याबाईची लोकोपयोगी कार्ये

भारतीय इतिहासात अलिकडच्या काळात, मुख्यतः मराठ्यांच्या इतिहासात ज्या प्रख्यात स्त्रिया होऊन गेल्या. त्यात अहिल्याबाईचा क्रम फार वर लागेल ह्या विषयी शंकाच नाही. मराठी इतिहासात जिजाबाई भोसले, राधाबाई, गोपिकाबाई, राणी लक्ष्मीबाई अशा अनेक प्रख्यात स्त्रिया होऊन गेल्या. त्यांनी यथाशक्य कर्तबगारीही दाखविली. पण अहिल्याबाईची तुलना यापैकी कोणीशीही नीट करता येणार नाही. जिजाबाई मोठी कर्तबगार स्त्री होती, पण दादाजी कोंडदेवाच्या आणि विशेषतः शिवाजी राज्यांच्या प्रचंड कर्तबगारीमुळे तिची कर्तबगारी काहीशी फिकी पडते. शिवाय तिच्या कर्तबगारीचे पैलुही आपणास फारसे ज्ञात नाहीत. अहिल्याबाईने केलेल्या कार्याची पुष्कळ माहिती आपणास तत्कालीन पत्रव्यवहारावरुन व बखर वाङ्मयावरून मिळत असल्याने तिची कर्तबगारी अधिक विस्ताने सांगता येते.

आपल्या भारतात चारधाम व बारा ज्योतिर्लिंग ही हिंदूना अत्यंत पवित्र अशी स्थाने आहेत. त्यातील बहुतेक स्थाने मुसलमानी अमलात राज्यकर्त्यांनी उध्वस्त केली होती. बारा ज्योतिर्लिंगापैकी सर्वात महत्वाचे ज्योतिर्लिंग विश्वेश्वराचे मंदिर. विश्वेश्वराचे देऊळ मुसलमानी अमलात चार पाच वेळा तोडले गेले. औरंगजेबाने मात्र त्याची शेवटची मोडतोड करुन त्याच जागी मशीद उभारली. मराठी अंमल सुरु झाल्यावर त्या स्थानाचा जिर्णोध्दार करावा असे अनेकांच्या मनात आले पण हे काम पूर्णत्वास गेले नाही. अहिल्याबाई सरजातांचा कारभार पाहू लागल्यावर तिच्या मनात केवळ विश्वेश्वराच नव्हे तर अनेक ठिकाणच्या उध्वस्त मंदिराचा जिर्णोध्दार करावा असे आले.

वाराणशीचे विश्वेश्वराचे स्थान सर्वाधिक पवित्र तेव्हा त्याचा जिर्णोध्दार मूळ जागेजवळच जागा घेऊन अहिल्याबाईंनी केला. परळीच्या वैजनाथाच्या देवळाचा अहिल्याबाईंनी जिर्णोध्दार केल्याचा तेथे शिलालेखावर आहे. वेरुळच्या घृष्णेश्वराचे स्थान निजामी राज्यात असल्यामुळे उध्वस्त झाले होते. त्याचा जिर्णोध्दार अहिल्याबाईने केला.

अहिल्याबाईने ज्याप्रमाणे देवस्थानचा जिर्णोध्दार केला त्याप्रमाणे अनेक तिर्थस्थानांचा घाट, कुंडे इ. बांधून जिर्णोध्दार केला. तसेच अहिल्याबाई होळकरांनी राज्याच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या त्या पुढीलप्रमाणे आहेत. (१) उद्योगधंद्याच्या विकासाला प्राधान्य. (२) वस्त्रोउद्योगात विशेष सवलती देवून व्यवसाय भरभराटीला आणला. (३) पशुपक्षांसाठी पाण्याची चाऱ्यांची व्यवस्था केली. (४) गोशाळा सुरु केल्या. (५) निःशुल्क न्यायव्यवस्था सुरु केली. (६) पंचायतीची स्थापना केली. (७) परराज्यात वकिलांची नियुक्ती केली इ. कल्याणकारी योजना आखून त्या-त्या व्यवस्थेची काटेकोरपणे अंमल बजावणी केली.

एक इंग्रज अधिकारी व इतिहासकार जॉन माल्कम याने देवीचे वर्णन पुढील शब्दात नेमके केले आहे. 'हिंदुस्थानातील लोक तिला देवता मानतात व तशीच तिची योग्यताही होती. स्त्री असून निगर्वी, श्रध्दाळू व प्रजाहित दक्ष प्रजेतर योग्य तितका अधिकार गाजवणारी अशी ही राणी म्हणजे कर्तृत्व व परमेश्वरावर भरोसा ह्या दोन गुणांची उत्कृष्ट उदाहरण तिच्या ठायी साधुत्व आणि राज्यकारपटुत्व यांचा संगम झाला होता.'

**- प्रा. सोनवणे सुजाता रामदास**

# आयुर्वेदाचे जीवनातील महत्व...

सर्वात प्राचीन व्याधी बरी करणारे शास्त्र म्हणून आयुर्वेद ओळखले जाते. हे एक जीवनाचे जगण्याचे शास्त्र आहे. या शास्त्राचा उगम ५०० वर्षापूर्वी झाला. परदेशात आढळणाऱ्या नैसर्गिक उपचारांचे मूळ आयुर्वेदातच आहे. हे पहिले शास्त्र आहे की ज्यामध्ये शरीर व आत्मा यांच्या साहाय्याने व्याधी बऱ्या केल्या जातात. आयुर्वेद हे वेद आणि विद्वान योगी आणि गुरु यांनी सांभाळून ठेवले आहे. हे शास्त्र वनस्पती वर्ग, प्राणी वर्ग आणि पर्यावरणावर आधारलेले आहे आणि पाचशे वर्षाच्या इतिहासात टिकून आहे. शहरी भाग सोडून देशातील जास्त भागात आरोग्याची काळजी घेण्यासाठी आयुर्वेदाचा वापर केला जातो.

**आयुर्वेद खरा अर्थ –** आयुर्वेद हा शब्द दोन मूलभूत कल्पनातून तयार झाला आहे. आयु आणि वेद. आयु म्हणजे आयुष्य व वेद म्हणजे ज्ञान किंवा शास्त्र. आयुर्वेदाचा भर हा आजार / रोग होण्यापासून वाचविणे व योग्य व चांगल्या वनौषधी वापरणे. हे शास्त्र आरोग्य संतुलित ठेवण्यास मदत करते. आयुर्वेदानुसार जीवन म्हणजे ज्ञान, मन, शरीर व आत्मा यांचे एकत्रिकरण आहे. यावरुन असे सिध्द होते की, आयुर्वेद हे फक्त शरीर किंवा शरीर लक्षणापुरते मर्यादित नसून आध्यात्मिक, मानसिक व सामाजिक पैलु असणारे शास्त्र आहे व ज्यामुळे तंदुरुस्त व आरोग्यपूर्ण जीवन जगण्याचा हा एक सर्वांगसुंदर मार्ग आहे.

आयुर्वेद हे प्राचीन भारतीय वैद्यक शास्त्र आहे. ही एक नैसर्गिक आरोग्य रक्षण करणारी पध्दती आहे. हे शास्त्र शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य निसर्गाच्या सहाय्याने टिकविण्यास मदत करते. तसेच आयुर्वेद हे त्या आजाराच्या मुळाशी नैसर्गिक उपचारांच्या मदतीने जाते व आजारांचे मूळ नष्ट करुन रुग्णांची प्रतिकार शक्ती वाढविते.

आयुर्वेदात प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार उपचार केले जातात. ज्यावेळी शरीर थोड्या प्रमाणात तणाव आणि ऊर्जा स्त्रोताने संतुलित असते त्यावेळी शरीराची नैसर्गिक संरक्षण व्यवस्था ही बळकट असते आणि सहजतेने ती रोगप्रतिकार करु शकते. यामध्ये नैसर्गिक वनौषधी व खनिज पदार्थ रीफाइंड स्वरूपात वापरले जातात. या कारणांमुळे यात कोणताही धोका नाही व साईड इफेक्टस नाहीत तसेच हे शास्त्र अतिप्राचीन व अतिग्रस्त नैसर्गिक शास्त्र आहे. तसेच आयुर्वेदामध्ये आपल्या रोज घरगुती वापरातल्या वनस्पतींचा औषध म्हणून उपयोग केला जातो. त्यापैकी काही निवडक वनस्पती खाली दिलेल्या आहेत.

✲ **वेखंड –** वेखंडात बाष्पनशील तेल असल्याने ते वायुनाशी म्हणजे पोट फुगणे व पोटदुखी यावर गुणकारी आहे. तसेच वेखंडामुळे लहान मुलांची मेधा व आकलनशक्ती वाढवण्यासाठी तसेच उच्चार स्पष्ट होण्यासाठी हे उत्तम आहे.

✲ **ज्येष्ठमध –** ज्येष्ठमध हे खोकला व दम्यामध्ये कफ सुटण्यासाठी मदत करते. तसेच यामुळे आवाज गोड व्हायला मदत होते.

✲ **तुळस –** या झाडाची पाने आणि बिया औषधी आहेत. पानापासून वाढलेल्या तेलात जीवाणू व किटाणू नष्ट करण्याचा गुणधर्म आहे. तसेच या पांनाचा काढा घरगुती उपाय म्हणून सर्दी पडण्यासाठी नेहमी वापरण्यात येतो.

✲ **कोरफड –** भाजल्याने झालेल्या जखमेवर कोरफडीचा गर लावावा, तसेच नेत्रविकारात

कोरफड आणि डाळींबाची पाने एकत्र वाटून त्याचा लेप लावावा.

* **हळकुंड** – हळद, कफ, वातशामक, रक्तशुध्दी करणारी आणि यकृताची कार्यक्षमता वाढविणारी आहे. तसेच त्वचा उजळण्यासाठी व त्वचेचे आरोग्य नीट राहण्यासाठी हळद गुणकारी आहे.

**– प्रा. वाघ स्वाती गोरक्षनाथ**

# आयुष्य

आयुष्यात स्वप्ने पाहताना
वास्तवाला विसरायच नसत
गुलाबाला स्पर्श करताना
काट्याचं भान मात्र ठेवायचं असत
शत्रुशी लढत असताना त्याला
कधी कमजोर समजायच नसतं
उध्दस्त झालेले आपले जीवन
शून्यातून उभं करायच असतं
आपल्या वेदनांच मिठ मात्र
दुसऱ्याच्या दुःखावर चोळायच नसतं
खालेल्या मिठाला जिवा भावाच्या
मित्राला कधी विसरायच नसतं
आई आणि वडिलांचे ऋण
फिटल्याशिवाय मरणाचं नाव सुध्दा
घ्यायचं नसतं....

– मोरे प्रियंका मच्छिंद्र
एफ.वाय. बी.एस्सी.

# मन...

*मनात खूप काही असत*
*सांगण्यासारखं पण...*
*काही वेळा शांत*
*बसणंच बर असत...*
*आतल दुःख मनात ठेवून*
*अश्रु लपवण्यातच आपलं*
*भलं असत...*
*एकांतात रडलं तरी चालेल*
*लोकांमध्ये मात्र हसावचं लागत*
*जीवन हे असच असत*
*ते आपल असलं तरी*
*इतरांसाठी जगाव लागत*
*रात्र नाही स्वप्न बदलते*
*दिवा नाही वात बदलते*
*मनात नेहमी जिंकण्याची*
*आशा असावी... कारण नशीब*
*बदलो ना बदलो...*
*पण वेळ नक्कीच बदलते....*

– कु. खांदवे पुजा पोपट
(एफ.वाय.बी.एस्सी.)

# मैत्री

एखाद्याशी हसत हसत
तितक्याच हक्कानं रुसता आलं पाहिजे
समोरच्यांच्या डोळ्यात
आलेलं पाणी अलगत पुसता आल पाहिजे
मान अपमान मैत्रीत काहीच नसते
आपल्याला फक्त समोरच्यांच्या
हृदयात राहता आलं पाहिजे.

# मुलगी आहे म्हणून एवढचं वाटत

हाय ! हॅलो !! मित्र–मैत्रिणींनो,

मुलगी वाचवा, देश वाचवा, असं काही म्हणत मला मोठेपण गाजवायचं नाही. तर खरचं तुमच्यापर्यंत माझ्या मनातील मुलीबद्दलची कोणाची भावना कशी असते व ती कशी असायला हवी ? असं आम्हां मुलींना वाटतं. एवढचं तुमच्यापुढे व्यक्त करायचं आहे. म्हणतात की, आपल्या देशात स्त्रीला एक अनन्य साधारण महत्व आहे. एक तर त्या स्त्रीला घरातील देवी समजून पूजलं जातं नाही तर दासी समजून तिला कवडीमोल ठरवलं जात. पण मी तुम्हाला विचारते की तुम्हाला काय वाटतं ? काय खरचं स्त्रीला पुरुषांच्या समानतेन वागू दिला जातं ? काय खरचं मुलींना आपल्या भावना पूर्णपणे मांडण्याचा हक्क आहे ? मी पूर्णपणे नाही असे ही म्हणणार नाही. मित्र–मैत्रिणींनो आहे आपल्याच जवळच्या नात्यातील एखादी मुलगी. शेजारील एखादी मुलगी जिला आपण सगळ्या गोष्टी करण्याची परवानगी असते. मनसोक्तपणे प्रत्येक गोष्ट आत्मसात करताना पाहतो. पण ज्यांना यापैकी काहीच मिळत नाही त्या मुलीचं काय ? काय बरोबर ना ... !

मला काय एवढंच वाटत की ज्या भारत देशात स्त्रीला देवी मानलं जात. ज्या भारत देशात कल्पना चावला. झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, जिजाऊ या सारख्या थोर स्त्रिया होऊन गेल्या ज्यांनी या समाजाला मानाचा फेटा चढवला, त्याचं भारत देशात मित्र–मैत्रिणींनो दिल्ली सारख्या ठिकाणी निर्भया नावाचा एका मुलीचा विनयभंग केला जातोय का ? पूर्वीच्या काळी राजे–महाराजे, संत नेते इ. सगळे थोर व्यक्ती होते म्हणून मग मी म्हणते आजच्या पुरुषांमध्ये, मुलांमध्ये नाही का थोरपण, मोठपणं, स्त्रीबद्दल आदर, समजूतदारपणा दाखवण्याची हिंमत. मी कोणा पुरुषांबद्दल वाईट किंवा वेगळी बोलते असे काह नाही. तुम्ही कोणी असे वाटून ही घेऊ नका. पण म्हणतात, ना की व्यक्तीने आपल्याहून जग ओळखावं तसचं आहे. मग ज्याने त्याने आपआपल्या घरातल्या स्त्रीचा आदर केला पाहिजे म्हणजे सर्वच स्त्रीचा आदर करतील, पण मग एवढा आदर सन्मान स्त्रीला मिळाला म्हणून गर्वाने फुगून तोऱ्या–ताठ्यान वागायचं नाही. आपण आपल्या घराची, समाजाची आणि देशाची इज्ज़त आहोत हे सुध्दा विसरायचं नाही. आपल्यावर आपल्या आई वडिलांची विश्वास आहे, समाजाचा विश्वास आहे. त्या विश्वासाला तडा जाणार नाही असे आपले वर्तन व विचार मुलींनी ठेवायला हवेत. मुलगी आहे तर कोमल आहे पण कमजोर नाही. हे अपण सिध्द करायचं आहे. पण आपलं चारित्र्य आणि शील संभाळूनच.

मुलींसाठी म्हणजेच स्त्री–पुरुष समानता राहावी. म्हणून मोठ–मोठ्या योजना राबविल्या जात आहेत. मोठ–मोठी व्याख्यान दिली जात आहेत. मग आम्हा मुलींचाही त्यात वाटा असायला हवा असं मला वाटतं आपल्याला काय फारच अगदी पुरुषांपेक्षा मोठ होऊन त्यांना कमीपण दाखवायचे असे ही नाही. फक्त त्यांच्या समान वागणूक मिळावी. कामाचा दर्जा समान मिळावा आणि आपल्यातल्या स्त्रीत्वाची भावना जपली जावी. एवढचं कारण स्त्री आणि पुरुष हे आयुष्याचा. जिवनाच्या आणि भावी पिढीच्या रथाचे दोन चाक आहेत. मग दोन्ही चाक समान असले तरच आपण जीवनाचा रथ व्यवस्थित आणि सरळ चालवू शकतो. नाही का ?

म्हणून मुलींनो या आयुष्यात म्हणण्यापेक्षा या जिवनात आपण आपले विचार आणि आपल्या भावना अगदी संभाळून ठेवायला हव्यात. महत्वाचं म्हणजे आपण आपले Consicious clear ठेवायला हवेत. आपण आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करुन त्याविषयी Confident राहिलं पाहिजे. ज्याने करुन आपण स्वतःही सदविचारी राहतील आणि इतरांनाही सदविचारी ठेवतील. कारण जिच्या हाती पाळण्याची दोरी... तिच जगाला उध्दारी... आणि म्हणूनच मला म्हणावसं वाटते की....

मी मुलगी आहे म्हणून
मी मुलगी आहे म्हणून
अभिमान वाटतो मला या भारत देशाचा
ज्याचं मला राष्ट्रीयत्व मिळाल भारतीय म्हणून
अभिमान वाटतो या मातीचा
जिच्यावर खेळलो बागडलो आम्ही
तिची लेकरे म्हणून...
अभिमान वाटतो या थोर नेत्यांचा...
ज्यांचे विचार मला मिळाले अनमोल देणगी म्हणून
अभिमान वाटतो त्या थोर आई–वडिलांचा
ज्यांची लाडकी लेक म्हणवून घ्यायचा हक्क
मला मिळाला म्हणून...
अभिमान वाटतो त्या थोर शिक्षकांचा
ज्यांनी ज्ञानाची शिदोरी दिली गुरुवर्य म्हणून
अभिमान वाटतो त्या बरोबर महाविद्यालयाचा
ज्यानं आम्हाला घडवलं एक विद्यार्थिनी म्हणून
आणि अभिमान वाटतो मला स्वतःचाच कारण
मी एक मुलगी आहे म्हणून
मुलगी आहे म्हणून...

**– योगिता कांबळे**



## बाप....

आईचे गुणगान खुप झाले आता !
पण बिचाऱ्या बापाने काय केले नाही ?
बिकट प्रसंगी वडिलच सदा प्रश्न सोडवतात
आपण फक्त गातो आईचीच गोडवी ।
आईकडे असतील अश्रुंचे पाट
तर वडिल म्हणजे संयमाचे घाट
आठवते जेवण बनवणारी प्रेमळ आई
त्या शिदोरीची सोय वडिलच करी
देवकी यशोदेचे प्रेम आठवा
टोपलीत नेणारा वासुदेव मनात साठवा
रामासाठी सीतेची झाली कसरत
पुत्र वियोगाने मरण पावला दशरथ
काटकसर करुन मुलास देणारा पॉकेटमनी
स्वतः मात्र वापरी शर्ट पॅन्ट जुनी
मुलीला हवे ब्युटी पार्लर नवीन साडी
घरी बाप आटपतो बीना साबणाची दाढी
वयात आल्यावर मुले आपल्या विश्वात मग्न
बापाला दिसे मुलांचे शिक्षण आणि मुलींचे लग्न
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढून लागते थाप
मुलीच्या स्थळासाठी उंबरटे झिजवणारा बाप
जीवनभर मुलामुलींच्या पाठीशी वडिलांची सदिच्छा
सर्वांनी  समजून घ्यावं हीच शेवटची इच्छा !

**– भिंगारदिवे शकुंतला एकनाथ**

# स्पर्धा परीक्षा - नवीन बदल



एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी. अशा दोन्ही परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थी मित्रांना एम.पी.एस.सी ची पूर्व परीक्षा तितकीशी अवघड कठीण वाटत नाही. त्यांचे स्कोरही सरासरी १६० च्या आसपास असतात. तर फक्त एम.पी.एस.सी. करणाऱ्या विद्यार्थी मित्रांच्या स्कोरची सरासरी १३०–१३५ च्या दरम्यान आहे. माझ्यामते याचे मुख्य कारण म्हणजे यु.पी.एस.सी च्या विद्यार्थी मित्रांची अशा प्रकारच्या प्रश्नांना सामोरे जाण्याची तयारी व मानसिकता असते. एम.पी.एस.सी. करणाऱ्या विद्यार्थी मित्रांनी यु.पी.एस.सी चे पेपर त्यांची प्रश्न. प्रश्न विचारण्याची पध्दत त्याचे स्वरूप यांचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे होते आणि त्यावरुन आपल्या तयारीची खोली व रुंदी वाढवणे आवश्यक आहे.

प्रश्नागणिक विश्लेषण केल्यास असे लक्षात येते की पेपर तितकासा कठीण नसतो.

मॉडेलप्रमाणे पेपरचे विश्लेषण पुढीलप्रमाणे सांगता येईल.

राज्यसेवा पूर्वपरीक्षा २०१४ पेपर – १
विज्ञान – २७ प्रश्न
इतिहास – १७ प्रश्न
चालू घडामोडी – १० प्रश्न
राज्यव्यवस्था – ०९ प्रश्न
सामान्यज्ञान – ०९ प्रश्न
पर्यावरण – ०७ प्रश्न
सामाजिक–आर्थिक विकास – ०६ प्रश्न

वरीलप्रमाणे विश्लेषण पाहता प्रश्न आयोगाने दिलेल्या अभ्यासक्रमाबाहेरचे होते असेही म्हणता येणार नाही. मग अनेक विद्यार्थी मित्रांना कठीण वाटल्याचे कारण काय ? यावर विचार केल्यास असे लक्षात येते की खोली व व्याप्ती आणि आयोगाची परीक्षार्थीकडून असलेली अपेक्षा यात मोठा फरक आहे. यासाठी इतिहासावरील प्रश्नांचे उदाहरण देता येईल. कारण इतिहास या घटकावर विचारलेल्या १७ प्रश्नांपैकी ज्या आधुनिक भारताच्या इतिहासाची तयारी विद्यार्थी जास्तक करत असतो पण त्यावर फक्त ७ प्रश्न होते. म्हणजेच १० प्रश्न हे प्राचीन व मध्ययुगीन भागावर आधारीत होते आणि पूर्व प्रश्नपित्रकेशी याचे प्रमाणे १०% इतके आहे. यावरुन हे लक्षात येते की अभ्यासक्रमात दिलेला कोणताही भाग वगळता येणार नाही. प्राचीन आणि मध्ययुगीन भारताच्या इतिहासालाही विसरुन चालणार नाही. प्राचीन व मध्ययुगीन या घटकावर जे प्रश्न आहेत ते एनटीईआरटी पातळीवरचे आहेत. त्यामुळे या घटकाची तयारी फार खोलात जाऊन करावी लागते असेही नाही पुस्तकी अभ्यासाबरोबरच चौफेर वाचन दृकश्राव्य माध्यमाचा वापर यांच्यामुळेही आपला स्कोर वाढण्यास मदत होते.

सीएसएटी च्या पेपरचे विश्लेषण पाहू. २०१३ च्या सीएसएटी च्या पेपरच्या तुलनेत २०१४ च्या पेपरची काठीण्यपातळी थोडीशी वाढवलेली होती पण २०१३ चा पेपर हा बदललेल्या

अभ्यासक्रमातील पहिलाच पेपर होता हे ही लक्षात घ्यावे लागते त्यामुळे या वर्षीच्या पेपरची पातळी थोडी वर जाईल असे वाटतच होते पण यासारख्या पेपरला सामोरं जाण्यासाठी सराव आणि सरावच गरजेचा आहे.

**या पेपरचे विश्लेषण पुढीलप्रमाणे –**

राज्यसेवा पूर्व परीक्षा २०१४ पेपर –२

कॉम्प्रेहेन्शन – ३८ प्रश्न, मराठी कॉम्प्रेहेन्शन – ०५ प्रश्न, इंग्रजी कॉम्प्रेहेन्शन – ०८ प्रश्न, GMAT - १५ प्रश्न, प्राथमिक संख्याज्ञान – ०३ प्रश्न, तर्क शुध्द कारणमिमांसा व विश्लेषण क्षमता – प्रश्न ०६, निर्णय घेणे व समस्या सोडवणे – ०५ प्रश्न.

पेपर – २ चे विश्लेषण पाहता यामध्ये २०१३ च्या तुलनेत काठिण्य पातळी सोडता फारसा फरक नव्हता. हे लक्षात येते. २०१३ च्या परीक्षेतही उतारा वरील प्रश्न साधारण या वर्षी एवढेच होते. उलट २०१३ च्या तुलनेत या वर्षीच्या परीक्षेतील उताऱ्यावरील प्रश्न चांगले होते. उतारा वाचून त्या प्रश्नांचा अर्थ लागत होता. बऱ्याच जणांना या पेपरला वेळ पूरला नाही पण १००–१५० दरम्यान स्कोर असणारे अनेक विद्यार्थी आहेत. यावरुन हे लक्षात येते की हा पेपर सरावाचाच पेपर आहे. पेपर १ च्या तुलनेत पेपर –२ हा स्कोअरींगचा असतो. त्यामुळे सरावावर भर दिला तर हा पेपर नक्की स्कोर वाढवण्यात मदत करतो. ज्यांना हा पेपर अवघड वाटला त्यांचे कदाचित सरावाकडे लक्ष नसेल.

थोडक्यात पेपर –१ साठी चौफेर वाचन पुस्तकांबरोबरच अन्य माध्यमांचा वापर करणे आणि पेपर २ साठी सरावावर भर दिल्यास अशा प्रकारच्या पेपरमध्ये सुध्दा १८०+ जाणे शक्य होते. हे सांगावेसे वाटते. पुढच्या परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थी मित्रांनी यु.पी.एस.सी. चे पेपर पहावित ते वेळ लावून सोडवावेत व त्यानुसार पूर्व परीक्षेतील पेपरने दाखवून दिलेली आहे.

कोणतीही स्पर्धा दिलेली आहे. टप्प्यांमध्ये होते. पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत आता अलिकडे उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, पोलीस उपाधिक्षक, गटविकासाधिकारी, या पदांची आहे. पी.एस.आय./एस.टी.आय. या परीक्षांचे पूर्व व मुख्य परीक्षांचे स्वरूप वस्तुनिष्ठच आहे.

# नदी

**आमच्या गावाची नदी**
**सीना तिचे नाव**
**तिच्याभोवती वसलाय**
**आमचा सारा गाव**
**खूप वर्षापूर्वी होते**
**स्वच्छ, निर्मळ पाणी**
**पक्षी गायचे झाडात**
**गोड मंजूळ गाणी**
**सगळे म्हणतात आता**
**पाऊस झाला कमी**
**पूर्वीसारखे नाही आला**
**येत नदीचा पाणी**
**नदीचा झाला नाला**
**त्यात कचरा सडत चालला**
**नदी भोवतीच्या परिसर**
**अस्वच्छ भोवतीचा परिसर**
**अस्वच्छ होत चालला**
**नदी आमची लोकमाता**
**वाचवू आमण तिला**
**नदीमुळेच तर मिळेल**
**जीवन आमच्या गावाला**

**– आरती गोरख ताठे**

# संगणकाचे महत्व

– वर्षा काळे




आपण दैनंदिन जीवनात जे अनुभवतो किंवा वर्तमानपत्रात जे वाचतो त्यावरुन असे लक्षात येते की, संगणक ही वीजेवर चालणारी यंत्रणा आहे. दिलेली माहिती व सूचना किंवा आज्ञा यानुसार तो काम करतो. पुरविलेल्या माहितीचे विश्लेषण, त्याला दिलेल्या सूचनांप्रमाणे करतो. मानवी मेंदुचे कार्य ज्या पध्दतीने चालते त्याच पध्दतीचा वापर संगणक रचनेत केला जातो. मानव आणि संगणक यांच्या तुलनेत अर्थातच संगणक श्रेष्ठ ठरतो. कारण मानवी स्मृतीला मर्यादा असता, पण संगणकमध्ये अमर्याद स्मृती असू शकते. माहिती साठवण्याची मानवी क्षमता तोकडी असते, पण संगणक अतिप्रचंड प्रमाणात माहितीचा साठा करु शकतो. शिवाय अचूक माहिती पुरविली असेल तर संगणक १०० टक्के बिनचूक उत्तरे देतो. मानवाप्रमाणे तो सहज जाता जाता चुका करत नाही. संगणकाला विश्रांती माहित नसते मात्र मानव थोड्या श्रमाने थकतो. अर्थात शेवटी संगणक हे यंत्र आहे. त्याला कल्पनाशक्तीचे वरदान नाही त्यामुळे मानवी मेंदुच्या नाना कळा त्याच्या आकलनाबाहेरच्या आहेत ही मर्यादा लक्षात ठेवणे इष्ट ठरेल. डोळ, नाक,कान इ. इंद्रियांमुळे मानवी मेंदुला सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन किंवा माहिती होते. ही माहिती मज्जातंतूकडून मेंदुकडे पोहचवली जाते. या माहितीवर मेंदू प्रक्रिया करुन काय करायला हवे याचा निर्णय घेतो व त्यानुसार स्नायुंना संदेश पाठवले जातात याला सूचना किंवा आज्ञा म्हणतात.

किचकट गणिते चटकन सोडवण्यासाठी स्पेलिंग तपासण्यासाठी, बिनचूक आकृत्या काढून विषयाचा तपशील समजावून घेण्यासाठी व उपलब्ध माहिती चटकन आत्मसात करण्यासाठी संगणक उपयोगी पडतो. संगणक वेगवेगळे मनोरंजक खेळ सादर करुन अबालवृध्दांचा फावला वेळ आनंददायक बनवू शकतो. सध्या अनेक तऱ्हेचे व्हिडिओ गेम्स उपलब्ध आहेत हे आपणास माहितच आहे. याशिवाय चित्र काढण्यासाठी, खेळाच्या माध्यमातून शिक्षण घेण्यासाठीही कॉम्प्युटचा उपयोग होतो.

आधुनिक रुग्णालयात संगणकयुक्त तंत्रे वापरुन रोगनिदान अचूक व त्वरीत करता येते तसेच आणिबाणीच्या परिस्थितीत तातडीने माहिती पुरवल्याने उपचार करणे सोपे जाते. सध्या रोगनिदान करण्यासाठी संगणकाचा प्रभावी वापर सर्रास केला जातो. कॅटस्कॅन (Catscan) सारख्या संगणकीय तंत्रामुळे मानवी मेंदूसारख्या किचकट रचना असलेल्या अवयवाचे व त्यातील प्रत्येक पेशीचे खाले निरीक्षण करणे शक्य झाले आहे. संगणकाचा वापर रेल्वे व विमानसेवा यामध्ये आरक्षण करण्यासाठी, वाहतूक नियंत्रणासाठी तसेच वेळापत्रके व कर्मचाऱ्यांच्या कार्यभाराची माहिती बिनचूक देण्यासाठी केला जातो.

विमान सेवेमध्ये तर प्रत्येक टप्प्यांवर संगणक वैमानिकाला मोलाचे सहाय्य करतो उपग्रहांच्या इतिहासात संगणकाने बजावलेली कामगिरी संस्मरणीय आहे. उपग्रहातील संगणकाने पाठविलेल्या माहितीचे पुन्हा संगणकाच्या साहाय्याने विश्लेषण करुन हवामान विषयक अंदाज बिनचूक

वर्तवणे शक्य झाले आहे. त्यामुळे महापूर, वादळ या सारख्या नैसर्गिक आपत्तीची पूर्वरचना सहजपणे मिळू शकते. या खेरीज बँका, हॉटेल्स, सी.आय.डी. आणि पोलीस खात्यात गुन्हेगारांची स्केचेस तयार करण्यासाठीही संगणकाचा उपयोग होतो.

कॉम्प्युटरमध्ये मजकूर माहिती साठवताना ती फाईलमध्ये साठवली जातो. नेहमीच्या व्यवहारामध्ये आपण माहिती साठवण्यासाठी जशी फाईल वापरतो तसाच प्रकार कॉम्प्युटरमध्ये वापरतात. कार्यालयीन कामकाजामध्ये ऑफिस वर्क वेगवेगळ्या माहितीच्या विषयानुसार विभागणी करुन ती वेगवेगळ्या वहित साठवतात. याला आपण फाईल असे म्हणतो. जमा खर्च लिहिण्यासाठी वेगळी फाईल, पत्र व्यवहारासाठी वेगळी फाईल यामुळे पाहिजे असलेली माहिती मिळवणे नव्याने माहिती जमा करणे ही कामे सुलभ रितीने होतात. कॉम्प्युटर मध्येही एका प्रकारच्या फाईलमध्ये एक विशिष्ट नाव असते. इन्कम यर ही फाईल इन्कम विषयक माहिती साठवण्यासाठी वापरलेली आहे. कॉम्प्युटर फाईलचे नाव सामान्यतः अन्वर्यक असते. फाईलच्या नावावरुन फाईलमध्ये कोणत्या प्रकारची माहिती आहे हे लक्षात येते. प्रगत देशात तर जीवनाचा बहुतांश क्षेत्रात संगणकाने प्रवेश केला आहे इतकेच नव्हे, तर कॉम्प्युटर सायन्स हा शैक्षणिक अभ्यासक्रमाचा एक नवा विषय बनला आहे.

संगणकाचा उपयोग अनेक क्षेत्रात होतो. आर्थिक क्षेत्रात तर संगणक एक गरज बनलाय त्याने ह्या क्षेत्रात आपलं बरंच बस्तान मांडलय अगदी पतसंस्थेपासून ते आंतरराष्ट्रीय बँकोपर्यंत तर पानपट्टी पासून किराणा मालाच्या होलसेल दुकानापर्यंत तसेच कारखान्यात, शेअर्स बाजार अनेक प्रचंड क्षेत्रात संगणक आज वापरला जातो. विज्ञानाने दिलेली ही देणगी खरोखरच बहुमूल्य अशी आहे. कारण ह्याच्या उपयोगापासून अजून एकही क्षेत्र वंचित राहिले नाही. काही महिन्यापूर्वीच पोखरण येथे भारताने अणुचाचण्या घेतल्या ह्या ठिकाणी सुध्दा संगणक आपले महत्व पटवून दिलेले आहे. ह्या अणुचाचण्यामुळे अमेरिकेने भारतावर अनेक निर्बंध लादले परंतु ह्यातून संगणकाला येणारा धोका म्हणजे वाय टु के प्रॉब्लेम याला पर्याय काढण्यामध्ये भारतीय संगणक तज्ज्ञाचा फार मोठा वाटा असेल. विज्ञान क्षेत्रात संगणक आज कितीतरी अवघड कामगिरी अतिशय व्यवस्थित पार पाडत आहे ते म्हणजे नवीन उपग्रह अवकाशात सोडण्यापासून ते त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यापर्यंत तसेच त्याच्याकडून अपेक्षित माहिती मिळपर्यंत संगणक उद्योगधंद्याच्या अविभाज्य घटक बनला आहे. नुसत बटन दाबायचा अवकाश की तुमच्या प्रश्नांची उत्तरे झटपट कागदावर छापून तयार ! असे हे अजब यंत्र आहे तरी कसे ? कुणी म्हणतात की संगणक हा तल्लख मेंदू असलेला बुध्दीमान माणसासारखा आहे तर कुणाला तो जादूगर वाटतो. कितीही त्याच्या गाजावाजा केला तरी खर सांगायचं झालं, तर तो आहे एक सांगकामा नोकर, तरीही अतिशय तत्पर एकच किमया त्याच्याजवळ आहे ती म्हणजे काम सांगायचाच अवकाश की, तो निमिषार्धात संपवून टाकतो. संगणक सगळेच सारखे दिसले तरी त्याच्या स्मरणशाखेमध्ये ज्या नोंदी आहेत, त्यावरच त्यांची कार्यक्षमता अवलंबून आहे.

प्रामुख्याने कला, वाणिज्य, विज्ञान व इंजिनिअरींग अशा महत्वाच्या सर्वच क्षेत्रात ह्याचा उपयोगही काळाची गरज बनवलेली आहे आणि त्याला पर्याय नाही कारण ह्यामुळे निर्मिती क्षमता तर वाढतेच परंतु ह्या क्रिया मात्र अतिशय अल्पकालावधीत घडून देश प्रगतीकडे वाटचाल करण्यास मदत होत आहे.

# अपयश

प्रत्येकाला यशस्वी व्हायचे आहे, पण कोणीच अपयशाला स्विकारायला तयार नाही. येथेच आपण खूप मोठ चूक करतो. तो अपयशाचा क्षणही आपण स्विकारुन त्या अपयशाचा आपण आदर केला पाहिजे. आणि आपण वेगळेपणा दाखवला पाहिजे. आपण साधारण नसून असाधारण आहोत.

साधारण मनुष्य थांबतो तेव्हा तो अपयशी ठरतो. पण असाधारण व्यक्ती अपयशी ठरतो तेव्हा तो त्याच्यासाठी मैलाचा दगड ठरतो. कोणत्याही क्षेत्रात अपयश आल्याशिवाय नाविण्याचा शोधा लागत नाही. खरे तर अपयश हीच नव्या शोधाची जननी आहे. त्यामुळे आपल्यासमोर उभ्या टाकलेल्या अपयशांना आपल्या प्रगतीच्या मार्गातील संकट न मानता नव्या संधी मानून त्या स्विकारल्या तरच त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्नात आपल्या हाती नवीन काही लागण्याची शक्यता असते. आपले खरे व्यक्तिमत्व बहरुन येण्यास मदत होईल. काही लोक आपण अपयशी ठरण्याचा दुसऱ्यावर दोष देतात. पण मी म्हणेन, आपण अपयशी ठरण्याचा दोष दुसऱ्यावर न देता स्वतःवर घेतला पाहिजे. ज्या क्षणाला तुम्ही तुमच्या अपयशाची जबाबदारी स्वतःवर घ्याल, त्यावेळेस तुम्ही यशस्वीतेकडे वाटचाल करण्यासाठी टाकलेले ते पहिले पाऊल ठरेल.

अपयश हे निसर्गाचे खूप मोठे नियोजन आहे, की ते तुम्हाला आम्हाला/आपणा सर्वांना तयार करत असते खूप मोठ्या जबाबदारीसाठी.

अपयश हे खूप बळकट बनवते, जीवनात एक नवीन अनुभव आणते. खरं तर अपयश हे असणे गरजेचे आहे एक यशस्वी जीवन जगण्यासाठी.

**– तोगे दत्तात्रय**

---

# आयुष्य

**आयुष्याच्या वाटेवर थांबायच नसतं**
**आयुष्याच्या पैलवीरावर जायचं असतं**
**नशीब कोणी दुसर लिहित नसतं**
**आपल नशीर आपल्याच हाती असतं**
**येतानाही काही आणायचं नसतं**
**जातानाही काही न्यायचं नसतं**
**मग हे आयुष्य तरी कोणासाठी जगायचं असतं**
**मग खरं तर याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी**
**जन्माला यायचं असतं.**

# आयुष्य

आभाळातनं या धरतीवर
आजवर कुणी पडलेलं नाही,
गुरुशिवाय कधीच कुणाला
विद्या आलेली नाही
प्रत्येकाची काळजी घ्यायला,
देवाकडं खरच वेळ नाही
म्हणून तर त्यानं प्रत्येकाला
दिली आहे
एक सुंदर आई...

**– भिंगारदिवे शकुंतला एकनाथ**

# आठवणीतले अमरापूरकर

ज्यांनी आभाळाची उंची मारली तरीही पायाखालजी जमीन सुटू न देणारी कारकीर्द निर्माण केली. अशा संवेदनशील कलाकार म्हणून स्वतःची एक वेगळी ओळख ठेवून सामाजिक क्षेत्रात स्वतःचे सक्रिय योगदान द्वारे स्व. सदाशिव अमरापूरकर आज आपल्यात नाही हे सत्य नाकरणे अवघड आहे.

सुप्रसिध्द सिनेअभिनेते सदाशिव अमरापूरकर यांचे शालेय शिक्षण अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये झाल. अखेरच्या श्वासापर्यंत त्यांचे शाळेशी असलेले नाते अतुट झाले, कारण त्यांच्या अभिनयाला माया याच प्रशालेत रचला गेला आहे असे ते नेहमी म्हणत असत.

ते जेव्हा शाळेत होतो तेव्हापासूनच त्यांचा काल अभिनयाकडे होता. शाळेच्या स्नेहसंमेलनाच्या छोट्या मोठ्या एकांकिकाकडे नाटकामधून त्यांनी त्याच्या अभिनयाला सुरुवात केली. सदाशिव अमरापूरकर यांना कुटुंबीय, मित्र, नातेवाईक 'तात्या' या टोपण नावाने हाक मारायचे. तीच त्यांची सिनेमातील टीम ओळख निर्माण झाली आहे. वयाच्या २१ व्या वर्षीय रंगमंच हेच करीअर करायचे हे त्यांनी ठरविले होते. जवळ-जवळ ८ ते ९ वर्षे या क्षेत्रात संघर्ष करावा लागला. अखेर १९७९ मध्ये २२ जून १८९७ चित्रपटात तात्यांनी बाळ गंगाधर टिळकांची भूमिका सुंदरपणे वठवली होती. गोविंदे महाचानिचा चित्रपटातून रामा शेट्टी ची भूमिका करुन १९८४ मध्ये फिल्मफेयर ॲवॉर्ड मिळविले. तेही पहिल्यांदाच या नगरी कलाकाराला १९८८ मध्ये कालचक्र या चित्रपटासाठीही तात्यांना फिल्मफेयर ॲवॉर्ड मिळाले. १९९१ मध्ये 'सडक' या चित्रपटातील भूमिकेमध्ये फिल्मफेयर ॲवॉर्डची हॅट्रीक साध्य केली. १९९० ते २००० या अख्ख्या दशकात त्यांनी विनोदी व चरित्र अभिनेत्याच्या भूमिका अजरामर केल्या. सुमारे २५५ चित्रपटात तात्यांनी आजची कधीही न पुसली जाणारी मोहर उमटवलेली होती.

कर्तव्यवान पुरुषाच्या मागे नेहमी स्त्री असते. अशाच एका स्त्रीचा आयुष्यात येण्यामुळे अमरापूरकरांनी कारकीर्द बहरत गेली. १९७३ साली शाळेपासूनची मैत्रीण असलेल्या सुनंदा करमकर यांच्याशी विवाह झाला. त्यानंतर त्यांनी अभिनयाचा या प्रवासात कधीही मागे वळून पाहिले नाही.

१९७० च्या दशकात नगरात मातीत मान्य चळवळीत रंगमंचावर उत्साह व नवेचैतन्य निर्माण करणारी एक व्यक्ती म्हणून त्यांचा दबदबा होता. नगरला आल्यावर भावांना कधी भरले नाही असे कधीच झाले नाही. त्यांच्याबद्दलच्या आठवणी हा आज एक केवळ इतिहास आहे.

जुन्या सर्व गोष्टी आज इतिहासात जमा झाल्या आहेत. अमरापूरकराच्या सारख्या शिलेदार व्यक्ती हरपलायची दुःख आहे त्यांच्या आठवणी या येतच राहणार आहेत. त्यांच्या उर्वरित कार्याचा वसा पुढे चालविणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरणार.. धन्यवाद !

**संकलन - आरती गोरख ताठे**

# सैनिक सर्वोत्तम

राष्ट्र में सैनिक सर्वोत्तम होता है । उसका कार्य ही ऐसा है जो उसे सर्वोत्तम बनात है । सैनिक की दिनचर्या किती तपस्या से कम नही, जो सुर्योदय पूर्व शुरु होकर रात्री तक निरंतर जारी रहती है । वह दैनिक कार्यो में एक दुसरे का सहयोगी बनकर कार्य करता है । दोपहर में भोजन के बाद कुछ समय विश्राम कर पुनः भितरी भाव प्रसन्न करने एवं आपसी ताल–मेल को बढावा देने के लिए सामुहिक रुप से खेल का आनंद लेता है ।

सैनिक कभी बिमान नही होता क्योंकि सेना में सम्मिलीत होने ही उसे शैक्षिक, शारीरिक प्रशिक्षण के साथ–साथ, संतुलित एवं स्वास्थप्रद भोजन मिलता है । इसी के साथ वार्षिक स्वास्थ्य परीक्षण, हर प्रकार के मौसम में स्वस्थ रहने का परीक्षण और बचाव करने के सभी उपयुक्त परिधान, आदि के कारण सैनिक केवल असावधानी और दुर्घटना में चोट के द्वारा ही अस्वस्थ हो सकता है । सैनिक अपने देश के लिए कुछ कर सकते है उनको अपने जान की पर्वा नही होती । उनको देश का स्वाभिमान होता है ।

व्यक्ती जब सैन्यभाव धारण करता है तब उसमें निज स्वार्थ नही होता, वह केवल देश और समाज के लिए समर्पित हो जाता है । सैनिक राष्ट्र को अपना स्वतः मानकर उसकी रक्षा करने लगता है । इसलिए सैनिक है तो राष्ट्र है बिना सैनिक के राष्ट्र नही।

यदि सैनिक नही होता तो हम भी नही होते । हम भी चैन की नींद नही सोते । उनके कारण ही हम अच्छी तरह जिंदगी जीत है । और अच्छी तरह रहते है । सिर्फ और सिर्फ उनके कारण ।

इसलिए हमे सैनिकों का सदा आदर सत्कार करना चाहिए । और उनको प्रोत्साहित करना चाहिए । सैनिक वही है जिसमें साहस है । साहस उसी में होता है जिसे अपने प्राणों का मोह नही, और प्राणों का मोह सैनिक में ही नही होता । सैनिकने अपने प्राण पहले ही देश पर न्यौछावर करने की शपथ ली है । इसलिए सैनिक सर्वोत्तम है ।

सैनिक हंन्यतेशत्रोः यतो ततो जयः ।

सैनिक के लिए देश के सिवा कुछ भी नही दिखाई देता । इसलिए तो कहते है कि,

'मेरा मुल्क मेरा देश मेरा यह वतन,
शांति का उन्नति का प्यार कार चमन'
इसके वास्ते सारे है ।

जब तक हमारे देश का रक्षण करने के लिए सैनिक है तब तक हम भी अच्छे भले है । यदि वह नही होते तो कुछ भी नही होता ।

**– फंड ज्योती आसाराम**

# जीवन की कहानी

**बरबाद न करो जल**
**कठिनाई होगी कल**
**पानी जीवन का आधार**
**जाने न पाये बेकार**
**करो न जल का यूँ अपमान**
**हमें ये देता जीवन दान**
**आज बचेगा जल**
**तो काम आयेगा कल**
**जब तक पानी**
**तब तक जीवन की कहानी**

**– वामन अंबिका**

# पर्यावरणाशी नाते...



माणूस हा बुध्दीमान प्राणी आहे. सर्व प्राण्यात श्रेष्ठ आहे त्याने आपल्या बुध्दीच्या जोरवर खूप प्रगती केली अनेकदा तर पर्यावरणाचा वाकवून आपल्याला अनुकूल अशा गोष्टी केल्या त्याने रोगराईवर विजय मिळवला पंख नसतानाही आकाशात झेप घेतली. नानविध शोध लावले त्यामुळे त्याला आपल्या पर्यावरणावर विजय मिळवला असे वाटू लागले, परंतु काय खरेच माणसाने पर्यावरणावर विजय मिळवला आहे यामुळे पर्यावरण म्हणजे आपल्या अवती-भोवती असणारे सर्वकाही यामध्ये झाडे, सूर्य, हवा, पाणी, पशू, पक्षी यांचा समावेश होतो.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हे बोल आहे संत तुकाराम महाराजांचे त्यांना माणसापेक्षा वृक्षवेली जवळचे वाटतात. वृक्षाची जोपासना, वृक्षारोपण व त्या द्वारे पर्यावरणाचे संरक्षण याचे महत्व तर संत ज्ञानेश्वरांनी ७०० वर्षापूर्वीच जाणले होते म्हणूनच तर ते म्हणतात.

नगरेचि निर्मिता । जलाशये बनवावी ।
महावने लावावी । नानाविध ।

खरंच वृक्षाचे महत्व अगाध आहे. वृक्ष आपल्याला सावली देतात. फळे देतात औषधी वनस्पती देतात. पर्यावरण आपल्याला सांगते की 'अरे ही जी वृक्ष वर्षानुवर्षे जंगलात उभी आहेत, ती तुमच्यासाठीच ती तुम्हा पाने, फुले, फळे सावली देतात त्याचे जतन करा' माणसाने कितीही प्रगती केली असली तरी तो पर्यावरणापुढे क्षुद्रच आहे. मानवाला अजुनही भूकंप, त्सुनामी या आपत्ती विषयी पूर्वसुचना वा तिला थांबवण्यासाठी काही करता आलेले नाही. खरंच पर्योवरणाच्या प्रकोपामुळे तापमानात वाढ होत आहे. अवर्षनातून जणू पर्यावरण आपले रौद्ररुपच दाखवत आहे. प्रदुषण वाढत आहे जंगले तोडली जात आहेत. नंद्यामध्ये सांडपाणी सोडण्यात येत आहे.

मानवाने प्रत्येकी एक तरी झाड लावावे. त्यांची निगा राखावी. प्रदूषण कमी करावे. कागदी पिशव्यांच्या वापर करावा. पाणी स्वच्छ ठेवावे. पर्यावरण निरोगी ठेवावे.

**- सुप्रिया राजाराम शिंदे**

## चारोळी

जा तू पुढे अशीच जा
मागे वळून पाहू नकोस
तुझ्यावरचे माझे प्रेम
उघड्यावरती आणू नकोस
तुझा तू अन् माझी मी
गणित असे जुळवू नकोस
फुल नाही म्हणून
झाडाला दोष देऊ नकोस
राजाची राणी हो पण
ओळख माझी विसरु नकोस....

**- मोरे प्रियंका मच्छिंद्र**

# राष्ट्रमाता जिजाऊ

अमोल कांडेकर
टी.वाय. बी.ए.



१२ जानेवारी, १५९८ रोजी लखुजी जाधव व म्हाळसाबाईंच्या पोटी एक सुंदर मुलगी जन्माला आली. लखोजीरावांना मुलगी व्हावी म्हणोनी म्हाळसाराणीने खूप नवस केले. जगदंबेच्या कृपेने त्यांना मुलगी झाली तीचे नाव जिजाई ठेवले. सिंदखेड या गावच्या लोकांनी केलेले वर्णन व दिलेल्या वास्तवाविषयीचा तपशील हा जिजाऊंचा जन्माचा खरा खुरा इतिहास सांगणारा आहे त्यांच्या जन्मामुळे सारी सिंदखेड नगरी हरखून गेली होती. राज दरबाराकडून हत्ती घोड्यांवरुन गावभर साखर वाटली. लखुजींच्या अंगाखाद्यांवर खेळीत त्यांच्या शौर्याच्या कहाण्या ऐकत जिजाऊंचे बालपण मजेत गेले. जिजाऊंची आई म्हाळसाबाई फलटनचे निंबाळकर पवार घराण्यातील होत्या. अत्यंत धोरणी मुत्सद्दी, स्वाभिमानी व धाडसी स्त्री अशी होती. आपल्या माहेरच्या माणसांचे पराक्रम व शौर्य तिने जवळून पाहिले होते. या दोन्ही घराण्यांच्या पराक्रमाच्या कहाण्या सांगून तिने बाल जिजाऊंचे संस्कार क्षम मन घडवले. लाड कौतुकासोबतच शौर्याचे संस्कार त्यांनी जिजाऊला दिले उत्तरे कडील लढाऊ राजपुतांचा व पराक्रमाचे म्हाळसाबाईचे जिजाऊंना धडे सांगितले. मराठ्यांनी गाजविलेले पराक्रम व पचविलेले अपयश या दोन्हींची सांगड घालून परकिय मुस्लिम राजवटीच्या विश्वासघातकी प्रकृतीला शह देण्याचा संदेश त्यांच्या या संस्कारातून जिजाऊंच्या कोवळ्या मनावर कोरला गेला. आपल्या मुलांप्रमाणेच जिजाऊंना देखली त्यांनी घोड्यावर बसणे, तलवार चालविणे, प्रतिपक्षावर हल्ला करणे इ. युध्दशास्त्रातील शिक्षणही दिले.

शहाजीराजे पाच वर्षाचे असताना त्यांचे वडील मालोजी मरण पावले. शहाजी व शरीफजी यांचे पालण पोषण अशा स्थितीत आई उमाबाई व काका विठोजी यांनी केले. वयाच्या अकराव्या वर्षी शहाजीचा विवाह जिजाबाईंशी झाला त्यांचा विवाह मोठ्या थाटात देवगिरी येथे १६१० च्या सुमारास लखुजीराजांनी करुन दिला.

निजामशाही दरबारामध्ये खंडागळे नावाचा एक सरदार होता. दरबार संपल्यावर सर्व सरदार बाहेर निघाले तेव्हा खंडागळेंचा हत्ती बिथरला. सर्व सरदारामध्ये त्यामुळे गोंधळ उडाला खंडागळ्यांचा हत्ती त्याच्या वाटेत येईल त्यांना तुडवू लागला तशात त्याने लखुजी जाधवाकडील काही माणसांना तुडवले त्यामुळे तो सैरावैरा पळू लागला या धांदलीचा अंदाज येऊन रोखाने धावून येणाऱ्या हत्तीला अडवण्याची आज्ञा लखुजीचे पुत्र दत्ताजी यांनी आपल्या सैनिकांना केली पण तो मदोन्मत हत्ती काही त्यांच्या आटोक्यात येईना हे पाहून दत्ताजी संतापून स्वत:च्या हत्तीवर चालून गेले आपल्या कडील हत्तीला जखमी करुन दत्तांनी रक्तबंबाळ करीत आहे हे पाहून खंडागळे मध्ये पडला यावेळी मालोजीचे बंधू विठोजी यांचे संभाजी व खेळोजी ही मुले खंडागळयाच्या मदतीला आले पण तो पर्यंत दत्ताजींनी हत्तीची सोंड कापून काढली. त्यांनी या आवेगात आपला मोर्चा संभाजी भोसेल्यांकडे वळवला हत्तीचे बिथरणे बाजुला राहिले व जाधव भोसले आपसात भांडू लागले. यात संभाजी भोसले यांच्या तलवारीने दत्ताजी जाधवांचा मृत्यू झाला आणि तेव्हापासून भोसले आणि जाधव यांच्यात वाद निर्माण झाले.

जिजामाता व शहाजी राजे यांना एक पुत्ररत्न जन्माला आले. शुक्रवार सुर्यास्तावेळी १९ फेब्रुवारी

१६३० रोजी जिजामातेच्या पोटी पुत्ररत्न जन्माला आहे. सह्याद्रीच्या रांगेत शिवनेरी किल्यात यांचा जन्म झाला. भवानीमातेच्या आशिर्वादाने मुलगा झाला अशी समज होती आणि त्यामुळे त्यांचे नाव शिवाजी असे ठेवले होते. त्यावेळी जिजामातेने शिवाजी पोटात असताना खूप कष्ट घेतले व त्यांनी त्यावेळी रामायण, महाभारताच्या कथा वाचल्या त्यामुळे युध्द नितीचे संस्कार गर्भातच असताना झाले असे म्हणतात.

भारतातील गुलामगिरीचा अंध:कार नाहीसा करणारा आशेचा किरण म्हणून सारा इतिहास शिवरायांकडे पाहतो. राजसत्तेच्या पायाशी लोळण घेणारे मराठी मन लख्खकन चकाकले. आपल्या आंतरिक शक्तीचा अदजास येऊन त्यांनी आपल्या बाहूचे स्फुरण अनुभवले सारा आसमंत दणाणून उठला. मावळ्या खोऱ्यात ललकारी उठली. हर हर महादेव महाराष्ट्रातील नागवंशियांचे वारस असलेले महार मराठे एक झाले व मोगल बादशाही ही हादरली. शिवरायांच्या उदयाने संपूर्ण भारतात आमुलाग्र क्रांती झाली. सामाजिक शोषणाचे प्रभावी हत्यास असलेली वतनदारी व्यवस्था त्यांनी मोडीत काढली. भारतातील इतिहासावर कायमचा ठसा उमटवणाऱ्या छत्रपती शिवरायांचा जन्म आपल्या महाराष्ट्रात झाला. याचा प्रत्येक मराठी माणसाला सार्थ अभिमान आहे. शिवबांच्या जन्मानंतर तीनचार महिन्यांनी शहाजी राजे शिवनेरीवर आले. पुत्रदर्शनाचा व जिजाऊंच्या भेटीचा आनंद त्यांना त्यावेळी झाला. त्यानंत शहाजीराजांना मोगलांचा सामना करण्याकरता उत्तर भारतात जावे लागले. त्यानंतर तीन वर्षे शिवनेरीवर जिजाऊ एकट्या राहिल्या. त्यानंतर जिजाऊ व शिवराय हे सिंदखेडला आले तेथे म्हाळसादेवीनी त्याने कौतुक केले नंतर आपल्या पति व पुत्रांच्या विरहाचे दुःख काही काळ विसरता आले. जिजाऊंनाही गेली तीन वर्षे रोखून ठेवलेला दुःखाचा बांध मोकळा करता आला. वयाच्या सहाव्या वर्षी शिवराजे पुण्याच्या जहागिरीत झाले.

माणूसकीचा गहिवर असलेल्या जिजामातोश्रींनी काही प्रसंगी आपण वीरमाते सोबतच वीरांगना असल्याचे ही जाणवून दिले होते प्रतापगडावरी शिवरायांच्या पराक्रमाने आदिलशाही दरबाराला जोरदार धक्का बसला.

शिवाजी महाराज पन्हाळगडावर असताना सिद्दीजौहर साडेतीन महीने सिद्दी जोहर वेढा धरुन बसला होता.तेव्हा शिवराजे संकटात सापडले व पन्हाळगडात अडकून पडले चार महिने झाले तरी सुटकेचा मार्ग दिसेना त्यावेळी मातोश्री जिजाऊंच्या मातृमनात वीरश्री संचारली त्या उद्‌गारल्या आता शिवा वाचून एक क्षणही राहणे अशक्य आहे. मी स्वतः सैन्य घेऊन जाते आणि सिद्दी जौहरचा निकाल लावते. या एका वाक्याने मराठी सैन्याच्या मनात एक स्फूर्ती निर्माण झाली.

शिवरायांनी जिजाऊंच्या मनावर साचलेल्या दुःखाचे तसेच नैराश्याचे सावट पुर करण्यासाठी महाबळेश्वर येथे एक सुवर्णतुलाचा कार्यक्रम ठेवला तेव्हा मातोश्रींच्या वजनाएवढे सोने शिवबांना गोरगरिबांना वाटले. जिजामातोश्री न्यायप्रिय होत्या त्यांना कोणावर अन्याय झालेला सहन होत नव्हता. त्याच्याकडे कोणी न्याय मागितला तर त्या कुठल्याही परिस्थितीत न्याय देण्याचे काम करत असत. एकदा शिवबांनी जिजाऊंकडे न्याय मागितला. तेव्हा मुलाने दिलेला अन्याय कसा आहे हे त्यांनी पटवून दिले व त्याला न्याय दिला.

अशा शूर वीरश्रीचा मृत्यू हा शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकानंतर म्हणजे जून १६७४ रोजी पाचाड येथे झाला अशा या शुर वीर मातेला माझा प्रणाम.

जय जिजाऊ जय शिवराय.

# समर्थ शिष्या वेणास्वामी

समर्थ शिष्या वेणाबाई यांचा उल्लेख वेणास्वामी असाही करतात. त्यांच्या चरित्रविषयक माहिती रामदासी वाङ्मयात इतस्ततः पसरलेली आढळते. वेणाबाईचा जन्म शके १५८९-५० असा अंदाजे मराठी वाङ्मय कोशात दिलेला आहे. कोल्हापूर येथील देशपांडे या देशरथ ब्राह्मण कुटुंबातील वेणाबाई त्यांचा स्वभाव लहानपणा पासूनच शांत व विरक्त वृत्तीचा होता. त्यांचे वडील गोपाजी आणि आजोबा हे दोघेही रामपंथी. त्यामुळे संस्कारक्षम अशा बालवयातच वेणाबाईंना श्रीराम उपासनेची आवड निर्माण झाली. वेणाबाईंचे आठव्या वर्षीच लग्न लावून दिले. संसार म्हणजे काय ? हे ही नीट समजत नसतांनाच वयाच्या दहाव्या वर्षी वैधव्य आले.

एकदा रामदासस्वामी मिरजेस भिक्षा मागत असताना हिंडत-हिंडत वेणाबाईंच्या घरी आले. त्यावेळी वेणाबाई तुळशीच्य कट्यावर 'एकनाथी भागवत' वाचत होत्या. त्याचवेळी 'जय जय रघुवीर समर्थ' ही तेजस्वी वाणी ऐकून चपापल्या रामदासांनी तुंबाभर दूध मागितले परंतु वेणाबाईंची सासू म्हणाली, 'दूध आहे पण ते मारुतीच्या नैवेद्यसाठी ठेवले, तेव्हा देता येत नाही' हे ऐकून वेणाबाईंना वाईट वाटले स्वामींना तसे पाठवू नये. म्हणून तिने आपल्या सासुबाईंस त्यातील दूध द्यावे अशी विनंती केली. परंतु भिक्षा न मिळताच समर्थ भिक्षेसाठी पुढे गेले. वेणाबाईंना या गोष्टीची खूप खंत वाटली. काही दिवसांनी समर्थ भिक्षेसाठी त्यांच्या घरी आले. तद्समयी समर्थांची तेजस्वी मूर्ती वेणाबाईंसमोर उभी होती. समर्थांनी विचारले, 'काय वाचत आहेस बाळ ?' वेणाबाईंनी उत्तर दिले, 'एकनाथी भागवत' त्यावर समर्थांनी प्रश्न केला, 'मुली, तुला यातले काही समजते का ?' यावर भक्तीभावाने पोथी वाचावी एवढेच मला ठाऊक, परंतु त्यात काय सांगितले आहे व त्याचे पालन कसे करायचे हे माहिती नाही. जे माहिती आहे ते फारच थोडे याविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन करण्यासाठी तिने अतिशय नम्रपणे रामदासांना विनंती केली. पंचवीस प्रश्न समर्थांना विचारले. त्यातून त्यांचा अभ्यास, व्यासंग याची क्षमता ओळखली म्हणून त्यांनी पंचवीस प्रश्नांची उत्तरे दिली. संत वेणाबाईंच्या आयुष्याला येथून पुढे एक वेगळेच अध्यात्मिक वळण मिळाले. त्यांचा परमार्थाकडे प्रवास सुरु झाला. वेणाबाईंच्या उत्तरायुष्यात दोन महत्वाच्या घटना घडल्या पहिली घटना म्हणजे समर्थांनी मिरजेत स्वतंत्र मठ स्थापला तेथे महंत म्हणून वेणाबाईंची नेमणूक केली वेणाबाई ज्या काळात वावरत होत्या त्याकाळी विधवा स्त्रीचं तोंड पाहणे देखील निषिध्द मानत होते. त्या काळात समर्थांनी मठाचे महंतपद व कीर्तनाची आज्ञा देणे ही एक क्रांतिकारक घटना आहे. पहिल्या स्त्री कीर्तनकार व पहिल्या मठाधीपतीचा मान संत वेणाबाईंकडे जातो. दुसरी घटना संत वेणाबाई ग्रंथकार झाल्या. मिरजेच्या मठात त्यांचे काव्य बहराला आले. मिरजेच्या मठात त्यांनी आपला शिष्य संप्रदाय वाढविला तसेच नवीन साधकांना अनुग्रह दिला व संप्रदायाची दीक्षा दिली. वेणास्वामी यांनी समर्थांच्या सांगण्यावरुन सीतास्वयंवर या त्यांच्याच ग्रंथावर सज्जनगडावर कीर्तन केले व कीर्तन संपताच स्वइच्छेने सद्गुरुचरणी त्यांनी आपली जीवनयात्रा संपवली

**प्रा.डॉ.सौ. कीर्तने व्ही.एस.**

# बरे झाले स्वातंत्र्य मिळाले



ते गोरे साले रस्त्यामध्ये थुंकु देत नव्हते
वेड्यासारखे रोज पाण्याने रस्तेधुत होते
आपण किती भाग्यवान, किती नशीबवान
गुटखा, पान, तंबाखु खाऊन रस्त्यात थुंकु शकतो
छान झाले स्वातंत्र्य मिळाले....

ते इंग्रज साले धान्यामध्ये भेसळ करू देत नव्हते
मूर्खासारखे रेशनवर सकस धान्य देत होते
आपण किती पुण्यवान किती नशीबवान
दूध, अन्न, औषधामध्ये बेमालूम भेसळ करू शकतो
बेस्ट झाले स्वातंत्र्य मिळाले....

ते ब्रिटीश साले शिक्षणाचा धंदा करू देत नव्हते
अडाण्यासारखे दर्जेदार शिक्षण फुकटात देत होते
आपण किती विद्वान, किती नशीबवान
शिक्षणाचा बाजार मांडून, पिढ्या बरबाद करू शकलो
चांगले झाले स्वातंत्र्य मिळाले....

ते जुलमी साले अनाथ मुलांना भिक मागु देत नव्हते
दारिद्र्यासारखे त्यांच्यासाठी अनाथाश्रम चालवत होते
आपण किती दयावान, किती नशीबवान
अनाथ मुलांना पांगळे करून भीक मागावसाय लावू शकतो
झकास झाले स्वातंत्र्य मिळाले....


ते मिशनरी साले गरीब रुग्णांस हलाखीत मरु देत नव्हते
ईश्वरसेवा समजून त्यांची सेवाशुश्रुषा करत होते
आपण किती करुणावान, किती नशीबवान
डॉक्टरांचा संप घडवून, रुग्णांचे हाल करु शकतो
उत्तम झाले स्वातंत्र्य मिळाले....

ते फिरंगी साले भ्रष्टाचार करु देत नव्हते
लाचखोरांस बुटाने लाथा घालीत होते
आपण किती प्रामाणिक, किती सचोटीवान
लाचखोरांच्या मिळकतीत आपला वाटा ठरवू शकतो
बरे झाले स्वातंत्र्य मिळाले....

ते साले लोकशाहीचा पुरस्कार करत होते
कायद्यासमोर सर्वांना समान मानीत होते
आपण किती हुशार, किती नशीबवान
जात, धर्म, आडनाव पाहून कायद्याला वळवू शकतो
मस्तच झाले स्वातंत्र्य मिळाले...

ते कसले राज्यकर्ते समाजासाठी राजकारण करीत होते
विकासासाठी आधुनिकतेचा प्रचार करीत होते
आपण किती पुढारलेले, किती नशीबवान
धार्मिकतेच्या नावावर दंगली घडवू शकतो
अन् पेटलेल्या समाजावर आपली पोळी भाजू शकतो
खरंच खूप बरे झाले स्वातंत्र्य मिळाले...

– संकलित



# फौजी म्हणजे...



फौजी म्हणजे फिरता वारा,
फौजी म्हणजे वाहता झरा ।
फौजी म्हणजे रात्री एकटाच,
अंधारात चमकणारा तारा ।।

फौजी अंगावरील शहारा,
फौजी रात्रीचा पहारा ।
फक्त फौजीचे आहे,
सुख अन दुःखाचा सहारा ।।

फौजी जन हिताचा नारा,
फौजी आहे अनमोल हिरा ।
फौजी म्हणजे गुन्हेगारांचा,
एक बापच आहे दुसरा ।।

फौजी म्हणजे धाक दरारा,
त्याचाच आहे वचक सारा ।
काहीही करू शकतो पोलीस,
जर असेल तो नीतीनं खरा ।।

- संकलित

# वक्त नहीं....



हर खुशी है लोगों के दामन में
पर एक हँसी के लिए वक्त नहीं
दिन-रात दौडती इस दुनिया में
जिन्दगी के लिए ही वक्त नहीं...
सारे रिश्तों को तो हम मार चुके,
अब उन्हें दफनाने का भी वक्त नहीं....
गैरों की क्या बात करे,
जब अपनों के लिए ही वक्त नहीं....
आँखो में है नींद भरी,
पर सोने का भी वक्त नहीं
दिले है गमों से भरा हुआ,
पर रोने के लिए भी वक्त नहीं....
पराए एहसानों की क्या कदर करें
जब अपने सपनों के लिए वक्त नही...
तू ही बता ऐ जिन्दगी
इस जिन्दी का क्या होगा ?
की हर पल मरनेवालो को,
जीने के लिए भी वक्त नही....

- पानमळकर सोनल संजय

# गरज एकविसाव्या शतकाची.... 'माणुसकी'



एकविसाव्या शतकात माणूस प्रगतीचे नवे पर्व उभे करतो आहे. जो तो सुखाची आणि समृध्द जीवनाची स्वप्ने रंगवतो आहे. विज्ञानाचं जग पुढारत चाललंय. जगाच आर्थिक क्षेत्र दररोज एक नवा उच्चांक गाठतंय, अर्थकारण आणि राजकारण जगाचे दोन बाहु बनलेत. अतिउत्साहात माणूस दररोज नव्या उड्या टाकतो आहे. काळ वेगानं मागं पडत चाललाय, तसा माणुसही वेगळा घडत चाललायं.... किती बरा वाटला नाही, प्रगतीचा पोवाडा ! मी ही वेळप्रसंगी जरा फुगवून गाते पण, या सत्यातही का कुणास ठाऊक मला काटेरी तथ्य आढळत. काळ चाललाय हो पुढं पण, स्वतःच काय ? की असाच प्रगतीचा, समृध्दीचा मुलामा लावून जगाच्या बाजारात सताड गढूळलेले विचार आणि बिघडलेली मानसिकता विकायची ? की मी पणाच्या शेळपट खटाटोपीनं बरबटलेली झुठी शान मिरवायची नक्की काय ?

जगात लाखो-करोडो माणसे दररोज जन्माला येतात आणि मरतातही, पावसाळ्यातील बचबचणाऱ्या किड्यां सारखी! पण लाखात एकातच का आढळावी माणुसकी,ती ही थोडीशीच ? पक्ष्यांप्रमाणे विहार करू इच्छितांना स्वच्छंद ? करा, जरुर करा पण दुसऱ्यांचे पंख छाटून उडण्यात कसला तो अभिमान ? कसली ती गूर्मी ? चित्यासारखी शिकार करू इच्छिता ना ? करा ती सुध्दा करा पण आधिच गेलेल्या सावजाला अजून किती मारणार ? धर्माच्या नावाखाली तुम्हाला त्वेषाने कापा कापी करता येते. मग समोर लोकलमध्ये चढून काही लोकं एका निष्पाप महिलांवर क्रुर बलात्कार करतात तेव्हा कुठे असतो तुमचा बाणा ? जेव्हा स्वतंत्र लोकशाही देशातही आज इतक्या वर्षांनंतर लोक विधवेला पतीच्या सरणावर जिवंत जाळतात तेव्हा कुठे असते तुमचे ते खवळणारे रक्त ? की समोरच्याचे शरीर मातीपासून आणि तुमचे चंदनापासून घडलेय ? जेव्हा एखादा भिकारी काम नाही किंवा होत नाही म्हणून तुमच्याकडे दोन पैसे जरा हट्टाने मागतो तेव्हा लाथाबुक्या घालून त्याला निकामी करता आणि स्वतः मात्र हजारो रुपये रात-रात चालणाऱ्या पार्ट्या, बिअर्स आणि धिंगा मस्ती असणाऱ्या बेशिस्त अशा प्रतिष्ठीत म्हणवणाऱ्या हायक्लास सोसायटीत घालता, यातच का तो तुमचा स्वाभिमान ? लाखो-करोडो रूपयांचा घोटाळा करता आणि लाच होता वर सामाजिक बांधिलकीचा आव आणून प्रत्येकजण आम्हांला सारखाच सर्वांनी मिळून पुढे जावू अशी भाषणे ठोकता.... हाच का मेरा भारत महान ?

अनेक साहित्यकार, लेखन आणि कवी येऊन गेलेत, कित्येक महाग्रंथ रचले गेलेत, कित्येक ग्रंथकार मेलेत, घसा कोरडा करून आपल्या नेत्यांनी माणुसकी म्हणजे काय सांगितली; पण केवळ काळ्या पाषाणागत आपला समाज... गणपती बाप्पा मोरया !

इतके कडवट शब्द वापरून मला काही सुख मिळत नाही किंवा नफाही नाही, पण जेव्हा सर्वांचे सांगायचे, सर्व मार्ग संपतात. तेव्हा तरी काय करता ? आता तुम्ही ठरवायचं की बैलागत पूर्वापार चालत आलेल्या त्याच अमानविय आणि माणुसकीला धरून नसलेल्या गोष्टीचा अवलंब करायंच की एकविसाव्या शतकात एक आदर्श कर्ता आणि पवित्र व्यक्तीमत्वाचा माणुस म्हणून जगायचं मी म्हणते.

''शैतान को ना मिली  
भगवान भी हैराण  
जानवर को नही होती  
कुराण की पहचान  
होती है दिल मे ही इन्सानियत  
सिर्फ वो है रब-ए-इन्सान''

तेव्हा निर्णय तुमचाच की बुध्द हवे की युध्द ? ज्या समाजात तुम्ही वाढलेत त्याबद्दल तुमचे कर्तव्य विसरून कसे चालेल ? मी तर मानते की जर स्वतः जगु इच्छिता तर दुसऱ्यालाही जगु द्या आणि यासाठी माणुसकीसारखा जालीम उपाय तो कोणता ? माणुसकीचं तेज असच झळकत राहो हीच गोड सदिच्छा दर्शवणारा माझा का कडू लेख. नमस्कार !

**- कराळे शुभम मच्छिंद्र**



# ययाति (काही विचार)

वि.स. खांडेकर

– संकलित

ययाति –

जग माणसाच्या मनातल्या दयेवर चालत नाही ते त्याच्या मनगटातल्या बळावर चालत. माणूस केवळ प्रेमावर जगू शकत नाही. तो इतरांचा पराभव करून जगतो. मनुष्य या जगात जी धडपड करतो, ती भोगासाठी ! त्यागाची पुराणं देवळात ठीक असतात, पण जीवन हे देवालय नाही रणांगण आहे.

जगात सर्व गोष्टी योग्यवेळी माणसाला कळतात झाडांना काही पानांबरोबर फुलं आणि फुलांबरोबर फळं येत नाहीत.

पुरुषाचा जन्म पराक्रमासाठीच असतो.

या जगात खरा आनंद एकच आहे. ५ – ब्रह्मानंद ! शरीर सूख शेवटी, दुःखालाच कारणीभूत होतं. मग ते सुख स्पर्शाचं असो अथवा दृष्टीचं असो ! शरीर हा मनुष्याचा सर्वांत मोठा शत्रू आहे. त्याच्यावर विजय मिळवण्याकरता सतत धडपडत राहणे हेच जगात मनुष्याचं प्रमुख कर्तव्य आहे.

माणसाच्या जिभेला गोड फळे आवडतात. ती आपण तिला देत राहिलो, म्हणजे गोड फळांविषयी मनात आसक्ती निर्माण होते. आसक्तीनं मनुष्य शरीरपूजक होतो. देहाची पूजा करणाऱ्याचा आत्मा बधिर होत जातो. फक्त विरक्तीनेच माणसाचा आत्मा जागृत राहतो.

या जगात गोड फळांनाच किड लागण्याचा अधिक संभव असतो.

लज्जा हा सौंदर्याचा अलंकार आहे. सत्याचा नाही. सत्य हे नग्न असते, नुकत्याच जन्माला आलेल्या बालकाप्रमाणे.

या जगात जो तो आपल्याकरिता जगतो, हेच बरे. वृक्षवेलींची मुळे जशी जवळच्या ओलाव्याकडे वळतात, तरी माणसेही सुखासाठी निकटच्या लोकांचा आधार शोधतात. याला जग कधी प्रेम म्हणते, कधी प्रीती म्हणते, कधी मैत्री म्हणते, पण खरोखरच ते आत्मप्रेमच असते. एका बाजूचा ओलावा नाहीसा झाला तर, वृक्षवेली सुकून जात नाहीत. त्यांची मुळे दुसऱ्या बाजुला कुठे ओलावा आहे, मग तो जवळ असो, नाही तर दूर असो हे पाहू लागतात, तो शोधून तो टवटवीत राहतात.

मृत्यु हा जीवमात्राला जितका अप्रिय, तितकाच अपरिहार्य आहे. तो सृष्टीचक्राचा जन्माइतकाच नाट्यपूर्ण आणि रहस्यमय भाग आहे. वसंत ऋतुत वृक्षावर हळूच डोकावणारी तांबूस, कोमल पालवी जशी आदिशक्तीची, लीला आहे तशी शिशीरात गळून पडणारी जीर्ण पिवळी पर्ण ही सुध्दा तिचीच क्रीडा आहे या दृष्टीनंच आपण मृत्युकडं पाहिलं पाहिजे.

माणसाचे मन लोखंडी शस्त्रासारखे आहे. ते सतत वापरावे लागते, नाही तर गंजून जाते.

प्रीती ही कधी उमलणाऱ्या फुलासारखी हसते. तर कधी उफळणाऱ्या ज्वालेसारखी दिसते. ती कधी चांदीण होते तर कधी वीज होते. ती कधी हरिणीचे रुप होते, तर कधी नागिनीचे ! ती कधी जीव देते, कधी जीव घेते.

जो घाव घालतो, त्याला तो विसरून जाणं सोपं असतं, पण ज्याच्या कपाळावर घाव बसतो त्याला त्याचा कधीच विसर पडत नाही.

जीवन नेहमी अपूर्ण असते, तसे ते असण्यातच त्याची गोडी साठवलेली आहे.

प्रेम माणसाला स्वतःच्या पलिकडे पाहायची शक्ती देतं. ते प्रेम कुणावरही असो, ते कशावरही जडलेलं असो, मात्र ते खरखूरं प्रेम असायला हवं. ते हृदयाच्या गाभ्यातून उमलायला हवं. ते स्वार्थी, लोभी किंवा फसव

असता कामा नये. खरं प्रेम नेहमीच निस्वार्थी असतं. निरपेक्ष असतं. मग ते फुलांवरलं असो, प्राण्यावरलं असो, सृष्टीसौंदर्यावरलं असो, आईवडिलांवरील असो, प्रेयसी किंवा प्रियकर यांच्यावरलं असो, कुळ, ज्ञाती, राष्ट्र यांच्यापैकी कुणावरही असो. निःस्वार्थी निरपेक्ष, निरहंकारी प्रेम हीच आत्म्याच्या विकासाची पहिली पायरी असते, असं प्रेम केवळ मनुष्य करू शकतो.

जीवनात प्रेम ही एक उच्च भावना आहे, पण कर्तव्य ही तिच्यापेक्षाही श्रेष्ठ अशी भावना आहे. कर्तव्याला कठोर व्हावं लागतं. पण कर्तव्य हाच धर्माचा मुख्य आधार आहे.

माणसाच्या हृदयात शिरण्याचा मार्ग त्याच्या पोटात असतो. सदैव स्वतःविषयी विचार करणाऱ्या अष्टौप्रहर स्वःच्या पूजेत गुंग असणाऱ्या रात्रंदिवस स्वतःच्या दृष्टीने साऱ्या जगाकडे पाहणाऱ्या किंबहुना स्वतःपलिकडे जगच नाही, असे मानणाऱ्या माणसाला हे कधीच समजत नसावे. बहिऱ्या मनुष्याला जशी गाण्याची गोडी कळत नाही, आंधळ्याला जसे सृष्टीसौंदर्य आकृष्ट करू शकत नाही तसेच हे आहे.

स्वतःच्या पूजेत दंग असलेली माणसे नकळत मनाने अंधळी आणि हृदयाने बहिरी होतात.

स्त्रियांबरोबर चिरकाल स्नेह टिकणं शक्य नसतं. कारण त्यांची हृदय लांडग्याच्या हृदयासारखी असतात.

पुरुष बोलून दाखवितात, बायका बोलून दाखवीत नाहीत, पण दोघांनाही एकाच सुखाची ओढ असते.

एखादी अलौकिक शक्ती संपादन करून जगावर स्वामीत्व गाजवीत मानानं जगणं निराळं आणि कुठलीही शक्ती जवळ नसल्यामुळे दुर्बलाचं आणि प्रवाहपतिताचं क्षुद्र आयुष्य कठिण निराळं पहिलं जीवन आहे. दुसरं जीवंतपणीच माणसाला येणार मरण आहे.

आपल्याला जर नित्य कंदमुळं खायची आहेत तर एखाद्या दिवशी मिष्टान्न देऊन जिभेला नसती चटक लावायची कशासाठी ? माणसाची जीभ मोठी वाईट असते. दुसऱ्याला दुःख देणारे शब्द ती सतत बोलते, एक दिवस खमंग पदार्थ खाल्ला, तर तो दररोज खावा, असं तिला वाटू लागतं. अशी चटक लागली की मग ती जिभेला लागो, डोळ्यांना लागो, कानांना लागो ती तृप्त करण्याकरिता मनुष्य नाही नाही त्या गोष्टी करू लागतो. प्रसंगी पाप करायला सुध्दा प्रवृत्त होतो.

आत्मा जेव्हा शरीराच्या द्वारा आपलं अस्तित्व दर्शवितो, तेंव्हाच त्याचा जगाला साक्षात्कार होऊ शकतो.

मानवी जीवनात आत्मा हा रथी, शरीर हा रथ, बुध्दी हा सारथी आणि मन हा लगाम आहे. विविध इंद्रिये हे घोडे, उपभोगाचे सर्व विषय हे त्यांचे मार्ग आणि इंद्रियं व मन यांनी युक्त असा आत्मा हा

त्याचा भोक्ता आहे.

रथच, नसला तर धनुर्धर बसणार कुठं ? तो त्वरेनं रणांगणावर जाणार कसा ? शत्रुशी लढणार कसा ? म्हणून व्यक्तीनं शरीररूपी रथाची किंमत कमी लेखता कामा नये. इंद्रिय हे या शरीर रथाचे घोडे होत. कारण त्यांच्यावाचून तो क्षणभरसुध्दा चालू शकणार नाही. रथाला नुसते घोडे जुंपले तर ते सैरावैरा उधळून, रथ केंव्हा, कुठल्या खोल दरीत जाऊन पडेल आणि त्याचा चक्काचूर होईल याचा नेम नाही. म्हणून इंद्रियरूपी घोड्यांना मनाच्या लगामाचं बंधन सतत हवं; पण हा लगाम देखील सतत सारथ्याच्या हातात हवा. नाही तर तो असून नसून सारखाच. म्हणून मनावर बुध्दीचं नियंत्रण हवं. बुध्दी आणि मन ही दोन्ही मिळून संयमानं हा रथ चालवू शकतात.

अशा रीतीनं रथ नीट चालेल पण त्यात रथीच नसेल तर शेवटी रथ जाणार कुठं ? त्याचं कार्य काय ? सर्व माणवातं वास करणारा आणि आपल्यापैकी प्रत्येकात मी च्या रूपानं जागृत झालेला जो ईश्वरी अंश असतो. जो मन आणि बुध्दी यांच्या पलिकडं राहतो, इतकंच नव्हे तर जन्म आणि मृत्यु यांच्या पलिकडे पाहू शकतो, तो आत्माच या शरीररूपी रथातला रथी होय.

कोणत्याही प्रकारचा उन्माद म्हणजे मृत्यु. नेहमीच्या मृत्युहून हा मृत्यु भयंकर असतो. कारण त्यात माणसाचा आत्माच मृत होतो.

बुध्दी, भावना आणि शरीर यांचा त्रिवेणी संगम म्हणजे मानवी जीवन.

वायू हा जगाचा प्राण आहे. त्याच्या मंद लहरी सदैव सर्वांना प्रिय वाटतात. पण तोच झंझावाताचे स्वरूप धारण करतो, तेव्हा नकोसा होतो. प्रत्येक वासनेची स्थिती अशीच असते.

प्रेम कसे करावे, हे तुला शिकायचे आहे ना ? तर मग नदीला गुरु कर. वृक्षाला गुरु कर, मातेला गुरु कर.

उपभोग घेऊन वासना कधीही तृप्त होत नाही. आहुतींनी अग्नी जसा अधिकच भडकतो, तशी उपभोगाने वासनेची भूक अधिक वाढते.

मानवतेला सुखी व्हायचं असेल तर मानवाने प्रथम आपल्या मनावर विजय मिळवला पाहिजे.

सुखातं आणि दुःखातं सदैव एक गोष्ट लक्षात ठेव. काम आणि अर्थ हे महान पुरुषार्थ आहेत. मोठे प्रेरक पुरुषार्थ आहेत. जीवनाला पोषक असे पुरुषार्थ आहेत. पण हे स्वर थांबणारे पुरुषार्थ आहेत. हे पुरुषार्थ केव्हा अंध होतील याचा नेम नसतो. त्यांचे अष्टौप्रहर धर्माच्या जीवनाला वेगवेगळे आयाम असतात. कोणा एका व्यक्तीसाठी आयुष्य बरबाद करण्यापेक्षा आपले श्रम, प्रेम व सेवा गरजू व्यक्तींच्या कामी लावल्यास जीवनाचे सार्थक झाल्यावाचून राहत
नाही. यश फक्त त्याला मिळते ज्याला त्याची
प्रचंड गरज असते आणि ही गरज त्याच्या प्रयत्नातून प्रतिबिंबीत होत असते.

तरुणपणी वाढत्या आशाआकांक्षापायाी मनुष्य बराच स्वप्नाळू असतो. नाही नाही त्या कल्पना करतो, नसत्या वल्गना करतो.
आकाश कुसुमांसारखी कधीच हाती लागणार नाहीत अशी ध्येय बाळगतो. पण तो सुवर्णकाळ जर वेळीच संतुष्टात आला तर ठीक होतं आणि ती स्वप्नसृष्टी संपायला उशीर झाला की मग आयुष्यभर याद राहील अशी फजिती होते.

सदा बदलणाऱ्या नाशवंत आणि संसारसुखाच्या लालसेनं सैरावैरा धावण्यापेक्षा न भावणाऱ्या न मानवणाऱ्या लांड्या लबाड्या आणि तडजोडी करण्यापेक्षा अजर अमर, अक्षर आणि अक्षय आहे ते ज्याला सत्य शिव आणि सुंदर म्हणतात त्या सत् तत्वांचा पाठपुरावा करण्यासाठी जीवन वेचून प्रयत्न करणे हाच श्रेष्ठ पुरुषार्थ आहे.

बुध्दिमान मनुष्याने प्रयत्न करून किंवा खूप बहुश्रुत आहे म्हणून ते सत्य गवसत नाही ते त्यालाच लाभतं की जो त्याच्या लाभासाठी आयुष्याची बाजी लावतो. आत्मानुभव हीच अव्दैताची प्रतिची आहे. मूर्तीपूजा धातुची किंवा दगडाची करीत नाही कोणी त्या मूर्तीच्या आधारानं भगवंताच्या रूप गुणांचा आठव होतो. त्याची करूणा मूर्तरूप धारण करते. माझ्या उपासनेनं किंवा साधनेनं किंवा पुजनानं तो धातू किंवा दगड संतुष्ट व्हावं. अशी माझी अपेक्षा नसते तर त्या मूर्तीच्या आरपार असणारं सच्चितानंदघन ईश्वरी तत्व माझ्यावर प्रसन्न व्हावं असं वाटत असतं महाराज.

– शेलार सोनम गणेश

# नातं....

असच एक नातं होतं... जीवापाड जपलेलं...
सहज जुळलेलं तरी आपलसं वाटणारं
एकांतात साथ देणारं
सुखात सहभागी होणारं
दुःखातही हसवणारं
असचं एक नातं होतं... जीवापाड जपलेलं
चुकल्यावर रागवणारं
पडल्यावर सारवणारं
प्रत्येक क्षणी सोबतीला सोबत देणारं
असचं एक नातं होत... जीवापाड जपलेलं...
भावनांप्रमाणे डोळ्यांत साठवलेलं
आठवणींप्रमाणे हृदयात ठेवलेलं
तरीही...
नकळतपणे तुटलेलं.
असंच एक नातं होतं.... जीवापाड जपलेलं
असंच एक नातं होतं.... जीवापाड जपलेलं

– खरात आकाश

# स्त्रियांचा हक्क



चला स्त्रियांनो जागे व्हा न्यायासाठी लढण्यास,
आण घ्या हिंद मातेची अन्यायाला चिरडण्यास
सोसून-सोसून किती सोसावे मार्ग काढुया आता,
हिम्मत न हारिता उसळून देऊया समुद्राच्या लाटा
हक्कासाठी चरण उचलूया एकतेचे गीत गाता,
विजवून टाकू स्वातंत्र्यासाठी शत्रुंच्या आता वाता
स्त्री आहे देशाची शान तिच्याविना जगच लहान,
आयुष्यात कधीही न विसरता सदैव राखील तिचा मान
चला आता गान करुया एकतेचे गीत महान
स्वातंत्र्य भारत मातेसाठी वाढवुया स्त्रियांचा मान

– नागपुरे अर्चना नारायण

# आजचे शिक्षण आणि बेकारी




*Education give a perfect face of life*
*Education gives holy power of fight*
*Education destroyed darkness with the help of light*
*Education gives a man broad sight.*

असं शिक्षणाचं वर्णन केलं जात. माणसाला जीवनाचं अधिष्ठान देणारं, जीवनातील अंध:कार दूर करणारं, मानवाला विशाल दृष्टिकोन देणारं असं शिक्षण. शिक्षणाचं हे वर्णन मानवी मनाला दिलासा देणारं आहे. आजच्या विज्ञान युगात जगायचं असेल, नुसत जगायच जरी असेल तरी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे सुर्यप्रकाशाइतक सत्य आहे. म्हणूनच साक्षरता अभियान हा भव्य संकल्प आम्ही केला आहे.

शिक्षणानं आज अनेक क्षेत्रांत आपली गौरव परंपरा अबाधित राखली आहे. मानवी कर्तृत्वाला अनेक नवनवीन क्षितीजे शिक्षणाने दाखवली आहेत. कर्तृत्वाची अनेक नवी दालने आज युवकांना खुणावत आहेत. त्यांचा मार्ग शिक्षणाच्या द्वारातून जातो. अर्थातच शिक्षण हे जीवनाच्या सुखाचे साधन झाले आहे. शिक्षणाचा मूळ दृष्टिकोन हा ‘विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास’ असा आहे. तो साधण्याचा जास्तीत–जास्त प्रयत्न १९७६ पासून सुरु झालेल्या व्यावसायिक शिक्षण पध्दतीतून केला जात आहे. पूर्वीचे जीवनापासून दूर असलेले शिक्षण या पध्दतीमुळे जीवनाभिमुख झाले. नुसत्या डिग्र्यांची भेंडीळी घेऊन फिरण्यापेक्षा विद्यार्थी एखाद्या कलेत कुशल होऊ लागला. त्याला मिळालेली ही कुशलता त्याला रोजी–रोटी मिळवून देण्यास साहाय्य करते.

आज शिक्षणात सिव्हील, इलेक्ट्रीकल, मेकॅनिकल, हॉर्टिकल्चर, ऑटोमोबाईल, अध्यापन, संगणक अशा विविध शाखा निर्माण झाल्या असून त्या–त्या शाखांची पदविका घेणारे तरुण आज जीवन संघर्षात यशस्वी होण्याचा प्रयत्न करताना दिसतात. अनेक कॉलेजांमधून या शाखांच्या शिक्षणाचा लाभ हजारो विद्यार्थी घेताना दिसत आहेत. भविष्याच्या दिशेने पाऊले टाकण्याचा प्रयत्न करणारे हे युवक अंतिम ध्येयापर्यंत पोहचतील का ? पोहचू शकतील का ? हा प्रश्न उद्‌भवतो आणि हा प्रश्न आपल्याबरोबर अनेक शंका भयशंका घेऊन येतो. कारण भारताची सद्य:स्थिती पाहिली तर नाईलाजाने या प्रश्नाचे उत्तर नाही असे द्यावे लागते आणि भारताच्या भविष्यकाळाची भीती वाटू लागते.


भारतीय संविधानातील घटनेनुसार भारतात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, निवारा मिळाला पाहिजे असे कलम आहे, परंतु येथील किती नागरिकांना अन्न मिळते. कितींना वस्त्र आणि किती जणांना निवारा मिळतो. हा प्रश्नच आहे. अर्थात लोकसंख्येची अमर्याद वाढ हे अत्यंत

विचार करायला लावणारे कारण यामागे आहे. अन्न, वस्त्र, निवारा या तीन जीवनाश्यक बाबींमध्ये शिक्षण याही गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. म्हणजे शिक्षण मिळणे हा जन्मसिध्द अधिकार झाला आहे. शासन यंत्रणा, शिक्षण मंडळ, शिक्षणसंस्था यांनी शिक्षणाचा प्रसार बहुसंख्य प्रदेशात केला असला तरी आज मितीला आपल्या देशांत ४८% लोक निरक्षर आहेत आणि जे साक्षर ओहत. त्यातील किती जण नोकरी धंद्यात आहेत, हाही प्रश्नच आहे. भारतातील बेकारीचे प्रमाण ५७% आहे. लोकसंख्या शिक्षण प्रसार आणि बेकारीचे प्रमाण पाहिले की, देशाच्या भवितव्याबद्दल चिंता वाटू लागते. पदव्यांची भेंडोळी घेऊन निराश अवस्थेत फिरणारे तरुण पाहिले की शिक्षणातील फोलपणा लक्षात येतो.

त्यातच श्रमप्रतिष्ठा कमी झाली आहे. चार इयत्ता शिकलेला तरुण हलक्या प्रतीचे काम किंवा व्यवसाय करण्यात लाज मानतो. लोकसंख्येतील भयंकर वाढ, शिक्षणातील फोलपणा–बेकारी अशा दृष्टचक्रात सापडलेली ही पिढी नैराश्यवादाकडे झुकते आहे. त्यातच नोकरी, धंदा या क्षेत्रांना वशिलेबाजी, शिफारस, पैशाची लाच, राखीव जागा या दृष्ट ग्रहांनी ग्रासले आहे. भ्रष्टाचार हा तर या क्षेत्रातील शिष्टाचार बनला आहे. बेकारीने त्रस्त झालेला युवक हा भ्रष्टाचार करून नोकरी मिळाल्यास भ्रष्टाचारालाही तयार होतो आहे.

**– पाखरे प्रतिक्षा**

# हेच खरे आयुष्य...



**आयुष्य जगणं ही एक कला आहे.**
**कस जगायचं हे ज्याच त्याने ठरवायचं...**

**दु:ख सगळ्यांनाच असतात**
**दु:खाला हसत जगायचं की दु:ख पित जगायचं**
**हे ज्याच त्याने ठरवायचं...**

**समाज हा दुसऱ्यांची निंदा करण्यासाठीच असतो**
**कोणासाठी जगायचं ?**
**स्वत:साठी की समाजासाठी**
**हे ज्याच त्याने ठरवायचं...**

**समाजात जर आपलं अस्तित्व टिकवायच**
**असेल तर स्पर्धा**
**पण ही स्पर्धा दुसऱ्याशी आहे की**
**स्वत:ची स्वत:शी**
**हे ज्याच त्याने ठरवायचं...**

**प्रत्येक सामान्य माणसात काही तरी**
**असामान्य गोष्ट असतेच**
**सामान्य म्हणून जगायच की असामान्य म्हणून**
**हे ज्याच त्याने ठरवायचं...**

**– छत्तीसे पल्लवी बापू**

# तरुण आणि वाढती व्यसनाधीनता

*Tell me the song lying on lips of your youth,*
*I will tell you, the future of your country.*

कुशल महायोध्दा नेपोलियन बोनापार्ट या वाक्यातून म्हणतात, 'मला तुमच्या देशातील तरुणांच्या ओठावरती कोणत गाणं आहे ते सांगा ? मी तुम्हाला तुमच्या देशाच भविष्य सांगतो.' एकेकाळी भारतमातेसाठी बलिदान देणाऱ्या तरुणांच्या ओठांवर वंदे मातरम्, सारे जहाँ से अच्छाँ, अशी देशभक्तीवर गीतं असत. परंतु आज आमच्या तरुणाईचा विचार केला तर सकाळापासून संध्याकाळपर्यंत त्यांच्या ओठावर एकच गाण दिसतं.

'चार बोतल ओडका, काम मेरा रोजका'

मग माझ्या मनात विचार येतो कुठ जाऊन बसलीय तरुणाई माझी ?

'संयुक्त राष्ट्र' आणि युनायटेड नेशन चिल्ड्रन फंड यांच्या मते, बाल्यावस्थातील दुसऱ्यावर अवलंबून असणे ते प्रौढावस्था मधील स्वावलंबी असणे यामधील अवस्था म्हणजे तरुण होय. सांख्यितिक भाषेत म्हणल तर वय वर्षे पंधरा ते चोवीस दरम्यान असलेल्या लोकांना तरुण अस म्हटलं जात. तारुण्य म्हणजे होश आणि जोशचा खिलाफ. मुळात तरुण किंवा युवक म्हणजे काय तर 'यु' म्हणजे युधिष्ठिर 'व' म्हणजे वक्रतुंड आणि 'क' म्हणजे कर्ण. अर्थात ज्याच्या ठायी युधिष्ठिराची युक्ती, वक्रतुंडाची भक्ती असते व कर्णाची शक्ती असते तो म्हणजे आमचा युवक. त्याच युवकाच्या प्रत्येक चेहऱ्याला आम्ही तरुण म्हणतो.

ज्या देशातील तरुणांचे मन, मेंदू आणि मनगट हे तीन म कार मजबूत तो असतो तरुण असं



स्वामी विवेकानंदांनी सांगितले होते. ज्या देशाचे तरुण सामर्थ्यवान तो देश सामर्थ्यवान. विवेकानंद एके ठिकाणी म्हणतात, 'तुम्ही मला उत्साहानं आणि देशप्रेमानं भरलेले १०० तरुण द्या, मी तुमच्या देशाच भवितव्य घडवून दाखवतो.' तारुण्य म्हणजे वाऱ्याचा वेग, सूर्याचे तेज, विद्युतेची चंचलता म्हणूनच विवेकानंदानी चारित्र्याची अट तेवढी ठेवली होती.

जगातील सर्वात तरुण देशांमध्ये भारत पहिला आहे. आमचा देश २०२० सालापर्यंत महासत्ता होईल अस स्वप्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी ह्याच तरुणांच्या खांद्यावर बसून पहिलं होतं. पण खरच आमची तरुणाई कुशल चारित्र्यवान, दृढनिश्चयी आहे का ? आमच्या तरुणांना रळाश्रशीपशी चा आजार तर झाला नाही ना ? आमच्या तरुणाईला व्यसन तर लागलं नाही ना ?

व्यसन ही वैयक्तिक प्रतिक्रिया आहे. ती व्यक्तीमधूनच सुरु होते. एखादी व्यक्ती घेतलेला एखादा अनुभव पुन्हा-पुन्हा शोधत असते त्यामुळे त्या व्यक्तीच्या वर्तनात बदल होतो यालाच व्यसन म्हणतात. व्यसनं ही दोन प्रकारची असतात. एक आपल्याला आश्वारूपी स्थावर बसवून उज्वल भविष्याचे स्वप्न दाखवते तर दुसरे नशीबाला दोष

देवून रडत बसण्यास सांगते. एक असेल अभ्यासाचे, मेहनतीचे, प्रगल्भतेचे तर दुसरे असले चंगळवादी, पाश्चिमात्य जीवनशैलीचे. एकीकडे देशाने मंगळावर स्वारी केली, सारं अवकाश पादाक्रांत केल, अणुऊर्जेमध्ये प्रगती केली तर दुसरीकडे आमची तरुणाई नशेचे पदार्थ, दारु, गुटखा, सिगारेट, अफू, गांजा, कोकेन, ड्रग्स यामध्ये बुडालेली दिसते ओ. या बरोबरच नवीनच आलेली मोबाईल, इंटरनेट, फेसबुक, स्मार्टफोनचा अतिवापर यांसारखी व्यसने. यामुळे आमच्या तरुणांना मोबोफोबिया होण्याची भीती वाढली आहे.

आज भारत तंबाखू सेवन करण्यामध्ये जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. या तंबाखुमुळे साठ लाख नागरिक प्रतिवर्षी मरण पावत आहेत. तंबाखु, गुटरखा, सिगारेट यांच्यामुळे कॅन्सर, टी.बी. सारखे आजार आणि त्यांच्या उपचारासाठी ५०० अब्ज डॉलर रक्कम जगाची वाया जात आहे. आमच्या तरुणांना सकाळी तंबाखु खाल्याशिवाय प्रातःविधी होत नाही यासारखी दुसरी शोकांतिका नाही.

दारु, अल्कोहोल, सिगारेटमुळे शरीरावरचा, मनाचा ताण जातो असा खूप मोठा गैरसमज आहे. यांचे नियमित सेवन केल्याने यांचा टॉलरन्स वाढत जातो. आधी एकच पेग घेतल्यावर ताण जात होता. हळुहळू एकाच्या जागी दोन, दोनाच्या जागी तीन पेग घेतल्याशिवाय बरे वाटेनासे झाले... आधी काही महिन्यांनी एखाद्या समारंभाला घेत होतो. आता आठवड्यातून एकदा घ्यावी वाटते. आधी

आठवड्याला घेतलेली पुरत होती. आता रोज घेतल्याशिवाय चैनच पडत नाही. आधी फक्त रात्री पिऊन बरे वाटत होते. आता दिवसाही थोडीशी घ्यावी वाटते. सोशल ड्रिंकिंग ते दारुचे व्यसन ! बहुतेकांचा हाच अनुभव असतो. अशा पेयांमुळे तरुणांचे मानसिक संतुलन बिघडू लागले आहे. त्यांच्या समाजाविषयीच्या, संस्कृतीबद्दलच्या संवेदना कमी होऊन लागल्या आहेत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या महापुरुषाच्या जयंतीला आम्हाला नागपूरमध्ये दारुची दुकाने सक्तीने बंद करावी लागतात, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना तैनात करावे लागते, यासारखी दुसरी वाईट गोष्ट नाही. कदाचित बाबासाहेबांनी दिलेल्या 'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा' या संदेशाचा 'दारु प्या, मजा करा व एकमेकात संघर्ष करा' असा अर्थ आपल्या तरुणांनी घेतला की काय असं मला वाटत.

दिवसेंदिवस वाढत असलेला तणाव, एकटेपणा, नैराश्य यामुळे स्त्रियांमध्ये सुध्दा व्यसनाचे प्रमाण वाढू लागले आहे. यामध्ये उच्चभ्रु, उच्चशिक्षित त्याप्रमाणे मध्यम वर्गीय महिलांचाही समावेश आहे. महिला स्मोकर्स मध्ये अमेरिका, चीन नंतर भारताचा तिसरा क्रमांक लागतो. ज्या तरुणी आधीपासून स्मोकिंग करतात, त्यांच्या बाळाला जन्मतः गंभीर आजार किंवा शारीरिक व्यंग होत असल्याचे एका पाहणीत आढळले आहे.

प्रगत तंत्रज्ञानामुळे ड्रग्स, कोकेन, रेव्ह पार्टी यासारख्या कृत्याचे लोण आमच्या तरुणांमध्ये झपाट्याने पसरत आहे. तरुणांमध्ये ऑनलाईन जुगार, ई सिगारेट, ऑनलाईन अश्लील चित्रफित पाहणे, नशेमध्ये असुरक्षित संभोग, नसेवाटे अमली पदार्थांचे व्यसन करताना वापरल्या जाणाऱ्या सुयांमुळे एच.आय.व्ही./एडस् चे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे. यामुळे नकारत्मकता येणे, खोटे बोलणे, मित्र गमावणे, वजन कमी होणे असे परिणाम

तरुणांमध्ये दिसतात. त्याचप्रमाणे ३१ डिसेंबर ला बदाऊ (उत्तरप्रदेश) येथे झालेल्या एका अल्पवयीन मुलींवर बलात्कार, दिवा (ठाणे) स्थानकात तरुणीवर बलात्काराचा प्रयत्न असे परिणाम समाजालाही भोगावे लागत आहेत. याला पाश्चात्य डे संस्कृती ही कारणीभूती आहे. थोडक्यात अशा गोष्टींमुळे तरुणांच्या करिअरचेच नाही तर आरोग्य, नाते संबंध व भविष्याचे पण नुकसान होत आहे.

आपल्या देशातील तरुणांना व्यसनाधीन करण्याच्या पाठीमागे आंतरराष्ट्रीय राजकारण ही असू शकते. देशाच्या स्वातंत्र्यामध्ये महत्वाचे योगदान देणाऱ्या पंजाब राज्यात तरुणांची एक पिढी ड्रग्सच्या विळख्यात सापडली आहे. या ठिकाणी पाकिस्तानच्या सीमेवरून अशा पदार्थांचा पुरवठा होत आहे तर मिझोरम या राज्यातील शेजारील म्यानमार या देशाच्या सीमेवरून सुध्दा अशा पदार्थांचा पुरवठा होत आहे. यासाठी आपल्या सरकारने २३ डिसेंबर पासून पंजाबमध्ये ड्रग्स विरोधी मोहिम सुरु करण्याचे जाहिर केले आहे तर मिझोरम मध्ये बॅक फॉर गुड ही संस्था काम करत आहे.

एकीकडे आधुनिक तंत्रज्ञानामुळे जग जवळ येत आहे तर दुसरीकडे आमचेच तरुण आमच्यापासून दूर जात आहेत. कुटुंबव्यवस्था लयाला जाऊ लागली आहे. अशा वेळेस संस्कार असलेली, सामाजिक भान असलेली, स्वामी विवेकानंदांना अपेक्षित असलेली चारित्र्यवान पिढी, ज्यांच्या खांद्यावर बसून कलामांनी महासत्तेचे नैतिक व सामाजिक कर्तव्य आहे असं मी समजतो.

*If wealth is lost, nothing is lost,*
*If health is lost, something is lost,*
*But If character is lost, everything is lost.*

जर संपत्ती गेली, तर तुमच काहीच हरवल नाही, जर तुमचे आरोग्य हरवले, तर तुमच काहीतरी हरवलं, पण जर तुमचं चरित्र हरवलं, तर तुमचं सर्वकाही हरवलं. ?

मित्रांनो, आम्हाला आमच्या देशाच भवितव्य घडवायच असेल तर आम्हाला स्वतःच आत्मपरिक्षण कराव लागेल. तुझी शेवटची इच्छा काय ? असं म्हटल्यावर तुम्ही या देशातून चालते व्हा. अस इंग्रजांना सांगणारे राजगुरु, सुखदेव, भगतसिंग हे तरुण आपले आदर्श पाहिजेत, १७ व्या वर्षी स्वतः अंध असताना अंधलिपी तयार करणारा लुईस ब्रेल तर तू चालू शकशील पण धावू शकणार नाही अस डॉक्टरांनी सांगितल असून सुध्दा धावणारी पहिली ब्लेड रनर किरण कनोजिया हे आपले आदर्श पाहिजेत. हे आपले आदर्श असेल पाहिजेत

व्यसन व्हावं आम्हाला,
व्यसन व्हावं आम्हाला
तुम्ही पाहिलेल्या प्रत्येक स्वप्नाला सत्यात
साकारण्याच
व्यसन व्हावं आम्हाला
आमच्या संस्कारांना व संस्कृतीला
जपण्याचं
व्यसन व्हावं आम्हाला
या मातृभूमीसाठी दोन थेंब का होईना
सांडायचं

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

**– भिंगारदिवे प्रगती**

# मराठी विभाग अहवाल

सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात प्रथम वर्ष कला हा वर्ग सुरु झाला. त्या वर्षीच मराठी हा विषय सामान्य स्तरावर सुरु करण्यात आला. त्यानंतर म्हणजेच पुढील वर्षी सन २००५-०६ च्या शैक्षणिक वर्षात मराठा हा विषय विशेष स्तरावर चालू करण्यात आला. त्या वर्षापासून या विभागात अभ्यासक्रमाव्यतिरिक्त वेगवेगळ्या सह महाविद्यालयीन उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये बसलेल्या सर्व वर्गांचे निकाल उत्कृष्ट लागले आहे. या विभागातील विद्यार्थी नेहमीच अंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेत भाग घेत असतात. पद्ममणी महाविद्यालय पाबळ येथे झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाचा एक संघ पाठविण्यात आला होता. त्यास उत्तेजनार्थ बक्षिस महाविद्यालयास मिळाले होते.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये द्वितीय वर्षात २५ तर तृतीय वर्षात २२ विद्यार्थीनी प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रम शिकविण्या व्यतिरिक्त बाह्य उपक्रमांबाबत माहिती देवून त्यांचे आयोजन केले जाते. विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्षारंभी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच गुरुपौर्णिमा, ५ सप्टेंबर ला शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. विजय जाधव हे उपस्थित होते.

मराठी विभागाच्या वतीने विभागातील विविध चर्चासत्रात सहभाग व पेपर प्रेझेंटेशनसाठी पाठविले जाते. न्यू आर्टस् कॉलेज शेवगाव, एकता कॉलेज, पाईपलाईन, अहमदनगर व जिजामाता कॉलेज भेंडे या महाविद्यालयात प्रा.डॉ. मुळे बी.एम. यांनी शोध निबंध सादर केले तर राहुरी महाविद्यालय, लोणी प्रवरा महाविद्यालय व न्यू आर्टस कॉलेज अहमदनगर येथे डॉ. कीर्तने व्ही.एस. यांनी शोध निबंध सादर केले. या बरोबरच कॉ. बापूसाहेब भापकर स्मृती वक्तृत्व स्पर्धा, लॉ कॉलेज अहमदनगर या महाविद्यालयात डॉ. भाऊसाहेब मुळे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

या बरोबरच महाविद्यालयात २७ फेब्रुवारी २०१७ रोजी मराठी राजभाषा दिनानिमित्त 'मराठी गौरव दिन' विभागाच्या वतीने आयोजित केला होता. नंतर कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या जीवनकार्याला उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमात विविध विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी आपापली भाषणे सादर केली. या व्यतिरिक्त विविध उपक्रम मराठी विभागाच्या वतीने चालविले जातात. तसेच सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे विद्यापिठाने नेमूण दिलेला अभ्यासक्रमावर नियमितपणे अध्यापन केले जाते.

**मराठी विभाग प्रमुख, प्रा. डॉ. भाऊसाहेब मुळे**

## Department of English

The department of English and the faculty has been working intentionally for the enhancement of student's dinguistic as well as literary skills, which will become the major cause for their employability in this global world.

The department has been contributing for the betterment of students ever since the college has started. In this academic year (2015-2016) various class room activities were conducted for the students such as group discussion, role play, poetry recitation, class room seminars linguistic games etc. These kind of activities are important and play a vital role to gain confidence and lingnistic competence in students.

In this academic year the faculty prof. Pravin C. Nagawade presented a paper in state level seminar held at New Arts, Commerce and Science College, Ahmednagar.

**Prof. Pravin C. Nagwade**
**Head Dept. of English.**

## इतिहास विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली आणि तेव्हापासून इतिहास विभाग कार्यरत आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी गुणवत्ता वाढीसाठी आणि विद्यार्थ्यांमधील संभाषण कौशल्य आदी गुण विकसित होण्याच्या दृष्टीने इतिहास विभागातर्फे गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये एफ.वाय. बी.ए. इतिहास विषयासाठी १३१ विद्यार्थी आहेत तर एस.वाय. बी.ए. साठी २२, टी.वाय. बी.ए. साठी २२ विद्यार्थी आहेत.

इतिहास विभागाच्या वतीने विविध चर्चासत्रामध्ये विविध ठिकाणी आयोजन केले जाते. त्यामध्ये इतिहासाचे प्राध्यापक सहभाग घेतात. ह्या वर्षी पेमराज सारडा कॉलेज, दादा पाटील राजळे कॉलेज, आदीनाथ नगर, पाथर्डी तसेच पारनेर कॉलेज न्यू आर्टस्, कॉमर्स सायन्स कॉलेज येथे इतिहासाचे प्रा. सोनवणे एस.आर. यांनी शोधनिबंध सादर केला.

अशा प्रकारे इतिहास विभागातर्फे प्राध्यापक व विद्यार्थी कार्यरत असतात. या विभागातर्फे सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली गेली. या निमित्ताने आजच्या स्त्री शिक्षणामध्ये सावित्रीबाई फुले ह्यांचे महत्व विशद करण्यात आले विद्यार्थ्यांनीही आपले विचार मांडले.

**प्रा. सोनवणे एस.आर.**

## समाजशास्त्र विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली आणि तेव्हापासून समाजशास्त्र विभाग कार्यरत आहे. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी गुणवत्ता वाढीसाठी आणि विद्यार्थ्यांमधील संभाषण कौशल्य आदी गुण विकसित होण्याच्या दृष्टीने इतिहास विभागातर्फे गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये एफ.वाय. बी.ए. इतिहास विषयासाठी १३१ विद्यार्थी आहेत तर एस.वाय. बी.ए. साठी २२, टी.वाय. बी.ए. साठी २२ विद्यार्थी आहेत.

समाजशास्त्र विभागाच्या वतीने विविध चर्चासत्रामध्ये विविध ठिकाणी आयोजन केले जाते. त्यामध्ये समाजशास्त्राचे प्राध्यापक सहभाग घेतात. ह्या वर्षी विद्यापीठ पातळीवर तसेच इतर विद्यापिठांमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शोधनिबंधाचे सादरीकरण प्रा. डॉ. विजय जाधव यांनी केले.

अशा प्रकारे समाजशास्त्र विभागातर्फे प्राध्यापक व विद्यार्थी कार्यरत असतात. या विभागातर्फे सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली गेली. या निमित्ताने आजच्या स्त्री शिक्षणामध्ये सावित्रीबाई फुले ह्यांचे महत्व विशद करण्यात आले विद्यार्थ्यांनीही आपले विचार मांडले.

**प्रा.डॉ. विजय जाधव**

## भूगोल विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बुऱ्हाणनगर या महाविद्यालयाची स्थापना २००४–०५ साली झाली. महाविद्यालयामध्ये भूगोल विभाग स्थापनेपासून कार्यरत आहे. भूगोल विषय प्रथम वर्षापासून ते तृतीय वर्षापर्यंत शिकविला जातो. या विभागामध्ये विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये पर्यावरण विषयक, नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन व विनयोग, भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जलसंधारण विषयी माहिती दिली जाते. निसर्गाच्या सान्निध्यात चला, निसर्ग वाचवा अशा अनेक उपक्रमाद्वारे माहिती दिली जाते.

महाविद्यालयामध्ये १४ जानेवारी २०१७ हा दिवस भूगोल दिन म्हणून करण्यात आला. या दिवशी विविध प्रकारची उपक्रम राबविले जातात. यामध्ये विविध मान्यवरांची व्याख्याने आयोजित करुन वसुंधरेचे रक्षण करुया. पर्यावरण वाचवा या विषयांतर्गत भित्तीचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांचा कला गुणांना आणि बौध्दिक विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अहमदनगर महाविद्यालयामध्ये भूगोल दिनानिमित्त प्रश्न मंजूषा मध्ये सहभाग घेतला. यामध्ये कुमार रवि जाधव, हजारे अविनाश व जायभाय अजित या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला व महाविद्यालयाचे नाव प्रकाशित करण्यात प्रयत्न केला.

शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मध्ये भूगोल या विषयात ४२ प्रथम वर्ष, ३८ द्वितीय वर्ष व ३५ तृतीय वर्षामध्ये प्रवेशित आहेत. भूगोल विषयाचा निकाल १००% असून विषयामध्ये चांगले यश संपादन केले आहे. भूगोल विषय हा विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासासाठी खूप मोलाचा ठरतो. त्याचप्रमाणे कला विभाग प्रमुख डॉ. मुळे बी.एम. आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जाधव व्ही.एम. याचे भूगोल विभागास नेहमीच मोलाचे सहकायृ लाभते त्यामुळे भूगोल विभाग चांगल्या प्रकारे कार्यरत आहे.

**प्रा. साठे बी.जी. भूगोल विभाग**

## राज्यशास्त्र विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र हा विषय सुरु करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१३–१४ मध्ये मान्यता देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून महाविद्यालयात राज्यशास्त्र हा विषय एफ.वाय. बी.ए. साठी सुरु करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मध्ये एफ.वाय. बी.ए., एस.वाय. बी.ए. व टी.वाय. बी.ए. साठी राज्यशास्त्र विषय अभ्यासण्यास आहे. राज्यशास्त्र विषयासाठी प्रथम वर्षाचे ४३ विद्यार्थी. द्वितीय वर्षाचे ४० विद्यार्थी व तृतीय वर्षाचे २६ विद्यार्थी प्रवेशित आहेत.

राज्यशास्त्र विषयाचा विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी उपयोग होतो. तसेच त्यांच्या सामान्यज्ञानामध्ये वाढ होते. राज्यशास्त्र विभागांमार्फत मतदार नोंदणीसाठी जनजागृती व मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी जनजागृती हा कार्यक्रम राबविला गेला. त्यामध्ये मतदार नोंदणीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगून मतदार नावनोंदणी करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून फॉर्म भरुन घेतले गेले. विभागाच्या वतीने नेहमी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये राज्यशास्त्र विभाग कार्यरत आहे.

**– प्रा. खांदवे एस.टी.**

## वाणिज्य विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २००५–०६ पासून वाणिज्य पदवी अभ्यासक्रम चालविला जातो.

या विभागांतर्गत प्रथम ते तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमातून वेगवेगळ्या २१ विषयांचे अध्यापन केले जाते.

विपणन व्यवस्थापन आणि कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकौटिंग हे दोन विषय द्वितीय व तृतीय वर्षात विशेष

स्तरावर शिकविले जातात.

अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षापासूनच वाणिज्य शाखेच्या सर्व वर्गांच्या निकालाची परंपरा समाधानकारक आहे. त्याचप्रमाणे या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही प्रत्येक वर्षी वाढते आहे.

या शैक्षणिक वर्षात २०१६–१७ मध्ये वाणिज्य शाखेच्या सर्व वर्गांच्या निकालाची परंपरा समाधानकारक आहे. त्याचप्रमाणे या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही प्रत्येक वर्षी वाढते आहे.

या शैक्षणिक वर्षात २०१६–२०१७ मध्ये वाणिज्य शाखेच्या तीनही वर्गांची एकूण विद्यार्थी संख्या ३३८ इतकी आहे.

अभ्यास क्रमाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना उत्तेजन देणारे विविध कार्यक्रम, मान्यवरांची व्याख्याने राबविली जातात.

या विभागातील सर्वच शिक्षक सहकारी विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करत असतात.

**– प्रा. गाडे त्रिवेणी ज्ञा.**
**वाणिज्य विभाग प्रमुख**

## अर्थशास्त्र विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्र हा विषय कला व वाणिज्य शाखेत शिकवला जातो. वाणिज्य शाखेत प्रथम व द्वितीय वर्षांसाठी व्यावसायिक अर्थशास्त्र व तृतीय वर्षासाठी व्यावसायिक अर्थशास्त्र, आर्थिक विकास आणि नियोजन हे विषय शिकवले जातात. तसेच अर्थशास्त्र विषयाबद्दल विद्यार्थ्यांना आवड आहे.

सन २०१३–१४ मध्ये प्रथम कला शाखेत अर्थशास्त्र विषय सुरु झाला. प्रथम वर्ष कला शाखेत भारतीय अर्थव्यवस्था समस्या आणि भवितव्य हा विषय सुरु केला व नंतर सन २०१४–१५ मध्ये द्वितीय वर्षासाठी आधुनिक बँक व्यवसाय हा विषय सुरु झाला व नंतर सन २०१५–१६ मध्ये तृतीय वर्ष कला शाखेमध्ये हा विषय सुरु झाला. तसेच विद्यार्थ्यांना आर्थिक संकल्पना जाणून घेण्याची आवड असल्याने अर्थशास्त्र विषयाबद्दल विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन जाणवतो. नोकरी मिळविण्यासाठी व स्पर्धा परीक्षा तयारीसाठी अर्थशास्त्र विषय महत्वाचा असल्याने वाणिज्य व कला शाखेतील विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयाला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाला.

**– प्रा. जाधव के. एस.**

## बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) विभाग अहवाल २०१६-१७

सन २००८–०९ या शैक्षणिक वर्षापासून विज्ञान शाखे अंतर्गत बी.एस्सी. (कॅम्प्युटर सायन्स) हा अभ्यासक्रम कार्यरत आहे. प्रथम ते तृतीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही प्रोफेशनल कोर्समध्ये ज्ञान मिळावे व त्यांच्या ज्ञानात भर पडावी यासाठी या कोर्सचा पाया घालण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बुध्दीमत्तेत वाढ करण्यासाठी ग्रंथालयात पाठ्यपुस्तकांखेरीज, रेफरन्स पुस्तकांचे, तसेच विविध शैक्षणिक सुविधांची व्यवस्था करण्यात आली. तसेच कॉम्प्युटर लॅबमध्ये इंटरनेटची व्यवस्था करण्यात

आली. तसेच मॅथेमॅटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर या विषयांची जर्नल्स मागविण्यात आली आहेत.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी सॉफ्टस्किल विषयांचे लेक्चर्स, इतर महाविद्यालयातील तज्ञ व अनुभवी प्राध्यापकांचे सेमीनार तसेच विविध प्रकारचे वर्कशॉप घेतले आहे.

तसेच प्राध्यापकांना नवनवीन तंत्रज्ञानाबाबत अद्ययावत करण्यात येते.

विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव देण्यासाठी विविध प्रकारेच इनडोअर–आऊटडोअर गेम्स आयोजित करण्यात आले. तसेच मराठी दिवस, विज्ञान दिवस साजरे करण्यात आले. यासाठी प्राचार्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

**– भुजबळ ए.आर.**

## भौतिकशास्त्र विभाग
## अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ साली झाली.

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१३–१४ पासून बी.एससी हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. त्या अंतर्गत भौतिकशास्त्र हा विषय प्रथम व द्वितीय वर्षासाठी कार्यरत आहे. तृतीय वर्ष भौतिक शास्त्र २०१६ या शैक्षणिक वर्षात सुरु करण्यात आला. या ३ वर्षात असे पाहण्यात आले आहे की, भौतिकशास्त्र या विषयाबद्दल मुलांमध्ये गोडी निर्माण होत आहे आणि त्यामुळे विद्यार्थी संख्येत वाढ झालेचे असे निदर्शनास आले आहे.

तृतीय वर्ष भौतिकशास्त्र वर्गात १२ व द्वितीय वर्ष भौतिकशास्त्र वर्गात ३६ विद्यार्थी संख्या आहे. विदयार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर देण्यासाठी विविध प्रकारचे उपकरणे व विषयाशी निगडीत असणाऱ्या साहित्यांनी प्रयोगशाळा सुसज्ज आहे. तसेच मुलांच्या शैक्षणिक बुध्दीत वाढ करण्यासाठी प्रयोगशाळेत संगणक सुविधा उपलब्ध आहे.

हे सर्व करताना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

**प्रा. गिते एन.आर.** **प्रा. धिमान पी.आर.**
**प्रा. आडसुळे ए.सी.**
**भौतिकशास्त्र विभाग**

## रसायनशास्त्र विभाग
## अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना सन २००८ मध्ये झाली. आरंभी फक्त कला व वाणिज्य या दोन शाखा कार्यरत होत्या. मात्र त्यानंतर वाढती विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता सन २०१३–१४ मध्ये विज्ञान शाखा सुरु करण्यात आली.

नैसर्गिक वाढीने हाच वर्ग टी.वाय. बी.एस्सी पर्यंत गेला आणि या वर्गात विशेष स्तरावर रसायनशास्त्र हा विषय सुरु करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मध्ये प्रथम वर्ष बी.एस्सी. या वर्गात ११५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर द्वितीय वर्षात ७३ विद्यार्थ्यांनी व तृतीय वर्षात ५५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करण्यासाठी महाविद्यालयाने सुसज्ज अद्ययावत व सर्व सुविधांयुक्त अशी प्रयोगशाळा

तयार केली आहे. या विषयाचे प्रात्यक्षिके वेळेवर पूर्ण झालेली आहेत.

तसेच अध्यापनासोबतच महाविद्यालयातील प्राध्यापक महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये भाग घेतात. विविध महाविद्यालयामध्ये होणाऱ्या चर्चासत्रास संशोधन परिषद कार्यशाळेस उपस्थित राहतात.

**– प्रा. मोहिते सी.पी.**
**बी.एस्सी (केमिस्ट्री विभाग)**

# वनस्पतीशास्त्र विभाग वार्षिक अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ पासून सुरुवात झाली. त्यानंतर सन २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून वनस्पतीशास्त्र हा विभाग महाविद्यालयामध्ये कार्यरत आहे. यामध्ये प्रथम वर्षापासून, द्वितीय वर्षापर्यंतचे वर्ग चालू आहे.

या विषयासाठी प्रथम वर्षाचे ७१ विद्यार्थी व द्वितीय वर्षाचे ४५ विद्यार्थी प्रवेशित आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात वाढ करण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये उत्कृष्ठ प्रतीचे मायक्रोस्कोप, स्लाइड, चार्टस् तसेच उच्च दर्जाचे उपकरणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच या शैक्षणिक वर्षामध्ये बोटनीकल गार्डन ची उभारणी करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वनस्पतीशास्त्र या विषयाबद्दल आवड निर्माण होण्यास मदत होईल.

त्याचप्रमाणे नविन संशोधन कार्यात विकास होण्यासाठी प्राध्यापकांना विविध परिषदा व कार्यशाळेला पाठविण्यात आले होते. त्यामध्ये एस.वाय. बी.एस्सी. च्या विद्यार्थीनी सा.फु.पु.वि. अंतर्गत ‘अविष्कार’ स्पर्धेमध्ये नगर कॉलेज येथे सहभाग घेतला होता. तसेच प्राध्यापिका वाघ एस.जी. यांनी 'Advance in life science & human welfare' या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये औरंगाबाद येथे शोधनिबंध सादर केला.

अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये वनस्पती शास्त्र विभागा कार्यरत आहे.

**– प्रा. वाघ एस.जी., वनस्पती शास्त्र**

# प्राणीशास्त्र विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००८ पासून झाली. आरंभी फक्त कला व वाणिज्य या दोन शाखा कार्यरत होत्या. मात्र त्यानंतर वाढती विद्यार्थी संख्या व विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता सन २०१३-१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून प्राणीशास्त्र हा विभाग कार्यरत महाविद्यालयामध्ये आहे. या मध्ये प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाचे वर्ग चालू असून प्रथम वर्षाचे ३७ व द्वितीय वर्षाचे ३४ विद्यार्थी प्रवेशित आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात वाढ होण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा व त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक ती उपकरणे व साधने त्याचप्रमाणे प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक ती प्राण्यांच्या संबंधित नमुने व आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तसेच अध्यापासोबत महाविद्यालयातील प्राध्यापक महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये भाग घेतात. विविध महाविद्यालयामध्ये होणाऱ्या चर्चासत्रास संशोधन परिषद कार्यशाळेस उपस्थित राहतात.

– प्रा. लहारे एन.टी., प्रा. बांगरे एस.डी.

## हिंदी विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय में २००४–०५ से हिंदी विभाग कार्यरत है । २०१२–१३ से विशेष स्तर पर यह विषय पढाया जाता है । हिंदी विषय में छात्रों की रुचि बढे इसलिए अन्य महाविद्यालयों के अध्यापकों को व्याख्यानों के लिए महाविद्यालय में आमंत्रित किया जाता है । हिंदी विशेष स्तर पर पढनेवाल छात्रोंको कौन–कौन से क्षेत्र मे रोजगार के अवसर उपलब्ध हो सकते है, इसकी जानकारी छात्रों को जाती है । जैसे फिल्म क्षेत्र, अनुवाद क्षेत्र, जनसंचार एवं आदि क्षेत्र ।

महाविद्यालय में दरवर्ष १४ सितंबर हिंदी दिवस के रुप में मनाया जाता है । इस वर्ष डॉ. सहाबुद्दीन शेख प्राचार्य, लोकमान्य महाविद्यालय, औरंगाबाद इन्हें प्रमुख अतिथी के रुप में आमंत्रित किया गया था ।

हिंदी विभाग के प्रमुख प्रा.डॉ. शेख राजमोहंमद हसन बोधेगाव विद्यालय मे विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास योजना में व्याख्याता के रुप में आमंत्रित किये गये थे । उसी प्रकार श्री कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय पारनेर के आंतरराष्ट्रीय संगोष्टी में हिस्सा लिया । प्रतिवर्ष महाविद्यालय में हिंदी विभाग की ओर से अलग–अलग कार्यकमोंका आयोजन किया जाता है । इ स प्रकार महाविद्यालय का हिंदी विभाग कार्यरत है ।

**– प्रा. डॉ. शेख आर. एच. (हिंदी विभाग प्रमुख)**

## इलेक्ट्रॉनिक्स विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २००४ पासून झाली. त्यानंतर सन २०१३–१४ पासून विज्ञान शाखेला सुरुवात झाली. तेव्हापासून इलेक्ट्रॉनिक्स हा विभाग सुरु करण्यात आला आहे. या विभागांतर्गत प्रथम वर्षापासून ते द्वितीय वर्षापर्यंतचे वर्ग कार्यरत आहे. या विषयासाठी प्रथम वर्षाचे ८१ विद्यार्थी व द्वितीय वर्षाचे २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. गेल्या तीन वर्षाच्या तुलनेत यंदाच्या वर्षी विद्यार्थी संख्येत उल्लेखनीय वाढ झाली आहे.

विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानात भर घालण्यासाठी अद्यावत प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामध्ये उच्च प्रतिची उपकरणे व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच नविन संशोधन कार्यात विकास होण्यासाठी प्राध्यापकांना विविध संशोधन परिषदा व कार्यशाळांना पाठविण्यात येते.

अशा प्रकारे महाविद्यालयामध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभाग कार्यरत आहे.

**प्रा. धिमान पी.आर., इलेक्ट्रॉनिक्स विभाग**

## बी.सी.ए. विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बी.सी.ए. अभ्यासक्रमाची सुरुवात शैक्षणिक वर्ष २००८–०९ पासून करण्यात आली.

विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत संगणक लॅब उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये उत्कृष्ट प्रतीचे संगणक व प्रिन्टर उपलब्ध आहेत. तसेच यु.पी.एस. बॅक अप व ब्रॉड बॅण्ड इंटरनेट सुविधाही उपलब्ध आहेत. बी.सी.ए. अंतर्गत येणाऱ्या सर्व विषयांसाठी उच्च दर्जाच्या प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आली आहे.

बी.सी.ए.अभ्यासक्रमांतर्गत असणाऱ्या विविध विषयांत प्राविण्य असलेल्या इतर महाविद्यालया–तील प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी बोलविले जाते. तसेच टी.वाय. बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यासाठी प्रोजेक्ट गाईडन्स करिता तज्ञ अध्यापकांना आमंत्रित करण्यात आले.

तसेच नवीन टेक्नोलॉजी अवगत होण्यासाठी प्राध्यापकांना विविध वर्कशॉप, कार्यशाळा, सेमीनार, इ. मध्ये पाठवण्यात आले आहे.

शिक्षणाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव मिळण्यासाठी विविध प्रकारच्या गेम्सचे आयोजन केले जाते. टी.वाय.बी.सी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात आली.

हे सर्व करताना संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

**– प्रा. भुजबळ ए.आर.**
**बी.सी.ए. विभाग प्रमुख**

# ग्रंथालय विभाग अहवाल

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा असतो. एखाद्या संस्थेची गुणवत्ता अनेक बाबींवर अवलंबून असते ग्रंथालय हा त्यापैकी एक घटक आहे. विविध प्रकारच्या ग्रंथांनी समृध्द असणारे ग्रंथालय हे त्या महाविद्यालयाचा अविभाज्य भाग असतो.

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथालय हे ग्रंथांच्या समृध्दी मुळे प्रसिध्द आहे. या ग्रंथालयाला तेरा वर्षांची परंपरा लाभलेली आहे. सध्या ग्रंथालयात मराठी, इंग्रजी, हिंदी आदी भाषांची सुमारे ५८१७ ग्रंथ संख्या आहे. तसेच या वर्षी ९७८५०/– किंमतीचे ५४२ ग्रंथांची भर त्यामध्ये पडली आहे. ग्रंथालयाच्या समृद्धतेमध्ये विविध प्रकारची क्रमिक पुस्तके, संदर्भ पुस्तके व अवांतर पुस्तके आहेत. त्याचप्रमाणे विविध विषयांची राष्ट्रीय व राज्यस्तरीय अशी नियतकालिके नियमित येत आहेत व नऊ वर्तमान पत्रे नियमित ग्रंथालयात येत असतात.

**✻ ग्रंथालयाचे विशेष उपक्रम –**

✻ **नियतकालिका सेवा –** ग्रंथालयामध्ये विविध विषयांची नियतकालिके येत असतात. या नियतकालिकांची विद्यार्थ्यांना ग्रंथालयामध्ये वाचनासाठी दिली जातात. तसेच शिक्षकांना विद्यार्थ्यांना प्रचलित माहिती देण्यासाठी ही याचा उपयोग होतो.

✻ **संदर्भ सेवा –** ग्रंथालयात विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना विविध विषयांची संदर्भ पुस्तके उपलब्ध करुन दिली जातात. तसेच विविध नियतकालिकातील, वर्तमानपत्रातील, संदर्भ दिले जातात.

✻ **कात्रण सेवा –** ग्रंथालयाने महत्वाच्या विविध विषयांची वृत्तपत्रातील लेखांची कात्रणे संग्रहित केलेली असून संबंधित संशोधकांना, प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना ती उपलब्ध करुन दिली जातात.

✻ **करिअर गाईडन्स –** विद्यार्थ्यांना विविध प्रकारची करिअर विषयाची पुस्तके, नियतकालिके दिली जातात. तसेच स्पर्धा परीक्षा विषयक अद्यावत ग्रंथ, नियतकालिके व रोजगार, नोकरी विषयक साप्ताहिके प्रश्नसंच उपलब्ध करुन दिली जातात.

✻ **ग्रंथालयाविषयी माहिती –** ✻ ग्रंथ संपदा – ५८१७. ✻ ऑडिओ–व्हिडिओ सीडीज् – २००. ✻ वृत्तपत्रे – नऊ. ✻ नियतकालिके – ३२.

✻ कला शाखा – २१.

✻ वाणिज्य शाखा – ०४.

✻ विज्ञान शाखा – ०७

✻ वृत्तपत्रे – ०९

✻ **ग्रंथालय सुविधा –** रिडींग हॉल, होम लेडिंग, न्यूज पेपर क्लिपींग, संदर्भ सेवा,

**– प्रा. झोंड सचिन अंबादास**
**ग्रंथालय विभाग प्रमुख**

---

# शारिरिक शिक्षण क्रीडा विभाग अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये दरवर्षी विविध खेळामध्ये आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत विद्यार्थी विद्यार्थींनी मोठ्या उत्साहात सहभागी होतात. शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मध्ये विद्यार्थ्यांनी पुढीलप्रमाणे सहभागी होवून क्रीडा क्षेत्रात यश सपांदन केले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा –

**१) व्हॉलीबॉल स्पर्धा –** आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल मुलांच्या स्पर्धा संजीवनी इंजिनीअरींग स्पर्धेत ३२ स्पर्धामध्ये श्री बाणेश्वर महाविद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळ करत सांघिक उपविजेतेपद प्राप्त केले व द्वितीय क्रमांक प्राप्त केला दोन विद्यार्थ्यांची पुणे विद्यापीठ विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

**२) बुध्दीबळ –** छत्रपती इंजिनीअरींग कॉलेज नेप्ती येथे पार पडलेल्या आंतरमहाविद्यालय बुध्दीबळ स्पर्धेत महाविद्यालयाचा संघ सहभागी होवून चांगली कामगिरी केली.

**३) कबड्डी –** आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा न्यु लॉ कॉलेज, अ.नगर येथे पार पडल्या व त्यात श्री बाणेश्वर महाविद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळ करीत चाळीस संघामध्ये उप–उपांत्य फेरी गाठली व चांगली कामगिरी केली.

**४) बॉक्सिंग –** आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा टाकळी ढोकेश्वर महाविद्यालयात पार पडल्यात त्यात महाविद्यालयाचे पाच विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यात

सद्दाम बागवान याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

**५) बॉडी बिल्डींग व वेट लिफ्टींग व पॉवर लिफ्टींग –** आंतरमहाविद्यालयीन पॉवर लिफ्टींग बॉडी बिल्डींग स्पर्धा सी.डी. जैन महाविद्यालयीन श्रीरामपूर येथे पार पडल्या त्यात महाविद्यालयाचे खेळाडू विद्यार्थी सहभागी झाले होते त्यात १) मौसुफ शेख व सचिन गाडे प्रथम क्रमांक मिळविला.

**६) मल्लखांब –** आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धा पी.व्ही.पी. कॉलेज लोणी येथे पार पडल्या त्यात अनिकेत सुसरे यांचे चांगली कामगिरी करीत द्वितीय क्रमांक मिळविला.

**७) योगा –** आंतरमहाविद्यालयीन योगा स्पर्धा संगमनेर महाविद्यालय येथे पार पाडल्या त्यात १) अनिकेत सुसरे यांने चांगली कामगिरी करीत विभागीय पातळीवर निवड झाली.

**८) कुस्ती –** आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा जिजामाता महाविद्यालय, भेंडा येथे पार पडल्या त्यात ११ विद्यार्थी सहभागी होते. विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली. १) ऋषिकेश लांडे, २) राहुल शिर्के यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

**९) ज्युदो –** आंतरमहाविद्यालयीन ज्युदो स्पर्धा बाबुजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी येथे पार पडल्या त्यात चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सावित्रीबाई पुणे विद्यापीठ आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी.

**अ) व्हॉलीबॉल –** सावित्रीबाई फुले विद्यापीठ विभागीय स्पर्धा के. जे. सोमैय्या कॉलेज, कोपरगाव येथे पार पडल्या त्यात १) विशाल गायकवाड, २) देवेंद्र बडे यांची निवड झाली होती.

**ब) बॉक्सिंग –** आंतरविभागीय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धा तळेगाव दाभाडे येथे पार पडल्या त्यात सद्दाम बागवान याची निवड झाली होती.

**क) मल्लखांब –** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मल्लखांब स्पर्धा पी.व्ही.पी. कॉलेज लोणी येथे पार पडल्या त्यात अनिकेत सुसरे यांची निवड झाली होती.

**ड) योगा –** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विभागीय योगा स्पर्धा तळेगाव दाभाडे येथे पार पाडल्या त्यात अनिकेत सुसरे यांची निवड झाली होती.

**ई) कुस्ती –** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुस्ती विभागीय स्पर्धा राजूर महाविद्यालय, राजूर येथे पार पडल्या त्यात १) ऋषिकेश लांडे, २) राहुल शिर्के यांची निवड झाली होती ऋषिकेश लांडे याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

**अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेले विद्यार्थी.**

**अ) व्हॉलीबॉल –** अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेस्ट झोन व्हॉलीबॉल स्पर्धा गुजरात पाटण येथे पार पडल्या त्यात महाविद्यालयाच्या विशाल गायकवाड याची निवड झाली होती

राज्यस्तरीय स्पर्धासाठी निवड झालेले खेळाडू विशाल गायकवाड याची महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली होती.

**✻ उपविजेते पद –** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धा कोपरगाव येथे पार पडल्या त्यात श्री बाणेश्वर महाविद्यालयाने ४० संघामध्ये उपविजेते पद पटकावले व द्वितीय क्रमांक मिळवून ट्रॉफी संपादन केली.

कला व शास्त्र महाविद्यालय (पायरी) औरंगाबाद येथे पार पडलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. पुंड मनिषा यांनी खेळातील चिंता व ताण या विषयावर शोध निबंध सादर केला.

पारनेर महाविद्यालय येथे पार पडलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात 'Drought in Maharashtra' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

या बरोबरच (१) बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी, (२) न्यू आर्टस सायन्स महाविद्यालय शेवगाव, (३) राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अ.नगर या ठिकाणी प्रा. पुंडे मनिषा यांनी 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ निर्भय कन्या अभियान अंतर्गत' स्वसंरक्षणावर महिलांसाठी मार्गदर्शन केले व प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले.

तसेच तक्षिला इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव पारितोषिक वितरण समारोप प्रसंगी मार्गदर्शन केले.

**– प्रा. पुंडे मनिषा, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख**

# बहि:शाल शिक्षण मंडळ वार्षिक अहवाल २०१६-१७

बहि:शाल शिक्षण मंडळ पुणे व पुणे विद्यापीठ पुणे यांच्या अंतर्गत आमच्या विद्यालयात दि. ०३/०१/२०१७ ते ०५/०१/२०१७ दरम्यान यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. व्ही.एम. जाधव, मा.प्रा.डॉ. शिरीष लांडगे, विद्यार्थी विद्यार्थीनी व प्राध्यापक वृंद व कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. गाडे टी.डी. उपस्थित राहून उद्घाटन समारंभ झाला. व्याख्यानमालेत विविध विषयावर व्याख्याने देण्यात आले.

दि. ०३/०१/२०१७ रोजी मा.प्रा.डॉ. शिरीष लांडगे यांनी 'यशस्वी जीवनाचे सुत्र' या विषयावर व्याख्यान दिले. यशस्वी होण्यासाठी जीवनामध्ये कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे त्याचबरोबर विद्यार्थी जीवनामध्ये येणाऱ्या यश अपयशावर मात करुन सकारात्मक विचार अंगी ठेवले पाहिजे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये निश्चित बदल होतो व जीवन यशस्वी होते. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना बहुमोल असे मार्गदर्शन मिळाले.

दि. ०४/०१/२०१७ रोजी मा.प्रा. शाहिर तुळशीराम जाधव यांनी 'वैज्ञानिक दृष्टीकोन व अंधश्रध्दा निर्मुलन' या विषयावर व्याख्यान दिले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना बऱ्याच गोष्टींचा वैज्ञानिक दृष्ट्या खुलासा करुन दिला व अंधश्रध्देचे निर्मुलन करुन विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

दि. ०५/०१/२०१७ रोजी मा.प्रा.डॉ. सुधाकर शेलार यांनी 'साविधानात्मक, सामाजिक सांस्कृतिक रचना–एक विचार' या विषयावर व्याख्यान दिले. संविधानात्मक रचना कशी आहे हे सांगून सामाजिक व सांस्कृतिक रचना विद्यार्थ्यांना सांगून बहुमोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचा सांगता समारंभ दि. ०५/०१/२०१७ रोजी श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एम. जाधव सर्व प्राध्यापक व विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित राहून यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेची सांगता झाली.

**केंद्रकार्यवाह, बहि:शाल शिक्षण विभाग**

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयमध्ये शैक्षणिक वर्ष २००४-२००५ या वर्षापासून राष्ट्रीय सेवा योजना NSS कार्यरत आहे. २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षामध्ये १०० विद्यार्थ्यांचे एकक कार्यरत आहे. यामध्ये ७६ मुले २४ मुली सहभागी आहेत.

**❋ नियमित कार्यक्रमांतर्गत राबविले जाणारे उपक्रम** : राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत नियमित कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ केला जातो. त्याचप्रमाणे क्रीडांगणे तयार करण्यात आली. महाविद्यालयाच्या परिसरात खड्डे खोदून विविध प्रकारची वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनींनी २४५ वृक्षाची रोपण केले आहे. मतदार जागृती अभियान राबविण्यात आले. त्याचप्रमाणे महात्मा गांधी जयंती निमित्त विविध व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**❋ विशेष शिबीर** : राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्वाचे उपक्रमामध्ये शिबीर आहे. या शैक्षणिक वर्षात २०१६-१७ मध्ये विशेष शिबीर दि. ०९/१२/२०१६ ते ११/१२/२०१६ या कालावधीमध्ये मु.रतडगाव, ता.जि. अहमदनगर या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या शिबीरामध्ये एकूण ५० विद्यार्थी सहभागी झाले ३६ विद्यार्थी व १४ मुलींनी सहभाग झाले.

**❋ शिबीरातील उपक्रम** : शिबीर कालावधीमध्ये रतडगावमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये ग्राम सफाई करण्यात आली. दोन ठिकाणी विद्यार्थीनी वनराई बंधारे बांधण्यात आले. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत काही कुटुबांना शोष खड्डे खोदून देण्यात आली. गावातील सर्व सुविधा, एकूण कुटुंब किती या विषयी सर्वेक्षण करण्यात आली. गावातील ग्रामदैवत असलेले श्री मारुती मंदिराचा परिसर स्वच्छ करण्यात आला. काही ठिकाणी वृक्षारोपण करण्यासाठी खड्डे खोदण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर पार पाडण्यासाठी गावचे सरपंच मा. तुकाराम वाघुले ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत सर्व सदस्य गावातील मान्यवराचे मोलाचे सहकार्य लाभले. आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.एम. जाधव यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे सर्व सहकारी प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी याचे मोलाचे सहकार्य लाभले म्हणून शिबीर यशस्वी झाले. अशा प्रकार महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक कार्यरत आहे.

**- प्रा. साठे बी.जी.**
**राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी**

# कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना अहवाल २०१६-१७

श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे पण ज्यांना शिकण्याची आकांक्षा आहे असे विद्यार्थी 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा लाभ घेऊ शकतात. श्री बाणेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २००५ सालापासून ही योजना कार्यरत आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास केवळ पुस्तकी व बौध्दीक शिक्षणाने होऊ शकणार नाही. शरीर, मन, बुध्दी आणि आत्मा या सर्वांच्या संतुलनातून व्यक्तीमत्व आकार घेत असते. उच्च शिक्षण घेत असताना, विद्यार्थ्यांवर 'श्रमसंस्काराचाही' प्रभाव पडावा या उदात्त हेतूनेच 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना' महाविद्यालयात राबविली जाते.

या योजनेतून विद्यार्थ्यांना आर्थिक लाभाबरोबरच अनेक कामे करण्याची संधी मिळते. ग्रंथालय विभाग, परीक्षा विभाग, संगणक विभाग, विज्ञान प्रयोगशाळा, कार्यालयीन कामकाज व बागकाम अशा विविध विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांना अभ्यासाबरोबर इतर विभागांचेही ज्ञान मिळते तसेच विद्यार्थ्यांना श्रमसंस्काराचे महत्व कळाले.

**- प्रा.डॉ.सौ. कीर्तने व्ही.एस्.**
**कमवा व शिका योजना**

# विद्यार्थी कल्याण मंडळ विभाग अहवाल २०१६-१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ आणि श्री बाणेश्वर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बुऱ्हाणनगर यांच्या वतीने विद्यार्थी कल्याण मंडळ विभाग महाविद्यालय कार्यरत आहे.

या विभागाच्या वतीने महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना विशेष मार्गदर्शन योजना आणि विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजना इ. योजना राबविल्या जातात.

विशेष मार्गदर्शन योजनेअंतर्गत महाविद्यालया-तील सर्व शाखांच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांच्या तज्ञांची व्याख्याने आयोजित केली गेली. यामध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतरही विषयावरील व्याख्याने आयोजित केली जातात.

विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास योजने अंतर्गत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेसाठी डॉ. अंशु मुळे, महेश मुळे, किरण डहाळे आणि ॲड. असीम सरोदे यांना व्याख्यानासाठी आमंत्रित केले होते यांनी वेगवेगळ्या विषयावर व्याख्याने दिली.

या वर्षी विशेष कार्यक्रम म्हणून स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचे आयोजन केले गेले या कार्यशाळेसाठी दत्तात्रय नवले साहेब उपजिल्हाधिकारी मुंबई व बाबासाहेब दराडे विक्रीकर अधिकारी अहमदनगर यांना मार्गदर्शनासाठी आमंत्रित केले होते.

या विभागाअंतर्गत रॅगिंग प्रतिबंध कायद्याचे काटेकोर पालन केले जाते. ॲन्टी रॅगिंग स्कॉर्ड ही महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेला आहे.

अशा प्रकार विद्यार्थी कल्याण मंडळ महाविद्यालय कार्यरत आहे.

**प्रा.डॉ. शेख आर. एच.**
**विद्यार्थी कल्याण अधिकारी**